
चीनचें आक्रमक आव्हान

प्रा. देवदत्त दाभोलकर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५१४
१९६३




REFBK-0013091


निबंध
३६१८८
१५.८.८८
सं.शा.
१५१८

चीनचें आक्रमक आव्हान

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक ३६८९९..... दि: ..डिसेंबर...
दिनांक ...२५.१२..... दि: २५-९-...

प्रा. देवदत्त दाभोलकर







साधना प्रकाशन, पुणें

प्रथमावृत्ति
एप्रिल २६, १९६३
प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३० – ३१ शनिवार, पुणें २
मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस,
४३० – ३१ शनिवार, पुणें २
कव्हर चित्र
पद्मा सहस्रबुद्धे
© दे. अ. दाभोलकर
किंमत एक रुपया

आचार्यश्री स. ज. भागवत यांना
स्वातंत्र्य, समता व लोकशाही यांच्या
साधनेंत त्यांनीं व्यतीत केलेल्या
जीवनाविषयींच्या प्रेमादराचें चिन्ह म्हणून
त्यांच्या एकसष्टाव्या वाढदिवसानिमित्त

लेखक-प्रकाशकांकडून अर्पण

घटप्रभा
ता. २६–४–१९६३

भारतानें आव्हान स्वीकारलें

(लोकसभेचा १४ नोव्हेंबर १९६२ चा ठराव)

" प्रत्येक राष्ट्राचें स्वातंत्र्य अबाधित राखणें, दुसऱ्याच्या प्रदेशावर आक्रमण न करणें, दुसऱ्याच्या अंतर्गत कारभारांत ढवळाढवळ न करणें व शांततामय सहजीवन कंठणें या तत्त्वांवर निष्ठा ठेवून भारतानें चीनच्या प्रजासत्ताक सरकारशीं सतत मैत्रीचे संबंध ठेवले होते. पण चीननें पंचशील तत्त्वें पायदळीं तुडवून व भारताच्या स्नेहपूर्ण वर्तनाशीं विश्वासघात करून भारतावर आक्रमण केलें आहे, व लष्कराच्या साह्यानें मोठ्या प्रमाणावर चढाई चालवली आहे, याची आम्ही अतिशय दुःखानें नोंद घेतों.

आपल्या मातृभूमीच्या संरक्षणासाठीं भारतीय लष्करांतील जवान व अधिकारी शौर्यानें लढत आहेत, त्यांचा आम्ही गौरव करतों व या पवित्र कार्यांत ज्यांनीं आपल्या प्राणांची आहुति दिली त्या हुतात्म्यांना आम्ही आदरपूर्वक श्रद्धांजलि अर्पण करतों.

चीननें भारतावर आक्रमण केल्यामुळें उद्भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं भारतीय जनतेनें जो आश्चर्यकारक सहजस्फूर्त उत्साह दाखविला त्याचा आम्ही आदर करतों.

राष्ट्रावर आलेल्या या संकटाचा प्रतिकार करण्यासाठीं आपल्या सर्व साधनसामग्रीचा जास्तींत जास्त चांगल्या प्रकारें उपयोग करून घेण्यासाठीं देशाच्या सर्व वर्गांतून व घरांतून उत्साह उचंबळून आला आहे, याबद्दल हें सभागृह आपली कृतज्ञता प्रगट करतें. भारतीय समाजांत स्वातंत्र्य व त्याग यांची ज्योत नव्यानें प्रज्वलित झाली आहे, व देशाचें स्वातंत्र्य व एकात्मता अभंग राहण्यासाठीं नवी निष्ठा निर्माण झाली आहे.

परकीय आक्रमण व लष्करी चढाई यासारख्या भयानक संकटाचा प्रतिकार करण्याच्या क्षणीं आम्हांला अनेक मित्रराष्ट्रांकडून हार्दिक सहानुभूति व भौतिक साह्य मिळालें, याबद्दल हें सभागृह त्या मित्रराष्ट्रांना धन्यवाद देत आहे.

भारताच्या पवित्र भूमीवरून आक्रमकांची हकालपट्टी करण्याचा भारतीय जनतेचा खंबीर निर्धार आहे. मग त्यासाठीं कितीहि दीर्घ-कालीन व कठीण लढा द्यावा लागला तरी आम्ही त्याची तमा बाळगणार नाहीं.

धोका संपलेला नाहीं

चिनी संकटाचा धोका संपलेला नाहीं. कोलंबो योजना चीननें सही-सही स्वीकारलेली नाहीं आणि समजा चीननें ही योजना सहीसही स्वीकारली तरीहि आत्मसंतुष्ट राहून चालणार नाहीं. चीनच्या शब्दावर पुन्हा विश्वास ठेवतां येणार नाहीं.

लष्करी सामर्थ्य, औद्योगिक आणि कृषि-उत्पादन अशा सर्व आघाड्यांवर आपण तयार राहिलें पाहिजे. करवाढ करूनहि सरकारला पैसा उभारावा लागेल. गरीबांपेक्षां श्रीमंतांनीं कराचें ओझें वाहण्यास अधिक तयार झालें पाहिजे.

प्रत्येक सदृढ व्यक्तीनें दरसाल किमान १२ दिवसांचें श्रमदान संरक्षणा-साठीं केलें पाहिजे. प्रत्येकानें हें किमान श्रमदान केलें तर खेड्यांतील २० कोटी लोक ३०० कोटी रुपयांची संपत्ति निर्माण करतील.

जनतेचें धैर्य आणि निर्भयपणा हींच युद्धांतील खरीं शस्त्रें होत.

भारताच्या आर्थिक विकासासाठीं ज्या देशांनीं मदत केली त्यांचा भारत ऋणी आहे. तरीपण श्रम करून आपला घाम गाळून राष्ट्राची उभारणी या देशांतील जनतेलाच करावी लागेल.

— जवाहरलाल नेहरू

संरक्षण प्रयत्नांसाठीं वैचारिक जागृति आवश्यक

आमची शक्ति कमी पडली तर वेळ पडल्यास आपण नाहींसे होऊं, पण आम्ही कुणाचे गुलाम म्हणून राहणार नाहीं, या भावनेनें तुम्हीं काम केलें पाहिजे.

गरिबांना अधिक गरीब करावें यासाठीं तुम्हांला श्रमदानाचीं आवाहनें केलीं जात नाहींत. श्रीमंतानीं अधिक त्याग केला पाहिजे. त्यांनीं देश-भक्तींत कमीपणा दाखवूं नये हे खरें, पण या अग्निदिव्यांतून हिंदुस्थान चांगला राहिला तर तो गरिबांचें कल्याण साधणारा हिंदुस्थान राहणार आहे, याची जाणीव कामगारांनीं ठेवली पाहिजे. कामगारांनीं पोट बांधूनसुद्धां काम करायचा कंटाळा करतां कामा नये व श्रीमंतांच्या चुकारपणाचें निमित्त सांगतां कामा नये.

संघटना, योजना, सामर्थ्यसंपादन या कार्यांत शिथिलता येऊं देतां कामा नये. ही लढाई शब्दांनीं जिंकतां येणार नाहीं. प्रत्येक नागरि-काच्या सामर्थ्यावरच ती जिंकावयाची आहे. आणि हें सामर्थ्य लढाईंत लढण्याचें जसें हवें तसें लढाईचा ताण सहन करण्याचेंहि हवे. चीननें हल्ला केला कीं लढाई, आणि त्यानें युद्धविराम केला कीं, लढाई संपली, असें मानणें योग्य ठरणार नाहीं.

—यशवंतराव चव्हाण

चिनी आक्रमणामुळें देशांत जागृति झाली खरी; पण संरक्षणविषयक प्रयत्न जाणीवपूर्वक व्हावयाला पाहिजे असतील तर त्यासाठीं या प्रश्नां-संबंधींची वैचारिक जागृति होणें आवश्यक आहे. चिनी आक्रमणाकडे केवळ सरहद्दीचा तंटा म्हणून पाहणारे कांहीं लोक आहेत तर या आक्रमणाचा आणखी कांहीं सखोल अर्थ आहे असें मानणारे कांहीं लोक आहेत. मी चिनी आक्रमण हा केवळ सरहद्दीचा तंटा आहे असें मानीत नाहीं. या आक्रमणाचा कांहीं निराळा अर्थ आहे अशी माझी खात्री आहे. तरी सुद्धां याबाबतींत पोथीनिष्ठ रहावें अशी माझी वृत्ति नाहीं.

—यशवंतराव चव्हाण

अनुक्रम

१.	सूत उवाच	१
२.	एक भूमिका	२
३.	आक्रमणाचा इतिहास	३
४.	आक्रमण कां केलें ? – कां थांबवलें ?	७
५.	चीनचें राजकीय अंतरंग	९
६.	साम्यवादाचा विचार	१०
७.	साम्यवादाचा आचार	१२
८.	रशिया आणि चीन	१५
९.	आर्थिक पार्श्वभूमि	१९
१०.	भारत आणि चीन : आर्थिक तुलना	२२
११.	निरंतरचा प्रश्न	२४
१२.	आपलें परराष्ट्रीय धोरण	२८
१३.	संरक्षणाची आर्थिक बाजू	३२
१४.	संरक्षणासाठीं विकास	३४
१५.	आणखी कांहीं आर्थिक अंगें	३७
१६.	समाजवादी समाजरचना	४०
१७.	लोकशाही जाग्रति	४७
१८.	युद्धप्रयत्नांतील आपलें स्थान	५२
	परिशिष्टें – १.	५६
	२.	६१
	३.	६३
	नकाशे	६९

१. सूत उवाच

'हिंदी चिनी भाई भाई' अशी घोषणा आपण अनेक वर्षे केली. अगदीं मनापासून केली.

भारताचे आणि चीनचे प्राचीन काळापासूनचे सांस्कृतिक ऋणानुबंध आहेत. बौद्ध धर्म भारतांत उदय पावला आणि नंतर चीननें त्याचा स्वीकार केला.

हीं दोन्ही राष्ट्रें एकमेकांचीं शेजारीहि आहेत.

या भूमिकेवरून भारतानें चीनशीं हार्दिक मैत्री जोडण्याचे प्रयत्न केले.

यासाठीं नेत्यांच्या, सांस्कृतिक मंडळांच्या परस्पर भेटींगाठीं, सत्कार तर झालेच परंतु आपली स्नेहाची भूमिका भारतानें त्याहूनहि भरीवपणें स्पष्ट केली.

राष्ट्रसंघांत (UNO) चीनला प्रवेश मिळावा यासाठीं अमेरिकेचा रोष पत्करूनहि भारत प्रयत्नशील राहिला.

चीननें तिबेटवर केलेल्या आक्रमणानंतरहि भारतानें कडव्या विरोधाची भूमिका घेतली नाहीं.

जागतिक राजकारणांत जवळजवळ वाळींत पडलेल्या त्या राष्ट्राला बांडुंग परिषदेंत सहभागी करून आंतर राष्ट्रीय मान्यता मिळवून दिली.

आपल्या उत्तर सीमेवर चीनचें अधिकाधिक आक्रमण होत असतांहि त्याच्य शीं सलोख्याच्या वाटाघाटी करून हा प्रश्न सुटेल अशी मनांत आशा बाळगून त्याला अनुरूप असेंच आपलें धोरण ठेवलें.

असें असतांहि ८ सप्टेंबर १९६२ रोजीं मोठ्या प्रमाणावर सर्व उत्तर-सरहद्दीवर लष्करी आक्रमण करून चीननें भारताचा विश्वासघात केला.

कदाचित् आंतर राष्ट्रीय राजकारणाच्या व्यवहारांत इतका साधाभोळा विश्वास आपण ठेवला हीच आपली चूक झाली असावी. ती चूक होती कीं नव्हती याची चिकित्सा हें संकट संपल्यानंतर करतां येईल. तशी ती केली जाणारहि आहे. आज त्या चर्चेंत आपण शिरण्याचें कारण नाहीं.

आजच्या परिस्थितींत आपल्या देशाचें स्वातंत्र्य व आपली लोकशाही यांच्या रक्षणासाठीं आपण काय करूं शकतो व केलें पाहिजे हा आज खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

त्याच दृष्टीनें आपण या प्रश्नाचा विचार करणार आहोत.

० ० ०

एक गोष्ट आपण मनाशीं स्पष्ट करणें उचित होईल.

'आमचा विरोध चिनी जनतेशीं नाहीं.' असें विधान कांहीं वेळां केलें जातें.

अनेकांना असें विधान आवडत नाहीं. कारण त्यामुळें युद्धकाळांत लढाईसाठीं लागणारा त्वेश-द्वेष कमी होतो असें त्यांना वाटतें. अजाण जनतेच्या दृष्टीनें यांत कांहीं तथ्यहि आहे. परंतु विचारशील कार्यकर्त्यांनीं आपले विचार स्पष्ट ठेवले पाहिजेत.

'आमचा विरोध जनतेशीं नाहीं, सरकारशीं आहे,' असें विधान युद्धकाळांत अनेकदां राजकीय धोरणाच्या दृष्टीनेंहि केलें जातें. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत 'आमची लढाई जर्मन जनतेशीं नाहीं, तेथील नाझी राजवटीशीं आहे' असा प्रचार रशियानें केला होता जनता आणि सरकार यांत फूट पाडण्याची शक्यता या प्रचारानें साधतां येते.

आपल्या घोषणेमागें आजतरी ही अपेक्षा नाहीं. मग ही भूमिका आपण कां घेतो ? त्याचीं दोन कारणें संभवतात.

'माझा लढा ब्रिटिश जनतेशीं नाहीं, ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं आहे' असें गांधीजी ज्या विशुद्ध भावनेनें म्हणत असत त्या परंपरेचे आपण वारस आहोंत.

दुसरें असें कीं चीनमधील राजवट ही साम्यवादी हुकूमशाही राजवट आहे. हुकूमशाही राजवटींत सारे लोक एका तालांत चालत आहेत, बोलत आहेत असें आढळलें तरी त्यांचीं मनें राजवटीशीं एकरूप झालेलीं असतातच असें नाहीं. स्टालिनच्या राजवटीशीं रशियन जनतेचीं मनें एकरूप झालीं नव्हतीं, असें स्टालिनच्या मृत्यूनंतर आढळून आलें. स्टालिनची सर्वंकष हुकूमशाही तीस वर्षें अस्तित्वांत राहूनदेखील ही परिस्थिति होती. चिनी साम्यवादी हुकूमशाही अस्तित्वांत आल्याला आतांशीं कोठें तेरा-चौदा वर्षें होत आहेत. चिनी जनतेचीं मनें त्या हुकूमशाहीनें एवढ्यांत आत्मसात् केलीं आहेत असें कसें मानता येईल ? अर्थात् प्रत्यक्ष व्यवहारांत सरकार व जनता हा भेद आजच्या काळांत फारसा उपयोगी नाहीं. परंतु वस्तुस्थितीची यथार्थ जाणीव असावी या दृष्टीनें या भेदाचें अवधान ठेवणें योग्य होईल. कारण पुढें-

मागें चिनी राजवटीचें स्वरूप बदललें, तेथें समंजस लोकशाही राजवट अस्तित्वांत आली, तर चीनशीं आपले संबंध पुन्हा सुधारूं शकतील. तिथल्या जनतेबद्दल आपल्या मनांत कांहीं द्वेष वा तिरस्कार आहे, म्हणून आज आपण त्यांच्याशीं लढत आहोंत असें मुळींच नाहीं; तर चिनी सरकारनें विश्वासघातानें आक्रमण केलें, आपला प्रदेश बळकावला, तो परत जिंकून घेण्यासाठीं आपल्याला हें युद्ध करावें लागत आहे. देशाचें स्वातंत्र्य व स्वाभिमान अबाधित ठेवता येऊन जर आपणाला इतरांशीं सलोख्याचे, प्रेमाचे, शांततामय संबंध राखता आले तर तें आपल्याला हवेंच आहे.

० ० ०

३. आक्रमणाचा इतिहास

१ ऑक्टोबर १९४९ रोजीं चिनी प्रजासत्ताकाची स्थापना झाली. त्याच वर्षी ३० डिसेंबर रोजीं भारतानें चीनच्या नव्या राजवटीला मान्यता दिली.

यानंतरच्या काळांत भारतानें स्नेहाच्या व न्यायाच्या भावनेनें साम्यवादी चीनला राष्ट्रसंघांत स्थान मिळावें म्हणून प्रयत्न केले. ७ ऑक्टोबर १९५० रोजीं चिनी सैन्य तिबेटमध्यें घुसल्यानंतरहि भारतानें आपली भूमिका बदलली नाहीं.

२९ एप्रिल १९५४ रोजीं भारत-तिबेट संबंधांबाबतचा आठ वर्षांचा करार चीन सरकारबरोबर करण्यांत आला. भारतानें आपले तिबेटांतील सर्व विशेषाधिकार सोडले.

२५ जून १९५४ रोजीं चीनचे पंतप्रधान चौ एन् लाय भारत भेटीसाठीं दिल्लींत आले. २८ जून रोजीं चौ एन् लाय व पं. नेहरू यांच्या संयुक्त पत्रकांत भारत-तिबेट कराराच्या प्रस्तावनेंत अंतर्भूत करण्यांत आलेल्या पंचशील तत्त्वांचा पुनरुच्चार करण्यांत आला. तीं तत्त्वें अशीं :

(१) परस्परांच्या सार्वभौमत्वाविषयीं व प्रादेशिक एकात्मतेविषयीं पूर्ण आदर. (२) एकमेकांवर आक्रमण न करणें. (३) एकमेकांच्या अंतर्गत

व्यवहारांत हस्तक्षेप न करणें. (४) एकमेकांशीं समानतेची वागणूक व सहकार्य. (५) शांततापूर्ण सहजीवन.

या संयुक्त पत्रकानंतर लवकरच सरहद्दीच्या रेषेविषयीं चीननें कुरबुरींना व छुप्या आक्रमक पावलांना सुरुवात केली. या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं पत्रें-पत्रकें, भेटी-प्रतिभेटी, अधिकाऱ्यांतील वाटाघाटी यांचें पर्व सुरू झालें. चीनकडील नकाशे चँग-कै शेकच्या कोमिंटांग राजवटीनें तयार केलेले आहेत व ते दुरुस्त करावयास नव्या राजवटीला सवड झालेली नाहीं अशी भूमिका चीन सुरवातीला घेत असे. चीनचीं आक्रमक पावलें या सर्व काळांत पुढें पडतच होतीं.

२३ जानेवारी १९५९ रोजीं पं. नेहरूंना पाठवलेल्या उत्तरांत चौ एन् लायनीं ही भूमिका सोडली व स्पष्टपणें कळवलें कीं, (१) चीन–भारत सरहद्द अधिकृतरीत्या कधींच ठरली नव्हती, पण हा प्रश्न १९५४ सालीं उपस्थित न करण्याचें कारण त्यावेळची परिस्थिति त्याला योग्य (ripe) नव्हती, (२) मॅकमहॉन रेषा चीननें अधिकृतपणें केव्हांहि मान्य केली नव्हती. (३) चीनचे नकाशे योग्यच आहेत.

(१८१४ सालीं भारत, चीन व तिबेट या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं हिमालय प्रदेशांतील निश्चित केलेली सीमारेषा मॅकमहॉन रेषा म्हणून ओळखली जाते. मॅकमहॉन हा त्या परिषदेंत भारताच्या ब्रिटिश सरकारचा प्रतिनिधि होता. पर्वताच्या शिखररेषांवरून जाणाऱ्या पाणलोटाच्या (watershed) आधारें ही रेषा निश्चित करण्यांत आली.)

या उत्तराचाच अर्थ असा कीं, परंपरेनें चालत आलेली प्रत्यक्ष वहिवाटींत असलेली भारताची सरहद्द चीननें अमान्य केली, १९५४ चा करार मोडला व भारताच्या ५०,००० चौरस मैल प्रदेशावर हक्क सांगितला.

यानंतर चिनी आक्रमण वेगवेगळ्या ठिकाणीं होतच होतें. तरीहि हा प्रश्न शांततेनें सोडवावा म्हणून १६ नोव्हेंबर १९५९ रोजीं भारतानें असें सुचविलें कीं, भारतीय सैनिक चीन सांगत असलेल्या सरहद्दीपर्यंत मागें घेतले जावेत व चिनी सैनिक जुन्या परंपरागत सरहद्दीपर्यंत मागें घेतले जावेत, म्हणजे चकमकी झडण्याचें टळेल. याचाच अर्थ वादग्रस्त मुलूख निर्लष्करी करावा अशी भारतानें तडजोडीची सूचना केली. चीननें ही सूचना फेटाळून लावली.

भारताच्या अक्साई चीन भागांत १९५७ मध्यें चीननें जो रस्ता बांधला होता त्याच्या पश्चिमेकडे आणि दक्षिणेकडे पुढें सरकून आणखी कांहीं रस्ते चीननें बांधले.

यानंतर पुन्हा आक्रमणें, पत्रें-पत्रकें व अधिकाऱ्यांच्या भेटीगाठीं सुरू राहिल्या. १९६२ च्या सुरुवातीपासून आक्रमणाची गति वाढत राहिली. भारताचा सुमारें १२००० चौरस मैलांचा प्रदेश सुरुवातीपासून ते ८ सप्टेंबर ६२ पर्यंतच्या काळांत चीननें व्यापला होता.

८ सप्टेंबर १९६२ रोजीं लडाख भागांत चीननें मोठ्या प्रमाणावर चढाई केली. २० ऑक्टोबर रोजीं नेफा भागांत जोराचा हल्ला केला. लडाखच्या बाजूलाहि आगेकूच सुरू ठेवली. नंतरच्या चार पांच दिवसांत नेफामधील तवांग, बोमदीला इत्यादि ठाणीं पडलीं. लडाख भागांत चीननें चुशूलपर्यंतचा प्रदेश जिंकला.

२४ ऑक्टोबर रोजीं चीननें भारतीय व चिनी सेनांनीं वीस वीस किलोमिटर मागें सरकावें अशी सूचना केली. भारतानें ती फेटाळली व ८ सप्टेंबर १९६२ च्या आधीं चिनी सेना होती तेथपर्यंत चीननें मागें जावें असा आग्रह धरला.

२३ नोव्हेंबर रोजीं चीननें एकतर्फी शस्त्रसंधि पुकारला व असें म्हटलें कीं चीन ६ नोव्हेंबर १९५९ रोजीं चीनचा प्रत्यक्ष ताबा असलेल्या रेषेपर्यंत (actual line of control) मागें जायला तयार आहे व भारतानें सर्व आघाड्यांवर वीस किलो मीटर मागें जावें.

चीननें प्रथम ८ सप्टेंबर १९६२ च्या रेषेच्या मागें जावें अशी भारताची मागणी असतांना चीन तर ६ नोव्हेंबर १९५९ च्या रेषेपर्यंत मागें फिरावयास तयार आहे अशी सकृत्दर्शनी घोटाळ्याची वाटणारी परिस्थिति यांतून निर्माण होते. हा घोटाळा चीनची 'प्रत्यक्ष ताबारेषे'ची कल्पना तपासून पाहिली म्हणजे दूर होतो. कारण त्या ताबारेषेप्रमाणें चीनच्या ताब्यांत भारताचा एकूण २०,००० चौरस मैल प्रदेश जातो तर ८ सप्टेंबर १९६२ च्या रेषेपर्यंत चीन मागें सरकल्यास त्याच्या ताब्यांत आपला १२००० चौरस मैल प्रदेश राहतो (परिशिष्टांत दिलेला नकाशा पहा.)

भारतानें ही सूचना फेटाळली. पंतप्रधान नेहरू यांनीं आपल्या पत्रांत म्हटल्याप्रमाणें, 'शेंदोनशें किलोमीटर आघाडी मारायची आणि नंतर २० किलोमीटर मागें जायची तयारी दाखवायची हिला कांहीं विधायक सूचना म्हणता येणार नाहीं.' या वृत्तीला, एखादा विजेता जी वृत्ति धारण करतो, ती वृत्ति म्हणायचें नाहीं तर मग काय म्हणायचें हें मला माहीत नाहीं' असेंहि पं. नेहरूंनीं आपल्या पत्रांत म्हटलें आहे. त्याचा अर्थहि स्पष्ट आहे.

भारत-चीन लढ्यांत कोणाचीहि बाजू न घेतां सीलोननें हा प्रश्न शांततेनें सुटावा यासाठीं प्रयत्न चालविला होता. कोलंबो येथें ता. १० डिसेंबर १९६२ रोजीं आशिया-आफ्रिकांतील सहा राष्ट्रांची (सीलोन, ब्रह्मदेश, कंबोडिया, इंडोनेशिया, घाना, यू. ए. आर.) परिषद भरली होती. तिचें अध्यक्षपद सीलोनच्या पंतप्रधान सीरिमाओ बंदरनायके यांनीं स्वीकारलें होतें. या राष्ट्रांनीं तडजोडीसाठीं सुचविलेला मसुदा 'कोलंबो योजना' म्हणून ओळखला जातो.

भारतानें ही योजना स्वीकारलेली आहे. चीननें ती स्वीकारलेली नाहीं. आंतर राष्ट्रीयदृष्ट्या प्राप्त परिस्थितींत तटस्थ राष्ट्रांना देखील आज कोणती भूमिका समजूतदारपणाची वाटते हें या योजनेवरून स्पष्ट होतें. ती योजना अशी :

(१) पाश्चिम विभाग :

(अ) चीननें स्वतः सुचविल्याप्रमाणें आपलीं लष्करी ठाणीं २० किलोमीटर मागें घ्यावींत.

(ब) भारतानें आपली लष्करी परिस्थिति आहे तशीच कायम ठेवावी.

(क) मधील टापू निर्लष्करी ठेवावा. त्याचा कारभार उभय पक्षांच्या मुलकी ठाण्यांनीं एकमेकांच्या पूर्व हक्काला बाध न आणतां पूर्ण करावा.

(२) पूर्व विभाग : उभय पक्षांनीं मान्य केलेली प्रत्यक्ष नियंत्रणाची रेषा ही युद्धविराम रेषा ठरवावी असे परिषदेला वाटते. ह्या भागांतील उरलेल्या टापूबद्दल आणखी चर्चा करून ठरवावे.

(३) मध्यविभाग : येथील प्रश्न बळाचा वापर न करतां शांततेनें सोडवितां येतील.



४. आक्रमण कां केलें ?—कां थांबवलें ?

चीननें आक्रमण केलें याचें आपल्याला विश्वासघात म्हणून आश्चर्य वाटले तरी जगांत अनेकांना—किंबहुना भारतांतहि अनेकांना—ती अनपेक्षित अशी घटना नव्हती. परंतु या आक्रमणामागचे हेतु मात्र अद्यापीहि पूर्णपणें स्पष्ट झालेले नाहींत. या आक्रमणाची अनेकविध कारणमीमांसा करण्यांत येते. हे हेतु असे :

(१) हिमालयांतील सीमाप्रदेशाचा प्रश्न आपल्या इच्छेप्रमाणें आणि सोयीप्रमाणें सोडवून घ्यावा.

(२) कित्येकांच्या मतें चीनचें खरें लक्ष सिकियांग-तिबेट जोडणाऱ्या लडाखमधील अक्साई चीन भागांतील राजमार्गावर (highway) आहे. आपण बांधलेला तो रस्ता व त्याच्या जवळपासचा भाग निश्चितपणें आपल्या हातीं ठेवण्यासाठीं चीननें आक्रमण सुरू केलें असावें. नेफामध्यें आक्रमण करून ताब्यांत घेतलेला प्रदेश सोडून द्यायची तयारी दाखवायची व त्या बदल्यांत लडाखवरील आपल्या कबजाला भारताची मान्यता मिळवायची असा चीनचा इरादा असावा.

(३) आपलें लष्करी सामर्थ्य जगाला दाखवून भारताचा मानभंग करावा व विशेषतः हिमालय प्रदेशांतील (नेपाळ, सिक्कीम, भूतान) राज्यांना जरब बसवावी. तसेंच आशियाचें नेतृत्व आपल्याकडे ओढून घ्यावें.

(४) भारतांत आपल्याला अनुकूल अंतर्गत क्रान्तीचा उठाव होत असल्यास पहावें व त्याप्रमाणें पुढील पवित्रा ठाकावा.

(५) आसाम भारतापासून अलग काढून तेवढा प्रदेश आपल्या आधीन करून घ्यावा.

वरीलपैकीं एक किंवा अनेक कारणें चीनच्या आक्रमणामागें असूं शकतात. भारताची उत्तर सरहद्द असुरक्षित रहावी असा चीनचा स्पष्ट प्रयत्न दिसतो. हिमालयांतील नेपाळ, सिक्कीम, भूतान सारखीं राज्यें व नागाप्रदेश यांचें एक संघराज्य बनवावें व भारताला हिमालयापासून जवळजवळ अलगच करावा या दृष्टीनेंहि चिनी हस्तकांचें कार्य बरेंच दिवस चालू आहे.

चीनचें परराष्ट्रीय धोरणच आक्रमक विस्तारवादी असें आहे असें अनेक राजकीय निरीक्षकांनीं आजवर सांगितलें आहे. तें त्यांचें म्हणणें विश्वासार्ह वाटतें. या धोरणाचीं प्रमुख अंगें अशीं :

(१) राष्ट्रीय संरक्षणाचा विचार आपल्या मतप्रणालीच्या व राष्ट्रवादी अभिमानाच्या दृष्टीतून करावा. इतर राष्ट्रांतून साम्यवादी विचारसरणी वाढवावी व आपलें नेतृत्व आसपासच्या राष्ट्रांना मान्य करावयास भाग पाडावें.

(२) मात्र लष्करीदृष्ट्या बलवान् असलेल्या कुठल्याहि राष्ट्राबरोबर मोठें युद्ध अंगावर ओढून घेऊं नये.

(३) आसपासच्या राष्ट्रांतून आक्रमण करून पहावें; परंतु फार मोठा प्रतिकार होणार नाहीं किंवा बाजू आपल्या पूर्णपणें अंगलट येणार नाहीं अशा पद्धतीनें माघारीचा मार्ग मोकळा ठेवावा. अशा माघारीलाच 'शांततामय सहजीवना'चा प्रामाणिक प्रयत्न असें जगाची दिशाभूल करणारें गोंडस नांवहि देतां येतें.

(४) साम्यवादी राष्ट्रांच्याकडून आर्थिक मदत मिळवावी (कर्ज या नांवाखालीं भांडवलशाही राष्ट्रांकडून मिळाली तरी मिळवावी) परंतु रशियाचे लाचार होऊं नये. किंबहुना साम्यवादी गटांतील रशियाच्या नेतृत्वाला आव्हान द्यावें. असाच चीनचा जाणीवपूर्वक प्रयत्न आहे.

* * *

चीननें आक्रमण केलें यापेक्षांहि चीनला विजयामागून विजय मिळत असतांना चीननें तें थांबवलें, भारताचे युद्धकैदीहि परत केले, याचा साहजिकच अनेकांना अचंबा वाटला. चीनच्या परराष्ट्रीय धोरणाचे वर दिलेले पैलू पाहिले तर त्यांच्या संदर्भातहि या घटनेचा उलगडा कांहींसा होऊं शकतो.

यावेळीं चीननें आपलें आक्रमण थांबवलें याचा अर्थ तो पुन्हा आक्रमण करणार नाहीं असे नव्हे. किंबहुना केव्हांहि हल्ला होईल असें गृहीत धरून त्याचा प्रतिकार आपल्याला करावयासच हवा अशा भावनेनें आपण सदैव सिद्ध राहिलें पाहिजे.

आज चीन थांबला याचा अर्थ त्यानें मनाशीं ठरविलेले आक्रमणाचे प्राथमिक हेतू साध्य झाले असें त्याला वाटत असेल. किंवा चीनला अपेक्षित

असा उठाव भारतांतून झाला नाहीं. उलट भारत एक होऊन आक्रमणाच्या प्रतिकाराला उभा राहिला. तेव्हां आपण थांबलेलें बरें असें त्याला वाटलें असेल. किंवा भारतांचीं मित्रराष्ट्रें त्याच्या मदतीला तांतडीनें धावून आलीं असल्यानें आपण अधिक ताणल्यास त्यांतून फार मोठें युद्ध आपण अंगावर ओढवून घेऊं अशी भीतीहि चीनला वाटली असेल.

यापैकीं कोणत्याहि कारणानें चीन आज थांबला असला तरी चिनी सेना आजहि सीमाप्रदेशांतील आपल्या भूभागावर पाय रोखून उभी आहे. शत्रू केवळ अधिक अनुकूल संधीची वाट पहात आपल्या उंबरठ्याच्या आंत पवित्रा घेऊन सिद्ध आहे ही जाणीव आपण निरंतर मनांत वागवली पाहिजे.

० ० ०

५. चीनचें राजकीय अंतरंग

चीनच्या भारतावरील आक्रमणाची संगति लावतांना चीनचें राजकीय अंतरंग समजून घेणें अगत्याचें आहे. कारण त्या अंतरंगांतच या आक्रमणाचीं कांहीं बीजें साठवलेलीं आहेत. तसेंच या आक्रमणाला आपण प्राणपणानें विरोध कां केला पाहिजे, यार्चीहि कांहीं उत्तरें या अंतरंग-निरीक्षणांत सांपडूं शकतात. या अंतरंगाचीं प्रमुख अंगें अशीं :

(१) चीनला मार्क्स-लेनिन यांचा सनातन साम्यवाद मान्य आहे.

(२) स्टॅलिनच्या मृत्यूनंतर रशियानें केलेलें त्याचें अवमूल्यन चीनला मंजूर नाहीं.

(३) म्हणजेच मार्क्स-लेनिनप्रणीत विचार व स्टॅलिनप्रणीत आचार चीनला मान्य आहेत.

(४) साम्यवादाला रशिया निदान बाह्यतः देऊं पहात असलेलें वळण चीनला मान्य नाहीं. रशियाचें धोरण कचखाऊ, मिळणीजुळणीचें आहे असें चीनला वाटतें.

(५) साम्यवादी राष्ट्रांत अस्तित्वांत असते तशी हुकूमशाही चीनमध्यें अस्तित्वांत आहे.

आपल्यापुरतां या वैशिष्ट्यांचा अर्थ असा कीं इतर देशांत साम्यवादी क्रान्तीच्या दृष्टीनें हस्तक्षेप करणें चीनच्या विचारसरणींत नीट बसूं शकते. या आक्रमक हस्तक्षेपापासून आपल्याला आपला बचाव करायचा असेल व आपलें स्वातंत्र्य व लोकशाही टिकवून ठेवावयाचीं असतील तर संरक्षणाची पुरेशी सिद्धता आपण नेहमीं ठेवली पाहिजे.

हें अधिक स्पष्ट व्हावें या दृष्टीनें व तेवढ्यापुरताच कांहीं अधिक तपशील पाहूं.



६. साम्यवादाचा विचार

साम्यवादाचा उगम औद्योगिक क्रान्तीनंतरच्या एका विशिष्ट परिस्थितींत झाला. एका बाजूला संपत्तीचे ढीग रचले जात आहेत तर दुसऱ्या बाजूला श्रमिकांचें जीवन अधिकाधिक दीनवाणें होतें आहे ही औद्योगिक क्रांतीनंतरच्या सुरुवातीच्या कांहीं काळांतील स्थिति विचारवंतांना व्यथित करीत होती. श्रमिकांची स्थिति कशी सुधारतां येईल, हा प्रश्न सर्व सहृदय व्यक्तींच्या पुढें उभा होता. या वेदनेंतूनच साम्यवादाचा जन्म झाला आहे. साम्यवादाची मूळ प्रेरणा दलितांच्या विषयींच्या कळवळ्याची आहे, हें साम्यवादाचें फार मोठें बळ आहे. हा कळवळा ज्या समाजरचनेंत नाहीं ती समाजरचना साम्यवादाला कधींहि अंतिम उत्तर देऊं शकणार नाही हें साम्यवादाच्या विरोधकांनीहि ओळखलें पाहिजे.

परंतु पोटांत कळवळा असला तरी हातून जें घडतें तें नेहमीं हितावह घडतें असें नाहीं. कळवळा वाटणें ही एक गोष्ट आहे, उचित उपचार करणें ही दुसरी गोष्ट आहे. आणि ज्या विचारसरणीवर विश्वास ठेवून हे उपचार केले जातात तीच जर अपुरी किंवा चुकीची असेल तर केल्या जाणाऱ्या प्रयत्नांतून कांहीं मंगल निर्माण होण्याऐवजीं भलतेंच कांहीतरी निर्माण होतें.

नरकाकडे जाणारा रस्ता अनेक वेळां अशा रीतीनें सद्हेतूच्या पायऱ्यांनीं घडविला गेला आहे.

मानवतेच्या मांगल्यासाठीं प्रयत्न करणाऱ्या विविध धर्मांच्या अनुयायांनीं वेड्या धर्मश्रद्धेच्या आहारीं जाऊन अनन्वित अत्याचार केलेले जगाच्या इतिहासांत आढळून येतात. साम्यवादी लोकांचा धर्मावर विश्वास नसला, किंबहुना ते धर्माला अफूची गोळी मानत असले, तरी त्यांची मार्क्सवादावरील श्रद्धा ही एक धार्मिक श्रद्धाच आहे. तितकीच कडवी आणि तितकीच भयंकर !

अशा प्रत्येक सश्रद्ध माणसाचे कांहीं अढळ विश्वास असतात. त्यापैकीं कांहीं पुढीलप्रमाणें मांडतां येतील —

(१) आपला पंथ हाच एकमेव सत्पंथ आहे असें तो मानीत असतो. अन्य पंथाचे लोक हे त्याच्या दृष्टीनें एकतर दुष्ट तरी असतात नाहींतर निदान मूर्ख तरी असतात.

(२) विश्वरचनेचें अंतिम रहस्य फक्त आपल्या पंथाच्या प्रेषिताला समजलेलें आहे असा त्याचा दृढ विश्वास असतो.

(३) आपल्या विचारसरणीप्रमाणें समाजांत बदल घडवून आणीत असतांना मध्यंतरींच्या काळांत जयपराजय कितीहि झाले, आपले स्वतःचे कितीहि हाल झाले किंबहुना प्राणहि गमवावे लागले, तरी शेवटीं आपल्याच पंथाचा विजय आहे असा त्याचा दृढविश्वास असतो. शेवटीं 'आपल्या' ईश्वराचें राज्य सर्वत्र होणार आहे असें धर्मपंथ मानतात. जगांत शेवटीं सर्वत्र साम्यवादी क्रांति होणारच अशी दृढश्रद्धा साम्यवादी लोक बाळगतात. त्यामुळें मधून मधून पराभव झाले, माघार घ्यावी लागली तरी त्यांचें त्यांना कांहीं वाटत नाहीं. त्यांची जिद्द कमी होत नाहीं.

हा कडवेपणा, हा निर्धार, ही अंतिम विजयाची निश्चिति, मार्क्सनें आपल्या मांडणींतून आपल्या अनुयायांना दिली. साम्यवाद हवा आहे, इतकेंच नव्हे तर तो अटळ आहे, असें त्यानें दाखवून दिलें. साम्यवादाला विरोध करणाऱ्या गटांचा निःपातच केला पाहिजे असें सांगितलें. क्रांतिकाळांतील हुकूमशाहीचें समर्थन केलें. साम्यवाद केवळ एका राष्ट्रांत येऊन भागणार नाहीं, तो सर्व जगांत प्रसार पावला पाहिजे व पावेल असें सांगितलें. आणि साम्यवादाचा

अंतिम विजय हा आर्थिक क्रांतीच्या ऐतिहासिक गतिचक्रामुळेंच अटळ आहे हें दाखवून अंतिम विजयाचा विश्वास अनुयायांच्या मनांत निर्माण केला.

एखादी धर्मश्रद्धा ती याहून काय वेगळी असते? साम्यवादी क्रांति सुप्रतिष्ठित झाल्यानंतर संपूर्ण समता स्थापन होईल, प्रत्येकानें आपल्या शक्ती-प्रमाणें समाजासाठीं काम करावें व आपल्या गरजेप्रमाणें समाजाकडून घ्यावें अशी परिस्थिति अस्तित्वांत येईल; मध्यंतरीच्या काळांत निर्माण झालेली हुकूमशाही लोप पावेल, इतकेंच नव्हे तर राज्यसंस्थेचादेखील निरास होईल व खऱ्या अर्थानें व्यक्तिस्वातंत्र्य अस्तित्वांत येईल असें स्वप्नहि त्यानें रंगवलें.

परंतु स्वप्न आणि सत्य यांमध्यें फार मोठें विदारक अंतर प्रत्यक्ष इतिहासांत पडलें. रशियाचा इतिहास तें दाखवतो आहे. पण अजूनहि कडवे साम्यवादी त्याच कडव्या 'धर्म' निष्ठेनें आपले आचार चालवीत आहेत. चीन हें एक कडवें, अतिजहाल साम्यवादी राष्ट्र म्हणून आजच्या साम्यवादी राष्ट्रांतहि ओळखलें जातें. भारतांत साम्यवादी क्रांति घडवून आणणें हें आपलें इतिहासदत्त कार्य आहे व त्यासाठीं आपण बाहेरून आक्रमणाचा रेटा लावून मदत केली पाहिजे, अशी विचारसरणी ही अशा राष्ट्राची एक स्वाभाविक सहजसिद्ध विचार-सरणी असते. अशा राष्ट्रावर निर्भर विश्वास टाकणें म्हणजे कडव्या साम्यवादाचें स्वरूप आपल्याला समजलेलें नाहीं असें कबूल करण्यासारखें आहे.

o o o

७. साम्यवादाचा आचार

मानवमात्राला सुखी करावें या प्रतिज्ञेनें पुढें सरसावलेल्या साम्यवादाच्या आचारांत, मानवाचें काय झालें?

साम्यवादी राष्ट्रांचें आर्थिक उत्पादन वाढलें. त्या राष्ट्रांतील आर्थिक विषमता कांहीं अंशीं कमी झाली. त्या राष्ट्रांचें लष्करी सामर्थ्यहि वाढलें. परंतु नागरिक सुखी झाला का?

साम्यवादी राष्ट्रांबाबत उपलब्ध असलेल्या माहितीवरून असें म्हणतां येईल कीं तेथें संपूर्ण आर्थिक समता अस्तित्वांत आली नाहीं. पण साम्यवादी क्रांतीनंतर संपूर्ण आर्थिक समता ताबडतोब स्थापन करतां येईल असा दावा साम्यवाद्यांनीं कधीं केलेला नसल्यामुळें ही उणीव म्हणून सांगतां येणार नाहीं.

परंतु भांडवलशाही नष्ट केली, भांडवलदारांचा नायनाट केला तरी खऱ्या अर्थानें वर्गहीन समाजरचना मात्र अस्तित्वांत आली नाहीं. शासक, नियंत्रक, तंत्रज्ञ यांचा एक वेगळा वर्ग समाजांत वाढूं लागला. त्याला विशेष सवलती, विशेष अधिकार, विशेष धन मिळूं लागलें. हा वर्ग वंशपरंपरागत नाहीं एवढेंच परंतु एरवी जाचक वाटणारीं वर्गवैशिष्ट्यें या वर्गाच्याहि बाबतींत दिसून आलीं आहेत. समाजापासून आपण वेगळे, विशेष कोणी आहोत अशी जाणीव असणारा वर्ग कोणत्याहि रीतीनें अस्तित्वांत आला तरी वर्गहीन समारचनेच्या आदर्शाच्या दृष्टीनें तें विघातकच होय. या वर्गाची निर्मिति साम्यवादी राष्ट्रें टाळूं शकलेलीं नाहींत.

साम्यवादी राष्ट्रांत मुख्य भर भांडवलसंचयावर असल्यामुळें राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणांत जनतेचें प्रत्यक्ष जीवनमान सुधारत नाहीं. परंतु तें जीवनमान अगदींच सुधारत नाहीं असें म्हणणें योग्य होणार नाहीं. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या प्रमाणांत वाढत नाहीं इतकेंच. त्या राष्ट्राचें वाढतें लष्करी सामर्थ्यहि याच भांडवलसंचयाच्या आधारें लष्करी महत्त्वाचे उद्योगधंदे काढून (पोलाद, रासायनिक द्रव्यें, यंत्रनिर्मिती व कारखाने इत्यादि) वाढवलेलें असतें.

साम्यवादी राष्ट्रांत लोकशाहीचा पूर्ण लोप झालेला असतो, हा साम्यवादी समाजरचनेवरील सर्वांत मोठा आक्षेप आहे. लोकशाही मूल्यांचें जतन करूं पाहणाऱ्या भारतासारख्या राष्ट्रांतील जनतेनें हा आक्षेप स्पष्टपणें समजून घेणें आवश्यक आहे.

साम्यवादी क्रांति झाली कीं, कामगारवर्गाची हुकूमशाही अस्तित्वांत येते. तें अर्थात् पोथीबंद मार्क्सवादाला धरून आहे. अनेक राष्ट्रांतील अशा क्रान्त्यांचा इतिहास असे दाखवतो कीं, विरोधकांचें सरसहा शिरकाण करण्यांत येतें. त्यांत अक्षरशः लक्षावधि लोक बळी जातात व हें हत्याकांड संपल्यानंतरहि प्रतिक्रांतिकारक म्हणून कोणावर केव्हां पोलिसांची धाड

येईल याचा नियम नसतो. अटक झाल्यानंतर त्याला सक्तमजुरीसाठीं श्रमिक छावण्यांतून (Concentration Camps) पाठविण्यांत येईल कीं ठार करण्यांत येईल, याची निश्चिति नसते. न्यायालयांत उभे करण्यांत येईलच असें नाहीं. केलें तरी अनेकविध छळानें भर कोर्टात कबुलीजबाब वदवून घेण्याचें तंत्रहि या राष्ट्रांनीं आत्मसात् केलेलें आहे. आपले साधे विचार मोकळेपणानें सांगण्याची चोरी होते. कारण कोण मनुष्य गुप्तहेर असेल, तो आपल्याविषयीं काय सांगेल, व त्याचे परिणाम काय होतील, अशी सारखी भीति मनाला वाटत असते.

मनांतले विचार खाजगींत बोलतां येत नाहींत, मग त्यांचा प्रकट भाषण-लेखनाच्याद्वारें प्रचार करणें तर दूरच राहिलें. समविचारांच्या लोकांची संघटनाहि अशक्यच. कारण, देशांत फक्त एक साम्यवादी पक्ष तेवढा अस्तित्वांत असतो. इतर संघटनांना बंदी असते.

अशा वातावरणांत कोणता नागरिक खऱ्या अर्थानें सुखी असूं शकेल ? या दुःखाची जाणीव राहणार नाहीं अशी बोथट मनें प्रचारानें कांहीं प्रमाणांत तयार करतां येतात. हुकूमशहा हाच देव व तो करतो तेंच इष्ट अशी वृत्तिहि जनतेच्या मनांत बाणवण्याचा प्रयत्न करतां येतो. तो यशस्वी झाला तर त्या राष्ट्रासारखें दुर्दैवी राष्ट्र तेंच. नरकांतदेखील जे सुखी राहूं शकतात त्यांना सुखी म्हणावयाचें कीं दुर्दैवी म्हणावयाचें ?

साम्यवादी राष्ट्रांत अशी हुकूमशाही अस्तित्वांत असते याविषयीं आतां सहसा कोणी वाद घालत नाहीं. रशियांतील स्टालिनची राजवट जुलमी हुकूमशाहीची होती अशी कबुली खुद्द खुश्योव्हनेंच दिल्यामुळें तो प्रश्न रशिया पुरता मिटला आहे. खुश्योव्हच्या काळांत यांत कांहीं फरक पडला असला तरी फार पडला आहे असें मानावयाचें कारण नाहीं. याचें एक साधें गमक स्टालिनचें अवमूल्यन रशियांतील सर्व जनतेनें ज्या निमूटपणें आणि निर्विकार एकचालीनें स्वीकारलें तेंच आहे ! लोकशाही राष्ट्रांत अवमूल्यन झालेल्या नेत्याच्या बाजूनें निदान कांहीं आवाज तरी उठले नसते काय ? हुकूमशहा बदलला म्हणून कांहीं हुकूमशाहीचा अंत होत नाहीं.

चीनमध्यें याचीच आवृत्ति आहे. क्रान्तिनंतर चीनमध्येंहि मोठ्या प्रमाणावर हत्याकांड झालें. आजहि विरोधकांना निर्घृणपणें नेस्तनाबूद करण्यांत येत

आहे. आपल्याला व्यक्तिस्वातंत्र्य हवें आहे असें दर्शविणारें एक भाषण कांहीं वर्षांपूर्वी माओत्से-तुंगनें केलें. 'अनेकविध फुलें फुलूं देत' (Let a hundred flowers bloom) हें त्या भाषणाचें घोषवाक्य व सार होतें. प्रत्यक्षांत काय घडलें? या धोरणाचा आधार घेऊन लोक मोकळेपणानें टीका करूं लागतांच हें धोरण मागें घेण्यांत आलें. आणि ज्यांनीं मध्यंतरींच्या काळांत सरकारवर टीका केली होती ते नेमके सांपळ्यांत सांपडल्यासारखे झाले.

साम्यवादी राष्ट्रांत फक्त एकच स्वातंत्र्य असतें: सरकारच्या सुरांत सूर मिळवून बोलण्याचें, लिहिण्याचें, कलानिर्मिति करण्याचें. सरकारचा सूरहि नेहमीं एकच असेल असें नाहीं. त्या पट्टींचे अवधान सारखें ठेवलें पाहिजे. नाहींतर तुम्ही डावीकडे झुकणारे (left deviationists) उजवीकडे झुकणारे (right deviationists) अशा सदराखालीं सरकारच्या रोषाला पात्र झालाच म्हणून समजावें. सरकारचा सूर हा देखील सरकारचा किंवा साम्यवादी पक्षाचा सूर असण्याऐवजीं एखाद्या स्टालिनचा नाहींतर माओचाच सूर बहुधा असतो! याहून अधिक भयंकर अशी परिस्थिति कोणती असूं शकेल.

भारतांत असलें वातावरण नसावें म्हणून तर साम्यवादाला व साम्यवादी चीनला आपला प्रखर विरोध आहे.

वाचनालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..... दि: .....
क्रमांक ..... वर्ग दि: .....

८. रशिया आणि चीन

रशिया आणि चीन यामधील आजचे संबंध पाहणें उद्‌बोधक होईल. एकतर त्यामुळें चीनमधील साम्यवादाची भूमिका स्पष्ट होईल. त्याचप्रमाणें भारत-चीन संघर्षांत रशियाची भूमिका सामान्यपणें काय राहील याचा अंदाज घेतां येईल.

दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या काळांत साम्यवादी जगांत रशियाचें नेतृत्व अबाधित चालत आलें होतें. त्या महायुद्धानंतरहि तें नेतृत्व बहुतांश तसेंच चालू राहिलें. युगोस्लाव्हियानें आपला स्वतंत्र मार्ग स्वीकारल्यानंतर या नेतृत्वाला पहिला तडा गेला. पुढें चीनमध्यें साम्यवादी राजवट आली. साम्यवादी चीन रशियाचा उपग्रह म्हणून कधींच वावरला नाहीं. गेल्या पांच वर्षांत तर या दोघांमध्यें साम्यवादी आचारविचारांच्या बाबतींतील मतभेद वरचेवर स्पष्ट होऊं लागलेले आहेत. या मतभेदांचें वर्णन खुश्चोव्ह 'कौट्टिंबिक कुरबुरी' म्हणून करत असला तरी चीननें अल्पावधींच्या काळांत रशियाच्या साम्यवादी गटांतील नेतृत्वाला आव्हान दिलें आहे यांत शंका नाहीं. या परिस्थितींतून शेवटीं काय निष्पन्न होईल तें आतांच सांगणें मोठें कठीण आहे. परंतु ती परिस्थिति आपण समजून घेतली पाहिंजे.

स्टॅलिनच्या मृत्यूला आता बरोबर दहा वर्षें उलटलीं आहेत. या दहा वर्षांच्या काळांत रशियांत कांहीं गोष्टी पूर्वीप्रमाणेंच राहिल्या आहेत. अजूनहि उत्पादनाचीं सर्व साधनें सरकारच्याच हातीं आहेत. कम्युनिस्ट पक्षच सरकार चालवतो. निवडणुका पूर्वीसारख्याच नाममात्र आहेत. परंतु तसें असलें तरीहि कांहीं बदल झाले आहेत. पूर्वीचा केंद्रीकरणावरचा भर कमी करण्यांत आला आहे. शेतीउत्पादनावर भर देण्यांत आला आहे. पूर्व युरोपमधील साम्यवादी राष्ट्रांवरील पकड स्टालिनच्या काळापेक्षां थोडी ढिली करण्यांत आली आहे. उपभोगाच्या वस्तूंच्या उत्पादनाचें प्रमाण वाढविण्यांत आलें आहे.

क्रान्तीनंतर ४० वर्षांनीं रशियाला हा जो फरक करतां आला तो चीनला आजच्या परिस्थितींत जमण्यासारखा नाहीं. परंतु दोघांमधील खरा मतभेदाचा मुद्दा साम्यवादी गटांत नसलेल्या राष्ट्रांबाबत कोणतें धोरण ठेवावें हा आहे. खुश्चोव्हचें सध्याचें धोरण शांततामय सहजीवनाचें आहे. हें धोरण चीनला मान्य नाहीं. ही विचारसरणी चीनला मऊ, फेरवादी (revisionist) वाटते, जागतिक क्रांतीवर विश्वास ठेवणाऱ्या साम्यवादी विचारसरणीच्या आदेशाप्रमाणें खरी क्रान्तिकारक (revolutionary) वाटत नाहीं. आजच्या अण्वस्त्रांच्या काळांत आपण आपली पूर्वीची नीति बदलली पाहिजे असें रशियाचें म्हणणें आहे तर अण्वस्त्रांच्या

युद्धाचा धोका पत्करूनहि आपण जागतिक क्रांतीसाठीं क्रियाशील राहिलें पाहिजे असा चीनचा आग्रह आहे.

साम्यवादी जगाचें आजपर्यंतचें एकमुखी नेतृत्व आतां यामुळें विभागलें गेलें आहे. चीनची भूमिका कडवी आहे. आज साम्यवादी गटांत आपण अल्पसंख्य आहोंत याची जाणीव चीनला आहे. परंतु आज आम्ही अल्पसंख्य असलों तरी उद्यां बहुसंख्य राष्ट्रांचें पाठबळ आपल्यालाच मिळणार आहे अशा आत्मविश्वासानें चीन पावलें टाकीत आहे. लेनिन व बोल्शेव्हिक पक्ष हे देखील एकेकाळीं अल्पसंख्यांकातच होते याची जाणीव चीननें रशियाला करून दिली आहे.

या दोन राष्ट्रांतील हा झगडा कसा मिटेल हें आज सांगतां येणार नाहीं. कदाचित् तो दीर्घकाल तसाच चालत राहील. तसें झाल्यास इतर राष्ट्रांतील साम्यवादी पक्षांतहि असे गट पडल्याखेरीज राहणार नाहींत. (भारतांत आजच तसें गट दिसत आहेत.) तसें झाल्यास जगाच्या इतिहासावर त्यामुळें दूरगामी परिणाम होतील.

चीन भारत संघर्षांत रशियाचें आपल्याला साहाय्य मिळेल अशी अपेक्षा ठेवणें वेडेपणाचें ठरेल. त्या दोघांतील मतभेद कायम राहिल्यास चीनला रशियाची प्रत्यक्ष फार मदत होणार नाहीं इतकेंच फार तर म्हणतां येईल. परंतु रशियाचें आजचें धोरण हें मुख्यत्वेंकरून ख्रुश्योव्हचें धोरण आहे. तेव्हां रशियांतील राजकीय वारे कसे फिरतील याची तरी शाश्वती कोण देऊं शकेल !

रशियाचा इतिहास हा मुख्यतः साम्यवादी साम्राज्याचा इतिहास आहे. साम्यवादी क्रांति केवळ एका देशांत होऊन भागणार नाहीं, जगाच्या सर्व देशांत ती घडवून आणली पाहिजे, असें मार्क्सवादाचें एक तत्त्व आहे. लेनिन त्या तत्त्वाचा कडवा पुरस्कर्ता होता. १९१९ सालीं त्यानें कॉमिन्टर्न स्थापन करून आंतर राष्ट्रीय साम्यवादी चळवळीला संघटित रूप दिलें. ही संटघना १९४३ पर्यंत चालू होती. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटीं स्टॅलिननें दोन लाख साठ हजार चौरस मैलांचा व दोन कोट त्रेचाळीस लाख लोकवस्ती असलेला प्रदेश जिंकून रशियांत सामावून टाकला ! तसेच लाल सेनेच्या जोरावर

अल्बानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया, पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड, रुमानिया या पूर्व युरोपांतील राष्ट्रांत साम्यवादी सरकारें अस्तित्वांत आणलीं.

आपलें हें सर्व साम्राज्य कायम टिकविणें, रशियाच्या हिताला बाध येईल असें कांहींहि होऊं न देणें, तसें घडूं लागल्यास तें लष्करी सत्तेच्या जोरावर दडपून टाकणें–असा आंतर राष्ट्रीय क्रांतीच्या तत्त्वाचा व्यावहारिक अर्थ रशियानें लावला आहे. १९५६ सालीं हंगेरींत उठाव झाला. तो साम्यवादाविरुद्ध नव्हता, फक्त रशियन सैन्य आमच्या देशांत असूं नये एवढीच त्यांची मागणी होती. पण ती चळवळदेखील खुश्चेव्हनें रणगाड्यांखालीं रगडली !

चीनमध्यें साम्यवादी सरकार स्थापन झालें त्यावेळीं युरोपांत आपले हातपाय आणखी पसरणें रशियाला अशक्य होऊन बसलें होतें. उलट आशियांत मात्र सगळेंच रान मोकळें पडल्यासारखें झालें. त्याचा फायदा चीननें घेतला. आशियांतल्या अनेक देशांत घातपाती साम्यवादी चळवळीला चीनकडून मोठ्या प्रमाणावर मदत केली जात आहे. कोरिया व इंडोचायनांत प्रत्यक्ष लढाया देऊन चीननें उ. कोरिया व उ. व्हिएटनाममध्यें साम्यवादी सरकारें स्थानापन्न केलीं आहेत. मलाया व ब्रह्मदेशांत कम्युनिस्ट बंडखोरांचा उपद्रव सारखा चालू आहे. तेंव्हां साम्यवादी साम्राज्यविस्तारांतील रशियाचा वाटा संपलेला आहे, आतां आपण मन मानेल तशी आंतर राष्ट्रीय लूटमार करावी असें चीनला वाटूं लागलें आहे. रशियाच्या चीनबरोबर असलेल्या मतभेदांचें मूळ या परिस्थितींतहि असूं शकेल.

आपल्याला देशांतर्गत हुकूमशाही नको आहे आणि कुणाची साम्राज्यशाहीहि नको आहे. म्हणूनच चीनशीं आपल्याला प्राणपणानें लढायचें आहे.

o o o

९. आर्थिक पार्श्वभूमि

चीन आणि भारत यांच्यांतील राजकीय संघर्षाला आर्थिक क्षेत्रांतील स्पर्धेचीहि कांहीं पार्श्वभूमि आहे.

आज या दोन राष्ट्रांचे आर्थिक हितसंबंध एखाद्या क्षेत्रांत परस्परविरोधी आहेत असें नाहीं, परंतु आर्थिक प्रगतीत कोण अधिक पुढें जातो याविषयीं या दोन राष्ट्रांची तुलना मनोमन सर्व जग करीत आहे. या तुलनेंत आपण पुढें राहिलें पाहिजे ही गोष्ट चीनला मानबिंदु वाटल्यास नवल नाहीं. कारण 'साम्यवादच कां?' या प्रश्नाचें 'आर्थिक प्रगतीचा वेग वाढविण्यासाठीं' असें एक उत्तर अनेकदां दिलें जातें.

मागसलेल्या देशांचा आर्थिक विकास जलद गतीनें घडवून आणण्यासाठीं भांडवलशाही मार्ग निरुपयोगी आहे. समाजाचें हित प्रधान मानून त्याप्रमाणें उत्पादनाचें नियोजन केलें, खाजगी व्यक्तींना जास्त नफा मिळण्याची व्यवस्था मोडून काढली, तरच भांडवलनिर्मितीचा वेग वाढूं शकतो. हें सर्व करण्यासाठीं हुकूमशाही, साम्यवादी नियोजनाची कांस धरली पाहिजे, तोच सर्वोत्तम मार्ग होय, असें साम्यवादाचे प्रचारक आज आफ्रो-आशियाई देशांना सांगत आहेत.

म्हणूनच भारताच्या शांततामय आर्थिक विकासाच्या प्रयत्नाला खीळ घालावी म्हणून चीननें हें आक्रमण केलें असावें असें कांहीं वेळां सुचविलें जातें. या कारणांत कांहीं तथ्य असेल किंवा नसेलहि. परंतु या आक्रमणाचा आपल्या आर्थिक क्षेत्रांतील प्रयत्नांवर फार मोठा परिणाम होणार आहे यांत शंका नाहीं. हें आक्रमण एक आव्हान म्हणून स्वीकारून भारत आजपर्यंतचा आळस, शैथिल्य झाडून जिद्दीनें कामाला उभा राहिला तर या वाईटांतून अखेर अधिक चांगलेंच निर्माण होईल. आक्रमणामुळें आर्थिक विकासाच्या मार्गांत अडचणी उभ्या राहिल्या असल्या तरी परिस्थिति नराश्याची नाहीं, उलट कर्तृत्वाला आव्हान देणारी आहे, हें आपण ओळखलें पाहिजे.

चीनची व आपली या क्षेत्रांत कशी तुलना होते, ती तुलना कितपत विश्वसनीय होऊं शकते, भारताचा आर्थिक विकास कोणत्या विशेष पद्धतीनें चालला आहे, आक्रमणामुळें भारताच्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नाचें स्वरूप कसें बदललें आहे, या गोष्टी आपण समजून घेतल्या पाहिजेत.

कोणतीहि तुलना करण्यापूर्वी वस्तुस्थिति नीट माहीत असणें आवश्यक असते ही गोष्ट उघड आहे. आपण ही तुलना सामान्यपणें चीनमधील माहितीचे आंकडे व भारतांतील माहितीचे आंकडे यांच्या आधारें करतो. यांत आपल्याला उपलब्ध असलेले आंकडे विश्वासार्ह आहेत असें गृहीत धरलेलें असतें. चीनसारख्या राष्ट्राच्या बाबतींत याचविषयीं दोन अडचणी उद्भवतात.

एक तर चीन हें राष्ट्र सुसंघटित रीतीनें गेल्या सुमारें १३-१४ वर्षांच्या काळांतच उभें राहिलें आहे. इतक्या अल्प अवधींत निश्चित आंकडेवारी गोळा करणारी यंत्रणा उभी करणें दुर्घट असते. लोकसंख्येची शिरगणती ही तर अलीकडच्या काळांत अगदीं एक प्राथमिक मामुली माहितीची गोष्ट आहे. भारतांत आज अनेक दशकें ही शिरगणती होत आली आहे. चीननें आपली पहिली सामान्य शिरगणती सुमारें दहा वर्षांपूर्वी केली. (सामान्य यासाठीं म्हणावयाचें कीं त्या गणतींत गोळा केलेली माहिती केवळ मोजदादीपुरतीच मर्यादित होती. इतर राष्ट्रें अशा गणतीच्या वेळीं जी इतर अनेकविध माहिती गोळा करतात ती करण्याचा प्रयत्न चीननें या गणतींत केला नव्हता.) आपली ढोबळ कल्पना व प्रत्यक्ष पाहणीनें आढळून येणारी वस्तुस्थिति यांत किती अंतर पडूं शकतें हेंहि या वेळीं आढळून आलें. ही गणती होण्यापूर्वी चीनची लोकसंख्या चाळीस कोटी असावी असा जगाचा समज होता. प्रत्यक्ष गणतींत ती साठ कोटी असल्याचें आढळून आलें ! केवळ अंदाजाच्या आधारानें केलीं जाणारीं विधानें किती दिशाभूल करणारीं होऊं शकतात, तें यावरून कळून येईल. चीनमधील पुष्कळसे आंकडे हे अजूनहि अंदाजच आहेत.

दुसरी अडचण वेगळ्या प्रकारची; परंतु तितक्याच किंबहुना अधिक महत्त्वाची आहे. साम्यवादी राष्ट्र आपल्या आर्थिक विकासाच्या वेगाकडे आग्रही निर्धारानें पहात असतें. हा वेग कमी होणें म्हणजे क्रान्ति अयशस्वी झाल्यासारखें कबूल करणें व प्रतिक्रांतीला सवड देणें होय, अशी त्या राष्ट्राची समजूत असते. त्यांतून आपल्याला गैरसोयीचें वाटणाऱ्या सत्याचा अपलाप करण्याची वृत्ति निर्माण होते. किंबहुना क्रांतीला पोषक असें विधान म्हणजेच

सत्य, अशीच सत्याची समाजवादी (Socialist truth) सोयीस्कर व्याख्या करण्यांत येते. सत्याची अशी व्याख्या बदलली कीं, मिळणारी माहिती कितपत विश्वासार्ह आहे याविषयीं अभ्यासकाच्या मनांत साहजिकच शंका निर्माण होते. माहिती खरी कीं खोटी, याचा बाहेरून कांहीं निश्चित पडताळा मिळणें कठीण असते. कारण सरकारनें प्रसिद्ध केलेल्या गोष्टींखेरीज इतर कांहींच साधनें अभ्यासकाला उपलब्ध नसतात. एखाद्या वेळीं आधीं स्वतःच पुरविलेली माहिती कांहीं कारणानें सरकारनें पुढें नाकारली तरच वस्तुस्थिति व प्रचार यांतील अंतर स्पष्ट होण्याची शक्यता असते चीननें शेतीच्या उत्पादनाच्या क्षेत्रांत हनुमान उडी (The Grat Leap) मारून वर्षभरांत जवळजवळ शंभर टक्के उत्पादनांत वाढ केल्याचा जो प्रचार केला व नंतर कांहीं काळानें ती उडी फसण्याची जी कबुली दिली त्यांतून हीच गोष्ट स्पष्ट होते.

या दोन अडचणींखेरीज तिसरीहि एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट, साम्यवादी राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या गतीशीं भारतांतील गतीची तुलना करतांना लक्षांत ठेवली पाहिजे. भारतांतील विकासाचा प्रयत्न लोकशाही मार्गानें चालला आहे. साम्यवादी राष्ट्रांत हुकूमशाही मार्ग अनुसरले जात असतात. हुकूमशाही मार्गानें लोकांच्याकडून चोपून काम करून घेणें अधिक सोपें असतें, लोकांना जीवनमान खालीं ठेवावयास भाग पाडून भांडवल संचयाचें प्रमाणहि हुकूमशाहींत वर ठेवतां येतें. यामुळें आर्थिक उत्पादनाचा वेग हुकूमशाहींत साहजिकच अधिक राहतो.

हुकूमशाहींत आर्थिक विकासाचा वेग वाढविणें शक्य आहे, हें निर्विवाद आहे. लोकशाहींत तें अशक्य आहे असा मात्र त्याचा अर्थ नाहीं. लोकांनीं आपल्यापुढील प्रश्न नीट समजावून घेतले, आवश्यक धडाडी दाखवावयाचें व पडेल तो त्याग करायचें ठरवलें तर लोकशाहींतहि आर्थिक प्रगतीचा वेग खूप वाढविता येऊं शकेल. डोळस, दूरदर्शी व खंबीर नेतृत्व असेल तर तें सहज शक्य आहे. किंबहुना लोकशाहींतील विकासाचा वेग अधिक जलद असणें जास्त शक्य आहे. हुकूमशाहींत दंडसत्ता तरी वापरावी लागते. म्हणजे पर्यायानें कांहीं श्रम, वेळ व शक्ति ही आर्थिक विकासासाठीं आवश्यक झालेल्या दंडासाठीं खर्ची पडत राहते. लोकांनीं जर स्वतः होऊन मनावर

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ३३०९ २१

घेतलें तर मग याची गरज रहात नाहीं. डोळस नेतृत्वाची मात्र यासाठी तीव्र निकड आहे.

भारतांत गेलीं दहा बारा वर्षें आर्थिक विकासाचे प्रयत्न चालले आहेत. त्यांत कांहीं दोष व उणीवा दिसून आल्या आहेत. पण लोकशाही पद्धति स्वीकारल्यामुळें हे सर्व दोष अटळ होते असें मात्र मुळींच नाहीं. लोकांनीं व विशेषतः नेत्यांनीं आपल्यापुढील प्रश्नांचें स्वरूप व गांभीर्य नीट ओळखलें नाहीं. हें एक आव्हान आहे. अशा दृष्टीनें त्या प्रयत्नांकडे पाहिलें नाहीं. 'करूं कीं, होईल कीं' अशी भूमिका घेतली, त्यामुळें आपला आर्थिक विकासाचा वेग अपेक्षेइतका राहूं शकला नाहीं. पण मनांत आणलें तर तो पाहिजे तितका वाढविणें सहज शक्य आहे. त्यासाठीं लोकशाहीचा बळी देण्याचें कारण नाहीं.

तेव्हां चीनमध्यें हुकूमशाही आहे, आमच्याकडे लोकशाही आहे, असें म्हणून आपल्या मनाचें समाधान करून चालणार नाहीं. ती आत्मवंचना कदाचित् होणार नाहीं; परंतु तो आत्मघात मात्र निश्चित होईल! कारण आक्रमक हुकूमशाही राष्ट्राला तोंड द्यावयाचें तर आपल्याला त्याच्या तोलाचें उत्पादन केलेंच पाहिजे. लोकशाही कायम टेवून हें करून दाखवा, असेंच चनिचें या क्षेत्रांतील आपल्याला आव्हान आहे, असें म्हटलें तरी चालेल.



१०. भारत आणि चीन : आर्थिक तुलना

भारत १९४७ मध्यें स्वतंत्र झाला.	चीनमध्यें १९४९ मध्यें साम्यवादी क्रांति झाली.
लोकसंख्या (अलीकडील अंदाज)	क्षेत्रफळ
भारत : सुमारें ४५ कोटी	भारत : १२,६२,००० चौ. मै.
चीन : सुमारें ७५ कोटी	चीन : ३८,६०,००० ,,

भारतानें १९५१ मध्यें पहिली पंचवार्षिक योजना हातीं घेतली.

चीननें १९५३ मध्यें आपली पहिली योजना हातीं घेतली.
भारताचें सरासरी दरडोई उत्पन्न रु. २७४ होतें (१९५२).
चीनचें सरासरी दरडोई उत्पन्न रु. १५७ होतें (१९५२).

भारताप्रमाणें चीनहि शेतीप्रधान देश आहे. चीनमधील जवळजवळ ८० टक्के जनता ग्रामीण भागांत राहणारी आहे. ही जनता अर्थातच दरिद्री आहे. परंतु चीनमध्यें बहुतेक अन्नधान्याचें उत्पादन भारतापेक्षां एकरीं पन्नास टक्के तें शंभर टक्के इतकें अधिक आहे. परंतु तरीहि चीनला लागणाऱ्या तांदूळ आणि गव्हाचा जवळजवळ दोन टक्के भाग परदेशांतून आयात करावा लागे.

१९४९ मध्यें चीनची उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत फार प्रगति झालेली नव्हती. लोखंड-पोलाद यासारखे उद्योगधंदे तर अगदी प्राथमिक विकासाच्या अवस्थेंत होते. कापड गिरण्या मात्र अस्तित्वांत आल्या होत्या. परंतु मुख्य औद्योगिक उत्पादन घरगुती व छोट्या उद्योगधंद्यांतच होत होतें. नव्या पद्धतीच्या कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या राष्ट्रांत केवळ दहा लाखांच्या आसपास होती. भारतांतील उद्योगधंद्याची १९४७ मधील परिस्थिति कांहीं याहून फारशी वेगळी नव्हती.

१९४९ नंतर साम्यवादी तंत्रानुसार विकासाच्या कार्यक्रमाला चीनमध्यें सुरुवात झाली. ४९ ते ५२ हा काळ पुनर्वसन व भावी विकासाची पूर्वतयारी करण्यांत गेला. रशियानें साम्यवादी क्रान्तीनंतर कणखरपणें व झपाट्यानें केलेल्या आर्थिक विकासाचा आदर्श चीनपुढें होता. स्टॅलिनच्या नेतृत्वाखालीं रशियानें आचरलेला मार्गहि चीनला संमत होता. हुकूमशाहीच्या दाबाखालीं आर्थिक प्रगतीचा वेग वाढवणें हा तो मार्ग होय.

या मार्गानें चीनचें मार्गक्रमण आज चालूं आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळांत या पद्धतीनें नेमका किती आर्थिक विकास करून घेतला हें सांगणें कठीण आहे. परंतु कांहीं विधानें करतां येतील.

(१) भारताचे सरासरी दरडोई उत्पन्न आजहि चीनच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षां अधिक असण्याची शक्यता आहे.

(२) चीननें आपला भांडवलसंचयाचा वेग भारतापेक्षां अधिक ठेवला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारत एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या सात टक्के इतका भांडवलसंचय करीत होता. दुसऱ्या योजनेच्या शेवटीं हें

प्रमाण ११ टक्क्यांपर्यंत वर गेलें. तिसऱ्या योजनेच्या अखेरीस हें प्रमाण १४ टक्क्यापर्यंत वर जाईल अशी अपेक्षा योजनेंत ठेवण्यांत आली आहे. याउलट चीननें हें प्रमाण वाढवत वाढवत १९५६ मध्येंच जवळजवळ तेवीस टक्क्यांपर्यंत वर नेलें होतें. केवळ चीनमध्येंच नव्हे तर सर्वच साम्यवादी राष्ट्रांत हें संचयाचें प्रमाण जवळजवळ पंचवीस टक्के असतें. दरिद्री राष्ट्रांतील जनतेला एवढ्या मोठ्या प्रमाणांत भांडवलसंचय करावयास लावण्यास हुकूमशाही राजवट फार उपयोगी पडते.

(३) या भांडवलसंचयाचाहि विनियोग उपभोगाच्या वस्तूंचे कारखाने (कापड, साबण इत्यादि) काढण्याकडे केला जाण्याऐवजी लोखंड, कोळसा, रासायनिक द्रव्यें, वीज, वाहतुकीचीं साधनें यांची निर्मिति अधिक करण्याकडे होत आहे. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आपण मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासाला महत्त्व दिलें असलें तरी साम्यवादी चीनचा त्याबाबतींतील आग्रह हा साम्यवादी राष्ट्रांच्या परंपरेप्रमाणें भारताहून फारच अधिक व कडवा आहे.

(४) वरील सर्व गोष्टींमुळें चिनी जनतेचें जीवनमान सुधारलें नसलें तरी चीनचें लष्करी सामर्थ्य मात्र वाढलें आहे. याच सामर्थ्याशीं यापुढें भारताला व भारताच्या अर्थव्यवस्थेला टक्कर द्यावयाची आहे.



११. निरन्तरचा प्रश्न

संरक्षणसिद्धता हा यापुढें भारतासमोर एक निरंतरचा प्रश्न म्हणून उभा राहणार आहे. आज भारतांत याविषयीं कोणाचें दुमत नाहीं. खरें तर चीननें तिबेटवर १९५० मध्यें आक्रमण केलें तेव्हांपासूनच भारतानें या प्रश्नाचें हें स्वरूप ओळखावयास हवें होतें व त्याप्रमाणें सिद्धता ठेवावयास हवी होती. परंतु पंतप्रधान नेहरूंच्या शब्दांत सांगावयाचें तर आपण भारत-चीन मैत्रीचें एक दिवास्वप्न रंगवीत आपल्या स्वप्नाळू जगांत

वावरत राहिलों. त्यामुळें १९५० नंतर सुमारें बारा वर्षांनंतर प्रत्यक्ष मोठा आघात येऊनहि तो आपल्याला अचानक आल्यासारखा वाटला !

भारताच्या संरक्षणाचा विचार आजपर्यंत आपण पाकिस्तानच्या संदर्भात करीत असूं. चीनचें अतिक्रमण आज अनेक वर्षें चाललें असतांहि मोठ्या प्रमाणावर तसें आक्रमण होईल, अशी प्रत्यक्ष तें आक्रमण होईपर्यंत भारत सरकारची कल्पना नव्हती ! आपली संरक्षणाची तयारीहि अर्थातच त्या अनुरोधानें राहिली. पाकिस्तानशीं काश्मीर प्रश्नाबाबत आपली असणारी तेढ लवकर सुटेल की सुटणार नाहीं, तें सांगतां येत नाहीं. बहुतेक ती तेढ लवकर संपणार नाहीं, असाच रंग आहे. क्षणभर ती तेढ पूर्णपणें संपली आणि भारत-पाकिस्तान यांत निरागस मैत्रीचे स्नेहसंबंध प्रस्थापित झाले तरी भारताला यापुढें संरक्षणाच्या सिद्धतेवरील भर कमी करतां येणार नाहीं. कारण चीनचें आक्रमण कोणत्याहि क्षणीं व केवढ्याहि व्यापक प्रमाणावर होऊं शकेल अशी आजची परिस्थिति आहे व ती यापुढें अनेक वर्षें – कदाचित् निरंतर – राहणार आहे.

ही संरक्षणाची सिद्धताहि केवळ सीमाप्रदेशाच्या संरक्षणापुरती असून भागणार नाहीं. चीनला अनुकूल वृत्तीनें भारतांत काम करणाऱ्या सर्व शक्तींचा निरास करणाऱ्या अंतर्गत संघटनेचाहि या सिद्धतेंत समावेश असावयास हवा.

साम्यवादी राष्ट्रें साम्राज्यवादी असूंच शकत नाहींत असा एक साम्यवाद्यांचा आवडता सिद्धान्त आहे ! भांडवलशाही राष्ट्रांना आपल्या देशांतील दलितांचें अधिक शोषण अशक्य झालें कीं तीं राष्ट्रें आर्थिक शोषणासाठीं इतर राष्ट्रांकडे वळतात व त्या राष्ट्रांवर आपलें साम्राज्य स्थापन करतात, असा भांडवलशाहीपासून साम्राज्यशाहीचा प्रादुर्भाव होतो. या साम्राज्यामुळें भांडवलशाही राष्ट्रांना पक्क्या मालाला निश्चित बाजारपेठ मिळतें, सवलतीनें कच्चा माल साम्राज्यांतील देशांकडून मिळवतां येतो. किफायतशीर रीतीनें आपलें अतिरिक्त भांडवल त्या देशांतून गुंतवतां येतें. अशा प्रकारचे अनेक फायदे होतात. साम्यावादी राष्ट्रांना अंतर्गत कोणाचें शोषण करावयाचें नसल्यामुळें त्यांना अंतर्गत बाजारपेठ कधींच अपुरी पडत नाहीं. यामुळें बाहेर बाजारपेठ शोधण्याचें त्यांना कारणच नसतें. यामुळें साम्यवादी राष्ट्रें साम्राज्यशाहीकडे झुकत नाहींत, अशा स्वरूपाचें हें विवेचन आहे.

हें विवेचन साम्राज्यशाहीच्या एका विशिष्ट स्वरूपाला उद्देशून केलें आहे. आर्थिक शोषणासाठीं इतर देशांवर केलेलें प्रत्यक्ष राज्य असें त्या साम्राज्यशाहीचें स्वरूप आहे. परंतु साम्राज्यशाहीचें नेहमीं असेंच स्वरूप असतें असें मानण्याचें कारण नाहीं. साम्यवादीहि तसें मानत नाहीं. डॉलरची साम्राज्यशाही (Doller imperialism) असा उल्लेख ते ज्यावेळीं करतात त्यावेळीं राजकीय राज्यापेक्षां आर्थिक वर्चस्व त्यांना अभिप्रेत असतें. आपलें राजकीय किंवा आर्थिक धोरण स्वतंत्रपणें न ठरवितां ज्यावेळीं तें दुसऱ्या देशाच्या तंत्रानें ठरविण्याची पाळी येते त्यावेळीं त्याठिकाणीं साम्राज्यशाही अस्तित्वांत आहे असें समजावयास हरकत नाहीं. नेतृत्वाच्या, मार्गदर्शनाच्या, नांवाखालींहि अशी साम्राज्यशाही लादता येते. पूर्वयुरोपमधील साम्यवादी राष्ट्रांत अशीच रशियाची साम्राज्यशाही अस्तित्वांत आहे, असें म्हणतां येईल व आशिया खंडांत चीन आपली अशीच साम्राज्यशाही अस्तित्वांत आणूं पहात आहे. आपल्याला अनुकूल अशी क्रांति देशांत घडवून आणून आपल्याला धार्जिणें असणारें सरकार अधिकारावर आणणें, हें या साम्राज्यशाहीचें तंत्र असतें.

या तंत्राला साम्राज्यशाही विस्तारवाद म्हणावयाचें कीं नाहीं, हा कदाचित् व्याख्येचा प्रश्न होऊं शकेल. परंतु नांव कोणतेंहि दिलें तरी या तंत्राचा आशय ज्यांना ज्यांना अनिष्ट वाटतो आणि अमान्य आहे त्यांनीं त्यांनीं चीनपासून भारताला असणारा धोका हा निरंतरचा धोका आहे, हें लक्षांत बागवलें पाहिजे. चीन कट्टर साम्यवादी आहे. साम्यवाद जगांत सर्वत्र प्रभावी झाला पाहिजे, हा त्याचा आग्रह आहे. या साम्यवादी जगानें आपलें नेतृत्व मानावें, अशी साहजिकच त्याची इच्छा आहे. या दृष्टीनें चीनला अनुकूल अशी साम्यवादी क्रांति जितक्या लवकर भारतांत होईल तितकी त्याला हवी आहे. या दृष्टीनें आपली सेना भारताच्या सरहद्दीवर मोक्याच्या जागीं सुसज्ज ठेवणें हें चीनच्या या धोरणाचें एक महत्त्वाचें अंग आहे. या सेनेच्या आधारावर भारतांतील चीनला अनुकूल असणाऱ्या शक्तींचा उठाव करणें साहजिकच अधिक सोपें होईल.

कडव्या साम्यवादी विचारसरणीची ही भूमिका लक्षांत घेतली म्हणजे इतर कांहीं गोष्टी साहजिकच स्पष्ट होतात. जागतिक साम्यवादी चळवळींत


आज रशियावादी व चीनवादी असे दोन स्पष्ट गट पडले आहेत. आज हे भेद एवढे स्पष्ट झाले आहेत कीं, केवळ एक राजकीय डावपेंच म्हणून अशी फूट भासवण्यांत येत आहे, असें मानण्याचें कारण नाहीं. परंतु तरीहि या दोन्ही गटांची श्रद्धा शेवटीं जगांत साम्यवादच प्रभावी होणार अशीच आहे. प्रश्न आहे तो सध्याच्या काळांतील धोरणाचा आहे. अण्वस्त्रांमुळें आपला व्यवहार आपण कांहींसा बदलला पाहिजे, असें रशियाला वाटते; चीनला वाटत नाहीं. युद्ध न करतांहि उत्तरोत्तर साम्यवाद अधिकाधिक प्रभावी होत जाईल व जग व्यापून टाकील, असें रशियाला वाटतें तर या आंतरराष्ट्रीय प्रसाराला आपण आग्रहानें हातभार लावणें आपलें कर्तव्य आहे असें चीन मानतो.

परंतु ख्रुश्चोव्ह म्हणतो त्याप्रमाणें हें कौटुंबिक भांडण आहे. तें कोणत्याहि क्षणीं मिटूं शकेल. कदाचित् नवीन नेतृत्व रशियांत निर्माण झाल्यास चीनची भूमिका मान्य होऊनहि बदलूं शकेल. आणि मिटलें नाहीं तरी जोंपर्यंत या वादाचें स्वरूप कौटुंबिक आहे तोंपर्यंत भारताशीं चीनच्या चाललेल्या संघर्षांत रशियाची भारताला साथ मिळण्याची शक्यता नाहीं, ही गोष्ट उघड आहे. यासाठीं रशियाचा आपण आजच उघड विरोध पत्करावा, असें नसलें तरी योग्य ती जाणीव आपण आपल्या मनाशीं ठेवली पाहिजे.

याच जागरूक दृष्टीनें आपण भारतीय साम्यवादी पक्षाच्या हालचालींकडे पाहिलें पाहिजे. त्यांतील चिनीवादी गट हा तर स्पष्टपणें चीनवादी आहे, परंतु दुसऱ्या गटालाहि आपली निखालस राष्ट्रीय भूमिका सिद्ध करावयाची असेल तर केवळ ठरावानें किंवा भाषणांनीं ती होऊं शकणार नाहीं, एवढें त्या गटानें व भारतीय जनतेनें नीट मनांत बागवलें पाहिजे.

आपल्याला मदत करणाऱ्या अमेरिका – ग्रेटब्रिटनसारख्या राष्ट्रांच्या विषयींहि आपण कांहीं गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत. भारतीय लोकशाहीचें रक्षण हा त्या राष्ट्रांच्या जागतिक राजकारणाच्या कार्यक्रमांतील एक महत्त्वाचा भाग आहे व सदैव राहील. व्यवहारिक दृष्ट्या शक्य आहे तोंपर्यंत तशी मदत तीं राष्ट्रें करतीलहि, परंतु त्या त्या वेळीं त्यांच्या राजकारणाच्या दृष्टीनें उचित तेंच करण्याकडे या राष्ट्रांचा कल राहणें सहाजिक आहे. यामुळें अंतिम संरक्षणासाठीं त्यांच्यावर विसंबून राहाणें हें राष्ट्रीय स्वाभिमानाच्या दृष्टीनें तर उणेपणाचें आहेच; परंतु बरेंचसें धोक्याचेंहि आहे.

समर्थ बलशाली लोकशाही भारत आपल्या पायांवर उभा राहिला पाहिजे. स्वाभिमान राखून ज्या ज्या ठिकाणाहून जी जी मदत घेणें शक्य असेल ती घ्यावी. त्याविषयीं हार्दिक कृतज्ञताहि दाखवावी. परंतु स्वाभिमान खऱ्या अर्थानें राखायचा असेल तर भारतानें आपल्या शक्तीच्या पराकोटीचा प्रयत्न केला असें मदत करणाऱ्या राष्ट्रांना वाटेल एवढा मोठा आपला अंतर्गत प्रयत्न व्हावयाला पाहिजे. ही आपल्या संरक्षणविषयक प्रयत्नांची पार्श्वभूमि आहे.



१२. आपलें परराष्ट्रीय धोरण

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणांत स्पष्टपणें दोन गट पडले. एक अमेरिका व तिच्या पक्षपाती राष्ट्रांचा गट व दुसरा रशिया व रशियाच्या पक्षपाती राष्ट्रांचा गट. जगांतील बहुतेक राष्ट्रें प्रकट वा अप्रत्यक्षपणें या ना त्या गटांत सामील झालीं. दुसऱ्या महायुद्धाच्या अंतापासून तों आतांपर्यंतच्या जागतिक राजकारणाचा इतिहास हा या दोन गटांतील शीतयुद्धाचा इतिहास आहे. हें शीतयुद्ध देखील आजवर अनेकदां स्फोटक ज्वालाग्राही बिंदूच्या जवळ येऊन गेलें आहे, हें आपल्याला माहीत आहे. जागतिक राजकारणांतील हें वातावरण क्यूबांतील रशियाच्या माघारीनंतर आज थोडेसें कमी तंग वाटत असलें तरी तें कोणत्या वेळीं आणि किती अचानकपणें तंग होईल, हें सांगतां येणार नाहीं. ही अनिश्चित परिस्थिति यापुढेंहि अनेक वर्षे टिकून राहील, असें दिसतें. कदाचित् जागतिक राजकारणाचा हा स्थायीभाव होऊन राहील.

या दोन्ही गटांच्या आहारीं न जाण्याचें व स्वतंत्रपणें प्रत्येक प्रश्नाचा विचार करून न्याय्य वाटेल त्या पक्षाच्या बाजूनें उभें राहण्याचें आपलें धोरण स्वतंत्र भारतानें पहिल्यापासून ठरवलें. या धोरणाबद्दल भारतांत आणि परदेशांत अनेकदां टीका झाली, गैरमसजहि झाले. आपण आपल्याला नकळत का होईना, साम्यवादी गटाचे पक्षपाती कांहीं वेळां होतों, आसाहि आक्षेप अनेकांनीं

घेतला. परंतु आपली अलिप्ततेची (non-alignment) भूमिका आपण चिनी आक्रमणानंतरदेखील सोडलेली नाहीं. ही त्रयस्थाची भूमिका तशीच ठेवणें यापुढेंहि तात्त्विक व व्यावहारिक कारणांसाठीं इष्ट आहे. परंतु तरीहि या भूमिकेचे पदर आपण नीट समजून घेणें आवश्यक आहे.

अलिप्ततेचें धोरण अनेक कारणांनीं संभवूं शकतें. दोन बलिष्ठांच्या झुंजींत आपण न सापडणें बरें, अशा दुर्बलतेच्या भावनेनें अलिप्तपणा कांहीं वेळां स्वीकारला जातो. समबल बलिष्ठांच्या भांडणांत एखाद्या दुर्बलालाहि कित्येकदां अवास्तव महत्त्व प्राप्त होतें आणि दुर्बल परंतु धूर्त लोक या परिस्थितींत आपली प्रतिष्ठा वाढविण्याचा जुगार कांहीं वेळां खेळतात ! भारताचें अलिप्ततेचें धोरण या दोन्ही भूमिकांतून निर्माण झालेलें नाहीं.

या धोरणाचा उलगडा होण्यासाठीं गेल्या चाळीस वर्षांचा थोडा इतिहास पाहिला पाहिजे. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं न्याय्य गोष्टींसाठीं दुर्बल असतांहि खंबीरपणें उभे राहण्याची वृत्ति भारतीय जनतेंत निर्माण झाली. त्रयस्थाची भूमिका ही एका दृष्टीनें याच वृत्तीचा आंतर राष्ट्रीय क्षेत्रांत झालेला विस्तार (projection) आहे. भारताला न्याय्य वाटणाऱ्या गोष्टींचा पाठपुरावा भारतानें कोणताहि स्वार्थी हेतु मनांत न ठेवतां निर्भयपणानें केला. साहजिकच कांहीं प्रतिष्ठाहि भारताला लाभली. चिनी आक्रमणानंतर भारत स्वसंरक्षणाच्या बाबतींत अगदींच अपुरा पडला हें पाहून मात्र या प्रतिष्ठेला साहजिकच मोठा धक्का बसला. चिनी आक्रमणाचा आपण स्वसामर्थ्यानें पूर्ण निरास करीपर्यंत ती प्रतिष्ठा आपल्याला पुन्हां प्राप्त होण्याची शक्यता नाहीं. परंतु तें धोरण बदलून प्रतिष्ठा किंवा संपूर्ण सुरक्षितता मिळण्याचीहि सुतराम् शक्यता नाहीं.

आपल्या अलिप्ततेच्या धोरणाचीं बीजें, आपल्या नेत्यांच्या मनावर, संस्कारक्षम वयांत झालेल्या संस्कारांतहि सांपडतात. ब्रिटिश लोकशाहीचे संस्कार आपल्या शिक्षणांतून, वातावरणांतून त्यांनीं आत्मसात् केलेले होते. याउलट ब्रिटिश साम्राज्यशाहीचे ते कट्टर विरोधी होते. इतकेंच नव्हे तर भांडवलशाही ही विसाव्या शतकांत एक प्रतिगामी शक्ति आहे, अशी त्यांची धारणा होती. साम्यवाद हा एक पुरोगामी विचार म्हणून त्यांना आकर्षित करीत होता. रशियांतील साम्यवादी क्रांतीचें एक जबरदस्त

आकर्षण त्या काळांत तरुण मनाला होतें. भारतीय नेत्यांचा विशेषतः जवाहरलाल नेहरूंचा मनःपिंड या वातावरणांत तयार झाला. यामुळें या दोन्हीं गटांविषयीं त्यांच्या मनांत कांहीं आकर्षण, कांहीं विरोध अशा संमिश्र भावना नांदत राहिल्या व अद्यापहि नांदत आहेत.

साम्राज्यवाद हा स्वतंत्र राष्ट्रांना व लोकशाहीला धोका आहे, हें पंडितजी जितक्या तीव्रतेनें सांगतात, तितकें साम्यवाद हाहि आक्रमक असूं शकतो, व त्यामुळें साम्यवादी राष्ट्रानें केलेलें आक्रमण वा चालवलेली दडपशाही हीहि स्वातंत्र्य आणि लोकशाहीला तितकीच मारक असते असें ते आग्रहानें मांडत नाहींत. पण स्वातंत्र्य व लोकशाही हीं मूल्यें संरक्षिलीं पाहिजेत, हें आपल्या परराष्ट्रीय धोरणाचें मार्गदर्शक तत्त्व असलें पाहिजे, हें मात्र त्यांना मान्य आहे.

या संमिश्र भावनांचा तोलहि नेहमीं सारखाच राहील असें नाहीं. विशेषतः कृष्ण मेनन ज्या वेळीं भारताचे आंतर राष्ट्रीय राजकारणांत प्रतिनिधित्व करीत असत त्यावेळीं हा तोल साम्यवादी राष्ट्रांच्या बाजूनें झुकलेला आढळून येई.

अशा झुकावामुळें भारताचें धोरण खरोखर अलिप्ततेचें आहे कीं नाहीं, अशी शंका पाश्चात्य देशांत अनेकांना येत राहिली. भारताचें धोरण अलिप्ततेचें असणें चूक आहे, असें वाटून त्यामुळें कांहींजण आपल्याशी साशंकतेनें वागलें असते, वा इतर प्रकारें आपलें नुकसान झालें असतें तर त्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नव्हतें. पण अलिप्ततेच्या आचारांत कांहींशीं जाणीवपूर्वक आणलेली शबलता ही देशाला मान्य नव्हती. तिच्यामुळें देशाचें व्यावहारिक नुकसानहि वेळोवेळीं झालें. मेनन यांच्या विशिष्ट कल्पनांमुळें व वागण्याबोलण्यामुळें (कीं ज्यांचा अलिप्ततेच्या धोरणांत अंतर्भाव होत नाहीं) देशाचें नुकसान झालें, हें पाहून अनेकांना वाईट वाटलें. पण सुदैव असें कीं अलिप्ततेच्या आचारांत कांहीं काळ अशी शबलता आली तरी भारत हा लोकशाहीवर निष्ठा ठेवणारा देश आहे, अशी इंग्लंड-अमेरिकेची मनोमन खात्री असल्यामुळें, आपल्या संकटकाळीं ते आपल्या साह्यार्थ धावून आले.

आज आशिया खंडांत साम्यवादाच्या आहारीं न गेलेलें एक महत्त्वाचें राष्ट्र म्हणून आपल्या जागतिक राजकारणाच्या दृष्टीनेंहि त्यांना भारताला

मदत करणें आवश्यक वाटलें. अमेरिकेनें भारताला फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत केली आहे. रशियाकडून याहून अधिक बऱ्याच कमी प्रमाणांत मदत झाली असली तरी कांहीं मदत भारताला मिळाली आहे. चिनी आक्रमणापूर्वी आपण या दोन्ही गटांकडून लष्करी मदत घेतली नव्हती. आक्रमणानंतर मिळेल तेथून आवश्यक ती मदत घेण्याचें धोरण आपण स्वीकारलें. चिनी आक्रमणाच्या संदर्भांत ही मदत मुख्यत्वेंकरून अमेरिकेकडून मिळावी व रशियाकडून जवळ जवळ मिळूं नये, हें अपेक्षितच होतें व त्याचप्रमाणें घडलें. परंतु रशियाची भूमिका तीव्रपणें विरोधी व स्पष्टपणें चीनच्या बाजूची अशी नाहीं, हेंहि सध्याच्या परिस्थितींत भारताला मोठें आश्वासन आहे. तसें नसतें तर भारताच्या लष्करी संरक्षणाचा प्रश्न आज आहे त्याहून कितीतरी अधिक अवघड झाला असता.

जागतिक राजकारणांत आपण त्रयस्थाची भूमिका घेतली तें योग्यच केलें. आपली मुख्य चूक झाली ती चिनी साम्यवादाचें आक्रमक स्वरूप न ओळखण्यांत झाली. तें आपण ओळखलें असतें तर १९५० च्या तिबेटच्या आक्रमणापासून गेल्या बारा वर्षांतील इतिहास चीनच्या संबंधांत कांहीं फार वेगळा घडला असता असें नाहीं. मनांत असतें तरीहि तिबेटला आपण चीनपासून संरक्षण देऊं शकलों असतों असें वाटत नाहीं. आपल्या हद्दींत केलेल्या आक्रमणालाहि आपण ताबडतोब प्रत्युत्तर दिलेंच असतें असेंहि नाहीं. परंतु यांतून पुढें मोठ्या आक्रमणाकडे चीन वाटचाल करीत आहे, हें जर आपण ओळखलें असतें तर गतवर्षी चीनचा मोठा हल्ला झाला त्यावेळीं आपली प्रतिकाराची तयारी अनेकपटीनीं अधिक राहिली असती. चीनवरील हा आंधळा विश्वास आपल्या भावनात्मक भोळसर आन्तर राष्ट्रीय राजकारणाचें शोककारी उदाहरण आहे.

आज सेना सिद्ध राहिली नाहीं, एवढाच केवळ यामुळें तोटा झाला, असें नाहीं. या आक्रमणाची अपेक्षा ठेवून जर आपण आपलीं पावलें टाकलीं असतीं तर गेल्या बारा वर्षांत आपल्या शेजारीं राष्ट्रांशीं आपले संबंधहि आपण विशिष्ट अनुरोधानें घडवीत नेले असते. पाकिस्तानची आघाडी स्थिरस्थावर राहील, नागालँडचा प्रश्न चिघळणार नाहीं, नेपाळ सिक्कीम भूतान यासारख्या हिमालयाला लागून असलेल्या राज्यांना भारताच्या प्रागतिक धोरणाविषयीं व

संरक्षक सामर्थ्याविषयीं विश्वास वाटेल असें आपलें धोरण आपण आंखलें असतें. आज हे प्रश्न अधिक अवघड झाले आहेत. काळ पुरेशी उसंत देईल कीं नाहीं हेंहि निश्चित नाहीं. परंतु मिळेल तेवढ्या सवडींत त्याच दिशेनें आपलीं पावलें पडत राहिलीं पाहिजेत.



१३. संरक्षणाची आर्थिक बाजू

संरक्षणासाठीं राष्ट्रानें किती खर्च करावा, याचें कांहीं निश्चित असें प्रमाण नाहीं. जगांत वेगवेगळ्या राष्ट्रांची हीं प्रमाणें वेगळीं आहेत. हें प्रमाण अनेक गोष्टींवर अवलंबून असतें. भौगोलिक परिस्थिति, जागतिक राजकारणांतील त्या राष्ट्रांचें स्थान, नजीकच्या भविष्य काळांत आक्रमणाची शक्याशक्यता, यासारख्या गोष्टीवर हें प्रमाण अवलंबून राहतें. आणीबाणीच्या काळांत परकीय राष्ट्रांकडून आपल्याला मदत किती प्रमाणांत व किती तांतडीनें मिळूं शकेल, या अंदाजावरहि हें प्रमाण अवलंबून राहणें साहाजिक आहे.

भारताच्या बाबतींत आज कोणती परिस्थिति दिसते ?

(१) परराष्ट्रावर आक्रमण करण्याचा भारताचा कधीं हेतु नव्हता व नाहीं. परराष्ट्रावर आक्रमण करावयाचें असेल तर सेनादलें कितीतरी पटीनें अधिक सुसज्ज ठेवावीं लागतात. भारताला ती आवश्यकता नाहीं.

(२) नौदल, हवाईदल व सैनिकदल यामध्यें पहिल्या दोन दलांत यंत्रें उपकरणें यांच्यावरील खर्च हा फार मोठ्या प्रमाणावर असतो. तीं आज बहुतांश परदेशांतूनच खरेदी करावीं लागतील किंवा मदत म्हणून मिळवावीं लागतील. सैनिकदल मात्र आपण स्वप्रयत्नानें पुष्कळसें सुसज्ज करूं शकूं व तीच आजची खरी गरज आहे.

(३) सागरावरून भारतावर आक्रमण होण्याचा संभव जवळजवळ नाहीं. झाल्यास परकीय साहाय्यहि आपल्याला परिणामकारी व नेमकें असें मिळण्याची शक्यता आहे.

(४) हवाई दलाबाबत परकीय हवाईदलाचें संरक्षक हवाई छत्र (air umbrella) आपण निरंतरचें स्वीकारणें इष्ट होणार नाहीं. एक तर आंतरराष्ट्रीय राजकारणांत आपण विविध कारणांसाठीं स्वीकारलेली त्रयस्थाची (non alignment) भूमिका त्यामुळें सुटते. यांतूनच अनेक धोके निर्माण होतील. मोठ्या प्रमाणावर हवाई आक्रमण झाल्यास त्याचे पहिले आघात तरी आपण यशस्वीरीत्या परतवूं शकूं इतकी आपली सज्जता असली पाहिजे. यासाठीं मोठा खर्च तर लागेलच व विमानें खरेदी करण्यासाठीं, विमानाचे कारखाने भारतांत काढण्यासाठीं परकीय चलन व परकीय तंत्रज्ञांची फार आवश्यकता लागेल. यासाठीं शुद्ध राजकीय भूमिकेवरून जे जे प्रयत्न करावे लागतील ते ते भारतानें केले पाहिजेत.

(५) पाकिस्तानशीं असलेली आपली सीमारेषा, चीनशीं असलेली हिमालयांतील सीमारेषा या सुरक्षित राखणें ही आपली सध्याच्या काळांतील मुख्य जबाबदारी आहे. पूर्व पाकिस्तान व चीनच्या चिमटींत आसाम अलग होण्याचा धोका टाळतां येईल इतकी त्या भागांतहि तयारी आवश्यक आहे. याबाबतींत केवळ चीनशीं लढाई चालू असतांना आपण गेल्या कांहीं महिन्यांत किती अपुरे पडलों हें लक्षांत घेतलें म्हणजे सैनिकी सिद्धतेची किती आवश्यकता आहे हें लक्षांत येऊ शकेल.

आक्रमणापूर्वी भारताचा संरक्षणावरील खर्च वार्षिक सुमारें चारशें कोटी रुपये होता. हा आकडा यापुढें निश्चित किती होईल हें सांगणें कठीण आहे. १९६३-६४ च्या अंदाजपत्रकांत त्यासाठीं रु. ८२६ कोटींची तरतूद केली आहे. संरक्षणाचा प्रश्न हा यापुढें एक निरंतरचा प्रश्न आहे, हें लक्षांत घेतलें तर या दोन तीन वर्षांतच हा खर्च प्रतिवर्षी हजार बाराशें कोटी रुपयांच्या घरांत जाईल, असें मानावयास हरकत नाहीं. म्हणजेच भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकीं सुमारें आठ ते दहा टक्के उत्पन्न संरक्षणासाठीं खर्च करण्याची आपल्याला तयारी ठेवण्यास हवी.

याशिवाय दुसरें गत्यंतर परिस्थितीनें आपल्याला ठेवलेलें नाहीं. हें कसें करावयाचें हाच काय तो प्रश्न आपण विचारानें आणि कर्तृत्वानें सोडवावयाचा आहे.

० ० ०

ठाः ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३५८८ वि: विनोद
क्रमांक १५१४ दि. १५-९-८८

१४. संरक्षणासाठीं विकास

संरक्षणासाठीं अधिक खर्च करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यानंतर एक प्रतिक्रिया अशी झाली कीं आतां आपल्याला योजनेवरील खर्च कमी करावा लागणार. या चुकीच्या समजुतींतून आपण आतां विचारानें बाहेर पडलों आहोंत. पण कृतीनें आपण अजून नवीन भूमिका कणखरपणें स्वीकारली आहे असें आढळत नाहीं.

संरक्षणासाठीं आपल्याला योजनेवरील खर्च कमी तर करतां येणार नाहींच, कदाचित् वाढवावाच लागेल. अग्रक्रमांत कांहीं फेरबदल होऊं शकतील. परंतु योजनेचा एकूण आकार कमी होणार नाहीं. संरक्षणासाठीं अधिक खर्च करूनहि योजनेसाठीं पुरेसा भांडवलसंचय करण्याची तयारी भारतानें ठेवली पाहिजे. यासाठीं आवश्यक तो त्याग करण्याला नव्या वातावरणांत जनतेला यार करणें, हें समाजाच्या नेत्यांचें कर्तव्य आहे. हा मुख्यत्वेंकरून प्रश्नाचे आणीबाणीचें स्वरूप जनतेला समजावून सांगण्याचा व योग्य तें वातावरण समाजांत निर्माण करण्याचाच भाग आहे. कारण प्रसंगाचें महत्त्व जाणवलें कीं जनता वाटेल त्या त्यागाला सिद्ध होते. हें महत्त्व समजावून सांगण्यांत आज आपण अपुरे पडत आहोंत कीं काय, अशी शंका मात्र आल्यावांचून रहात नाहीं. यांत सरकारला किंवा कोणत्या एखाद्या पक्षालाच दोष लावण्याचें कारण नाहीं. ही आपणा सर्वांचीच—उगदीं सामान्य नागरिकांचीदेखील—जबाबदारी आहे. नागरिकांना या जबाबदारीचें भान करून देणें; ती पार पाडण्यासाठीं दैनंदिन व्यवहारांत काय केलें पाहिजे, याबाबत सतत तपशीलवार मार्गदर्शन करणें हें नेत्यांचें कर्तव्य आहे. चिनी चढाई सुरू झाल्यानंतर देशभर राष्ट्रप्रेमाची व त्यागाची लाट उसळली. तिचा उपयोग करून लोकांची शक्ति राष्ट्राचें संरक्षणसामर्थ्य वाढविण्याकडे वळविण्यांत नेत्यांना कांहींसें अपयश आलें. आपल्यापुढील प्रश्नाचें स्वरूप स्पष्टपणें समजावून घेणें, त्याची जाणीव सतत ठेवणें, प्रत्येक बाबतींत निकड दाखवणें, राष्ट्रहिताच्या आड संकुचित स्वार्थ येऊं न देणें, त्यागाला सदैव आघाडीवर राहणें—नेत्यांकडून या अपेक्षा आहेत. ते जितक्या प्रमाणांत आपलें वर्तन तसें ठेवतील तितक्या प्रमाणांत जनता त्यांचें मार्गदर्शन तत्परतेनें स्वीकारील.

संरक्षण आणि विकास यांच्यामधील निकटच्या संबंधांचें स्पष्ट विवेचन पंतप्रधान श्री. नेहरू यांनीं १८ जानेवारी १९६३ रोजीं नवी दिल्लीमध्यें राष्ट्रीय विकास मंडळाच्या स्थायी समितीच्या बैठकींत केलें आहे. विचाराच्या दृष्टीनें त्यांतील कांहीं भाग उद्धृत केला तरी पुरेसें आहे.

" विकास योजना आपल्या लोकांचें राहणींचें मान सुधारण्यासाठीं आंखण्यांत आल्या आहेत. परंतु त्याचबरोबर देशाचें सामर्थ्य वाढवणें, हाहि त्यांच्यामागील उद्देश आहे. ज्या देशांनीं औद्योगीकरण करून त्यायोगें सामर्थ्य संपादन केलें—मग तें सामर्थ्य युद्धकार्यासाठीं असो कीं शांततामय कार्यासाठीं असो—तेच देश आज जगांत बडीं राष्ट्रें म्हणून ओळखले जात आहेत. म्हणून खरें सामर्थ्य जर कशांत असेल तर औद्योगीकरणांत आहे. कोणत्याहि क्षेत्रांत—मग तें शेतकी असो कीं औद्योगिक असो—आधुनिक तंत्राचा अवलंब करण्यांत येत आहे. आपण किती पोलाद निर्माण करतो, किती वीज निर्माण करतो आणि वापरतो, हें आपल्या खऱ्या सामर्थ्याचें गमक आहे. या दृष्टीनें आपल्या विकास योजनांचा ८५ टक्के भाग संरक्षणव्यवस्थेचा आवश्यक भाग आहे. आणि उरलेल्या १५ टक्के भागाचासुद्धां, संरक्षणव्यवस्थेशीं अप्रत्यक्ष संबंध आहे. आपल्याला कांहीं थोड्या बाबतींत कार्याचा वेग मंद करावा लागेल किंवा किरकोळ फेरबदल करावे लागतील, परंतु एकंदरीनें, आपल्या योजनांचा बराच मोठा भाग, संरक्षणासाठीं आवश्यक आहे.

" संरक्षणखर्चाच्या बाबी आणि विकास खर्चाच्या बाबी, या जणूं कांहीं अगदी वेगवेगळ्या बाबी आहेत असें समजून, त्यांना एकमेकांपासून अलग करणें बरोबर नाहीं. उदाहरणार्थ, आपल्या शेतीची भरभराट होणें आपल्या संरक्षणाच्या दृष्टीनें आवश्यक आहे. आपलें शेतकी उत्पादन अपुरें न राहतां भरपूर राहिले तर आपलें परकीय चलन वांचेल. इतकेंच नव्हे, तर आपल्या उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठीं आणि संरक्षणव्यवस्थेसाठीं आवश्यक असलेला स्थिर शेतकी पाया आपल्याला लाभेल. आपलें शेतकी उत्पादन पुरेसें असणें ही गोष्ट, आपल्याजवळ पुरेशा बंदुका आणि शस्त्रास्त्रें असण्याइतकीच महत्त्वाची आहे.

" तीच गोष्ट उद्योगधंद्यांची. कांहीं थोड्या उद्योगधंद्यांचा विकास आपण लांबणीवर टाकूं शकूं. परंतु एकंदरीनें आपल्या योजनेंत, जे मोठे उद्योगधंदे

सुचविले आहेत ते संरक्षणासाठींहि आवश्यक आहेत. हीच गोष्ट वीजनिर्मिति आणि वाहतूकसाधनांची आहे. हें सर्व आपल्या संरक्षणाशीं अत्यंत निगडीत असून, या चार पांच बाबी मिळून, आपल्या योजनेचा ८५ टक्के भाग होतो.

" उरलेला भाग म्हणजे समाज हितसंवर्धन आणि शिक्षण : यांतला कांहीं भाग, किंचित् वेगळ्या दृष्टिकोनांतून पाहतां, तितकाच महत्त्वाचा आहे. केवळ संरक्षणाच्याच दृष्टीनें विचार केला तर इंजिनिअर्स, तंत्रज्ञ, यंत्रज्ञ इत्यादि वाकबगार लोक तयार करण्याचें काम आपल्याला झपाट्यानें करावयाचें आहे. हें अत्यंत महत्त्वाचें काम आहे. परंतु इतर प्रकारचें शिक्षणहि तितकेंच महत्त्वाचें आहे. कारण, शिक्षणामुळें आपल्या औद्योगिक आणि शेतकी उत्पादनाच्या प्रयत्नांत जोरकसपणा येईल. त्यामुळें कांहीं किरकोळ फेरबदल करून आपली योजना उत्तम रीतीनें पार पाडण्याखेरीज तरणोपाय नाहीं.

" आपल्याला इतर देशांकडून विशेषतः, अमेरिका, इंग्लंड आणि इतर कांहीं देशांकडून भरपूर मदत मिळत आहे, हें सर्वांना माहीत आहेच. आपण अशी मदत मागणें आणि ती स्वीकारणें पूर्णपणें समर्थनीय आहे, असें मला वाटतें. मदत मागितल्याबद्दल आणि ती स्वीकारल्याबद्दल मला मुळींच पश्चाताप होत नाहीं. परंतु परिस्थितीचें ओझें स्वतःच्या शिरावर न घेतां तें आपण इतरांवर ढकलत आहोंत, असें त्यांना वाटणें हें केवळ आपल्या लोकांच्याच नव्हे तर इतरांच्याहि दृष्टीनें पूर्णपणें गैर ठरेल. कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी ही गोष्ट बरोबर ठरणार नाहीं. तिचा आपल्या मनोधैर्यावर वाईट परिणाम होईल.

" आपल्याला अत्यंत कष्ट पडत असले तरीसुद्धां आपण स्वतःवरच विसंबून राहून प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहोंत, असें इतर देशांना दिसून आलें तर ते आपल्या मनोवृत्तीची प्रशंसाच करतील आणि त्यांना आपल्याला अधिक सढळपणें मदत करावी असें वाटूं लागेल. परिस्थितीला आपण स्वतः कशा प्रकारें तोंड देतो, ही महत्त्वाची गोष्ट आहे. तिला धैर्यानें तोंड देणें, आणि तिचें ओझें स्वतःच्या शिरावर घेण्याची उत्कट इच्छा असणें, हे खुद्द आपल्या लोकांच्या आणि इतरांच्याहि दृष्टीनें फार चांगलें ठरेल. या परिस्थितीचा आपणहि अत्यंत गंभीरपणें विचार करीत आहोंत, याची इतरांना यामुळें

जाणीव होईल. मात्र लोकावर हें जें ओझें पडलें आहे, तें अन्य उपाय योजून सर्वांवर सारखें पडेल असा प्रयत्न करणें अत्यंत इष्ट ठरेल.

" आपल्या स्वातंत्र्याला जो धोका निर्माण झालेला आहे, त्याला आपल्याला तोंड द्यावयाचें आहे. या धोक्याला आपल्याला कदाचित् पुन्हा तोंड द्यावें लागेल, हें मला परत सांगावेसें वाटतें. धोक्याची ही तलवार बराच काळ, बरींच वर्षें, आपल्या डोक्यावर टांगती राहणार आहे. या मधल्या काळांत कांहींहि होवो, प्रत्यक्ष लढाई पुन्हां सुरू होवो किंवा न होवो, त्यामुळें कांहीं फरक पडणार नाहीं. आपल्याला निर्माण झालेला धोका कायम राहणार आणि पूर्णपणें सुसज्ज राहिल्यानेंच तो आपल्याला टाळतां येईल किंवा त्याला यशस्वी-रीत्या तोंड देतां येईल. "

' संरक्षण आणि विकास ' यांच्या अविभाज्य संबंधांचें याहून अधिक स्पष्ट विवेचन करणें कठीण आहे.



१५. आणखी कांहीं आर्थिक अंगें

आपली अर्थव्यवस्था युद्धकालांतील आणीबाणीच्या पातळीवरच चालवावी लागणार आहे, हें ठरल्यानंतर या व्यवस्थेचे कांहीं आवश्यक विशेष पाहिले पाहिजेत.

गेल्या प्रकरणांतील विवेवेचनाचीं कांहीं उदाहरणें द्यावयाचीं तर कारखान्यांतून होणारें लोकरीच्या मालाचें उत्पादन निम्याहून अधिक आतां सैन्यासाठीं लागेल. मोटार गाड्या, ट्रक, लष्करी वाहतुकीसाठीं अधिक लागतील व त्या मानानें नागरी गरजा कमी प्रमाणांत पुरवल्या जातील. सिमेंट, पोलाद, रेल्वे वाहतुकीचीं साधनें यांचा पुरवठा आधींच अपुरा होता त्यावर आणखीच ताण पडेल.

असे ताण सहन करावयाचे असतील तर अर्थव्यवस्थेनें अधिक उत्पादनाचीं तयारी दाखवली पाहिजे. कोळसा, वाहतुकीचीं साधनें, पोलाद, वीज या-

सारख्या महत्त्वाच्या गोष्टींच्या बाबतींत तुटवड्याची परिस्थिति (bottleneck) निर्माण होऊन अनेक क्षेत्रांतील प्रगति रोखली जाऊं नये यासाठीं हर प्रयत्नानें असे तुटवडे दूर केले पाहिजेत. कार्यक्षमतेवर यासाठींच भर दिला पाहिजे. जी गोष्ट शांततेच्या काळांत कदाचित् क्षम्य ठरली असती ती अर्णाबाणीच्या काळांत तशीच ठरूं नये. बीजपुरवठ्याच्या किंवा अन्य महत्त्वाच्या गोष्टींच्या पुरवठ्यांत अडथळे निर्माण झाले तर ते हरप्रयत्नानें दूर करण्याची तत्परता सरकारनें दाखविली पाहिजे.

आणीबाणीच्या प्रयत्नाला पोषक अशा कांहीं गोष्टी असतात त्याप्रमाणें विरोधक अशाहि कांहीं गोष्टी असतात. या गोष्टी कोणत्या हें नव्यानें आपल्याला शिकण्याचें कारण उरलेलें नाहीं. अनेक छोटीं मोठीं राष्ट्रें अशा प्रसंगांतून युद्धकाळांत गेलीं आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत गेलीं आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत आपणहि याचा अनुभव घेतला आहे. त्यापासून धडा घेऊन आपल्याला आपला कार्यक्रम ठरवतां येईल.

आणीबाणीच्या काळांत भाववाढीचा धोका हा नेहमीं असतो. हा धोका सरकार आणि जनता यांनीं प्रयत्न करून टाळला पाहिजे. ही भाववाढ अनेक कारणांनीं होते. लढाईसाठीं वस्तूंची मागणी वाढल्यामुळें बाजारांत इतरत्र त्यांचा पुरवठा कमी होतो व भाव वाढतात. लढाईच्या खर्चासाठीं चलनवाढ करावी लागल्यास तें चलन लोकांच्या हातीं जातें व त्यांची मागणी वाढल्यामुळेंहि भाव वाढतात. भाववाढीच्या अपेक्षेनें व्यापारी साठेबाजी करतात, त्यामुळेंहि भाव अधिक वाढतात. यापैकी लोकांच्या हातीं गेलेलें चलन, कर व कर्जे याविषयीं योग्य धोरण आंखून सरकारनें त्यांच्या हातांतून परत घेतलें पाहिजे. साठेबाजीला, नफेबाजीला शासनयंत्रणा नीट वापरून कडक आळा घातला पाहिजे. खेरीज गरजेच्या गोष्टी (अन्न-वस्त्र इत्यादि) सर्वांना योग्य भावांत उपलब्ध व्हाव्यांत यासाठीं वाटप पद्धतीची (rationing) यंत्रणा, योग्य किंमतींत वस्तु देणारीं दुकानें (fair price shop;) या सारखी कार्यक्रमव्यवस्थाहि सिद्ध ठेवली पाहिजे. भरमसाट भाववाढ होऊं दिली कीं जनतेचे कष्ट तर वाढतातच परंतु नफेबाजीचे व्यवहार पाहून समाजव्यवस्थेवरील तिचा विश्वासहि उडूं लागतो. भाववाढ, साठेबाजी,

नफेबाजी यासारख्या गोष्टींना कटाक्षानें व निर्धारानें आळा घातला गेला पाहिजे.

असें वातावरण टिकवतां आल्यास जनतेकडून उत्साहानें इतर कार्यक्रमाला प्रतिसाद मिळण्याची शक्यताहि निर्माण होते. जनतेनें कररूपानें कर्जरूपानें अधिक पैसा सरकारला द्यावा, अशी या काळांत गरज असते. प्रश्नाची निकड जितकी अधिक वाटत असेल तितकी जनता हें ओझें उचलण्यास मनानें अधिक तयार असते. चीनचें आक्रमण होतांच भारतीय जनतेची जी उत्स्फूर्त एकात्म प्रतिक्रिया झाली त्यावरून स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं ती जनता कोणत्याहि त्यागाला सिद्ध होईल, हें दिसून आलें आहे. प्रश्नाचें स्वरूप या जनतेला तितक्या तीव्रपणें आणि नीटपणें समजावून दिलें गेलें नसल्यामुळें चीननें आक्रमण थांबवतांच जनतेच्या मनांत आणि प्रयत्नांत शैथिल्य निर्माण झालें आहे इतकेंच. हें वातावरण बदलण्यांत विचारप्रचाराचा कांहीं भाग जरूर आहे, परंतु नेत्यांच्या दैनंदिन आचरणांत परिस्थितीची निकड तशीच जाणवली पाहिजे. नाहींतर युद्धप्रयत्न हा जीवनमरणाचा प्रश्न होत नाहीं, तो केवळ एक कार्यक्रम होतो.

कांहीं लोक या राष्ट्रीय संकटाच्या होळीवर आपली पोळी भाजून घेणार नाहींत याविषयीं दक्ष असावयास हवें. युद्ध प्रयत्नाचें ओझें समाजांतील सर्व वर्गांवर सारख्या न्याय्य प्रमाणांत पडत आहे याविषयींहि काळजी घेतली पाहिजे. आज तसें घडत नाहीं अशी अनेकांची तक्रार आहे. एक उदाहरण द्यावयाचें तर प्राप्तीवरील कराचें देतां येईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत (१९५५-५६ ते १९६०-६१) भारताचें राष्ट्रीय उत्पन्न एकोणीस टक्क्यांनीं वाढलें असा नियोजन मंडळाचा दावा आहे. परंतु या योजनेच्या सुरवातीच्या वर्षांत प्राप्तिकरापासून जेवढें उत्पन्न होतें तेवढेंच अखेरच्या वर्षांतहि राहिलें. याचे दोन अर्थ होऊं शकतात. एक असा कीं या काळांत राष्ट्राचें उत्पन्न वाढलें परंतु प्राप्तीवरील कर देणारा जो वर्ग आहे त्याचें उत्पन्न मात्र वाढलें नाहीं. हा अर्थ वस्तुस्थितीशीं कितपत सुसंगत आहे हें समाजचित्र ढोबळ मानानें पाहणारा देखील कोणीहि सांगूं शकेल. दुसरा अर्थ असा कीं आपली करआकारणीची पद्धत आणि कर गोळा करण्याची यंत्रणा या अपुऱ्या पडत आहेत आणि

कर चुकविण्याचें प्रमाण उत्तरोत्तर कमी होत जाण्याऐवजीं वाढत चाललें आहे. हा अर्थ वस्तुस्थितीशीं अधिक सुसंगत असण्याची शक्यता आहे. आणि यांतच भारतीय परिस्थितीतील प्रमुख धोका आहे.

चीनविरुद्ध चाललेल्या संघर्षाचें स्वरूप केवळ सरहद्दीवरील आक्रमणापुरतें मर्यादित नाहीं तर याहून कितीतरी अधिक मूलगामी आहे, हें आपण ओळखलें पाहिजे. जनतेचें जीवनमान सुधारण्याचा वेगवेगळ्या मार्गांनीं प्रयत्न करीत असणाऱ्या दोन राष्ट्रांतील स्पर्धेची त्याला पार्श्वभूमि आहे. चीनचे साम्यवादी विचार आणि आचार स्पष्ट आहेत. भारतीय सैनिक सीमेवर चिनी सेनेला रोखून धरतील, परंतु समाजवादी समाजरचनेबद्दलचा विश्वास आणि लोकशाही मूल्याविषयींची दृढनिष्ठा भारतीय जनतेंत आपण रुजवूं शकलों तरच भारत खऱ्या अर्थानें सर्वथैव अजिंक्य राहणार आहे. समाजवादी समाजरचना व लोकशाही जागृति हे भारताच्या सामर्थ्याचे खरे मूलस्रोत यापुढील काळांत असले पाहिजेत. त्यांची निष्ठेनें जोपासना करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

० ० ०

१६. समाजवादी समाजरचना

लोकशाही वातावरण कायम ठेवून आपण समाजवादी समाजरचना अस्तित्वांत आणूं, अशी भारताची प्रतिज्ञा आहे.

विकासाच्या मार्गावर असलेल्या एखाद्या अप्रगत देशानें असा यशस्वी प्रयोग केल्याचें आजपर्यंत जगाच्या इतिहासांत घडलेलें नाहीं.

परंतु लोकशाही समाजवादाचा हा प्रयोग यशस्वी झाला तर नव्या जगाच्या रचनेला भारतानें दिलेली ती सर्वांत मोठी देणगी ठरणार आहे. अणुशक्तीच्या शोधानें भौतिक क्षेत्रांत जशीं नवीं असीम क्षितिजें खुलीं केलीं त्याचप्रमाणें सुखीसमृद्ध मानव समाजाच्या निर्मितीची आणि असीम विकासाचीं क्षितिजें हा प्रयोग यशस्वी झाला तर खुलीं होणार आहेत.

असा प्रयोग आजवर झाला नाहीं. लोकशाही समाजवादाच्या दृष्टीनें जी राष्ट्रें आज वाटचाल करीत आहेत तीं आर्थीच समृद्ध आहेत. विकासाच्या मार्गावर असणाऱ्या अनेक अप्रगत राष्ट्रांनीं तांतडीच्या म्हणून साम्यवादी वा अन्य प्रकारच्या हुकूमशाहीचा मार्ग स्वीकारला आहे.

भारतांतील प्रयोगाविषयीं साहजिकच लोकांच्या मनांत उलटसुलट शंका आहेत. समाजवादी समाजरचनेकडे जाऊं पाहणारा भारत त्या मार्गानें जात असतां आज ना उद्यां हुकूमशाहीकडे वळेल असें कांहींना वाटतें. याउलट, लोकशाही मार्गानें समाजवादाकडे जाऊं असें म्हणणाऱ्या भारताचा समाजवाद हा फसवा व बेगडी आहे, असा चीनसारख्या आपल्या शत्रुराष्ट्राचा आक्षेप आहे.

भारतीय जनता या प्रयोगांत सामील आहे. परंतु या प्रयोगाच्या संपूर्ण स्वरूपाची तिला कल्पना आहे असें म्हणतां येणार नाहीं. या प्रयोगाचें असामान्यत्व तिच्या ध्यानीं आणून देऊन या जनतेला उत्साहानें कार्यप्रवण करावयाचें काम अजून अपुरें आहे.

समाजवादी समाजरचनेचीं स्वप्नें आपण स्वातंत्र्यपूर्व काळांतहि रंगवीत होतों. या स्वप्नांचा व आशाआकांक्षांचा ठसा आपल्या राज्यघटनेवर उमटला आहे, त्याचप्रमाणें आपल्या नियोजनावरहि उमटलेला आहे. शत्रूंनीं कांहीहि आरोप केले तरी, जनतेची दिशाभूल करण्याच्या दृष्टीनें हे खोटे ठसे उमटवले गेले आहेत, असें निदान प्रामाणिक भारतीय जनता तरी म्हणणार नाहीं. तेवढा आत्मप्रत्यय भारतीय जनतेला आहे. परंतु त्याबरोबरच ज्या गतीनें व साकल्यानें हें काम व्हावयास पाहिजे त्या गतीनें व साकल्यानें तें होत नाहीं, या टोंचणाऱ्या जाणिवेचा प्रत्ययहि या जनतेला आहे.

या आक्रमणाच्या आघातानें जागे होऊन आपले नेते व आपली जनता नव्या तडफेनें कार्याला लागतील तर या आक्रमणानेंहि अनिष्टांतून इष्ट निर्माण केलें असें म्हणतां येईल. असें कार्य आपण केलें नाहीं व समाजवादी समाजरचना हें केवळ एक स्वप्नच आपण राहूं दिलें तर आक्रमकांच्या समोर आपली शक्ति सदैव उणीच राहील, ही जाणीव निर्माण होणें ही आजची सर्वांत मोठी निकड आहे.

सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची प्रस्थापना करण्याचा प्रयत्न करणें, हें सरकारचें कर्तव्य आहे, असें राज्यघटनेनें आपल्या मार्गदर्शक सूत्रांत (directive principles of state policy) सांगितलें आहे. या संदर्भात पुढील गोष्टींचाहि निर्देश करण्यांत आला आहे.

(१) प्रत्येक नागरिक स्त्रीपुरुषाला पुरेसें जीवनमान उपलब्ध करून दिलें जावें.

(२) देशांतील साधनसंपत्तीची मालकी व तिचें नियंत्रण देशाच्या हिताच्या दृष्टीनें नियमित केलीं जावींत.

(३) अर्थव्यवस्थेंत समाजहिताला घातक अशा रीतीनें संपत्तीचें आणि उत्पादनांच्या साधनांचें केंद्रीकरण होणार नाहीं अशी दक्षता घेतली जावी.

डिसेंबर १९५४ मध्यें लोकसभेनें भारताच्या सामाजिक व आर्थिक धोरणाचें ध्येय म्हणून 'समाजवादी समाजरचना' या ध्येयाचा स्वीकार केला. योजनाबद्ध विकास, लोकशाही आचार व समाजवादाच्या दिशेनें वाटचाल हा या समाजवादी समाजरचनेचा आशय होय.

दुसऱ्या योजनेनें या आशयांत अधिक स्पष्ट अर्थ भरण्याचा प्रयत्न केला तो असा : (१) उत्पादनाचे निर्णय नफ्याच्या अनुरोधानें न ठरतां राष्ट्राच्या गरजेच्या अनुरोधानें ठरावेत. (२) उत्पादन, विभाजन, उपयोग व भांडवलसंचय याविषयीं निर्णय राष्ट्रहिताविषयीं दक्ष असणाऱ्या मंडळांनीं घेतले पाहिजेत. (३) केवळ राष्ट्रीय उत्पादन वाढावें व रोजगारींत भर पडावी एवढें ध्येय पुरेसें नाहीं. उत्पादनाचें व संपत्तीचें विभजन उत्तरोत्तर अधिक समतेकडे जाणारें झालें पाहिजे. (४) राष्ट्रीय उत्पन्नांत होणारी वाढ दलित वर्गाच्या वाटणीला अधिकाधिक प्रमाणांत आली पाहिजे. (५) कोणत्याहि कनिष्ठ जातींत किंवा दरिद्री आर्थिक परिस्थितींत माणूस जन्माला आला तरी त्याला स्वतःचा पूर्ण विकास करून घेण्याची संधि राहील अशी सार्वत्रिक समाजस्थिति भारतांत निर्माण झाली पाहिजे.

अप्रगत राष्ट्रांत या गोष्टी साध्य करावयाच्या तर आर्थिक प्रगतीचा वेग सारखा वाढत गेला पाहिजे. त्यासाठीं सरकारी अर्थक्षेत्राबरोबर सहकारी अर्थक्षेत्राचाहि विकास केला पाहिजे. प्रत्येकाचें अन्न, वस्त्र, निवारा, शरीरस्वास्थ्य, शिक्षण यांची सुसह्य जीवनमानाच्या दृष्टीनें निदान किमान

कांहीं तरतूद झाली पाहिजे. आर्थिक विकासाच्या प्रयत्नांत संपत्तीचें केंद्रीकरण होत नाहीं व मक्तेदारीचा जोर वाढत नाहीं, याची काळजी घेतली गेली पाहिजे समाजांतील विविध वर्गांत सामंजस्याचें आणि सहकार्याचें वातावरण निर्माण झालें पाहिजे. भारतासारख्या ज्या देशांत आर्थिक वर्गभेदाबरोबरच अनेक सामाजिक जातिभेदहि अस्तित्वांत असतात त्या ठिकाणीं या परिवर्तनांत आणखीच अडचणी उभ्या राहतात. त्या सर्वांचा निरास करून समाजवादी समाजरचनेला आपला विकास करून घ्यावयाचा असतो.

समाजवादी समाजरचना लोकशाही मार्गानें अस्तित्वांत आणतांना अनेक अडचणी असतात, हें मान्य केलें तरी देखील त्या दिशेनें आपली गति फार कमी राहिली, हेंहि मान्य केलें पाहिजे. केवळ सद्भावना असून भागत नाहीं. त्या भावनेला साथ देणारी कृति हातून घडावी लागते. या दृष्टीनें आपण अपुरें पडलों याची जाणीव नियोजनमंडळालाहि झालेली आहे.

समाजवादी समाजरचनेच्या दिशेनें पावलें टाकत असतांना समाजासाठीं कांहीं कार्य न करतां केवळ समाजाचें परंपरागत शोषण करणारे वर्ग दूर करणें हें सर्वांत प्रथम होणारें व सर्वांत सोपें काम असतें कारण सरकारचा पाठिंबा हाच केवळ या वर्गाचा आधार असतो. सामाजिक उत्पादनाच्या प्रक्रियेंतील कार्यकारी भाग म्हणून आपलीं मुळें वर्गानें रुजवलेलीं नसतात. त्यामुळें या वर्गाला दूर केले तर त्या वर्गाखेरीज समाजाच्या कोणत्याच भागाला अपायकारक धक्का लागण्याचा संभव नसतो. या दृष्टीनें शेतीच्या उत्पादनांत कांहींहि लक्ष न घालतां केवळ खंडवसुलीवर चैन करणाऱ्या जमीनदार वर्गाला दूर करणें जितकें सोपें असतें तितकें राष्ट्रीय उत्पादनाच्या प्रयत्नांत क्रियाशील भाग घेणाऱ्या भांडवलदार वर्गाला दूर करणें सोपें असत नाहीं.

शेतीच्या क्षेत्रांत शोषण थांबविण्याच्या दृष्टीनें भारतांत प्रयत्न सुरू आहेत. परंतु हा आपला कार्यक्रम अजूनहि पूर्ण झालेला नाहीं. खंडाचा बोजा कमी करावा, कुळाला सुरक्षितता द्यावी, कसेल त्याची जमीन हें तत्त्व अंमलांत आणावें, शेतजमिनीच्या मालकीवर कमाल मर्यादा घालावी असें या कार्यक्रमाचें स्वरूप आहे. हा कार्यक्रम पूर्ण झाल्यावर आजच्या कुळाला जमीन कसण्यास अधिक उत्साह वाटेल व त्याला पूरक साहाय्य केल्यास शेतीचें उत्पन्न वाढेल अशीहि या कार्यक्रमाची एक इष्ट बाजू आहे. परंतु या विषयीचे

कायदे करण्याविषयीं व अमलांत आणण्याविषयीं झालेल्या दिरंगाईमुळें अनेक राज्यांत अजून हें काम अपुरें राहिलें आहे. सध्याच्या आणीबाणीचें कारण सांगून हे कार्यक्रम पुढें ढकलणें योग्य होणार नाहीं. किंबहुना समाजवादी समाजरचनेच्या दिशेनें आग्रही पावलें टाकणें आज तर विशेष निकडीचें आहे.

उद्योगधंद्यांच्या खाजगी अर्थक्षेत्रांत तर अधिक समता निर्माण होण्याऐवजीं संपत्तीचें अधिक केंद्रीकरण होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. खाजगी अर्थक्षेत्र अस्तित्वांत ठेवून ज्यावेळीं एखाद्या देशाचा जलद आर्थिक विकास केला जात असतो त्यावेळीं ही गोष्ट कांहींशी अपरिहार्यहि असते. नवीन विकासाच्या वातावरणाचा फायदा घेऊन आपलें कार्यक्षेत्र वाढविण्याची संधि आधींच मोठे असलेले उद्योगधंदे अधिक वापरूं शकतात. त्यांना अनुभव असतो, त्यांच्याकडे तंत्रज्ञ असतात, त्यांच्या स्वतःच्या संचयांतून त्यांनीं भांडवल सांठवलेलें असतें, त्यांना अधिक भांडवल उभें करणें हेंहि सुकर असतें, इतर देशांतील भांडवलदारांचें साहाय्य या उद्योगधंद्यांना अधिक सहजपणें मिळूं शकतें. अशा कारणासाठीं आधी मोठे असलेले उद्योगधंदे आणि उद्योगपतीच अधिक मोठे होऊं लागतात! खाजगी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत नियोजनकारांनीं आखलेला औद्योगिक विकास पूर्ण व्हायला यामुळें मदत होते ही गोष्ट खरी, परंतु त्याबरोबरच आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण होण्यांतहि याची परिणति होते व समाजवादी समाजरचनेपासून आपण तेवढ्या प्रमाणांत दूर जातो.

या अडचणींतून कसें बाहेर पडावें असा एक अवघड प्रश्न आहे. सहकारी पद्धतीनें आपण जितके अधिक उद्योगधंदे काढूं व मध्यम व लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांच्या विकासाला पोषक अशी परिस्थिति जितक्या अधिक प्रमाणांत निर्माण करूं शकूं तितक्या प्रमाणांत या प्रश्नाचें खरें उत्तर आपणाला सांपडणार आहे, या दोन्ही दृष्टींनीं सध्यां आपण प्रयत्न करीत आहोंत. महाराष्ट्र राज्यासारख्या कांहीं राज्यांत सहकारी कारखाने व मध्यमवर्गीय कारखानदारीची वाढ होत असल्यासारखी दिसते. परंतु संपूर्ण खाजगी अर्थव्यवस्थेवर आपली छाप पाडूं शकेल एवढी गति व शक्ति या औद्योगिक आंदोलनांत अद्याप आलेली नाहीं.

परंतु भारतांत केवळ मोठे उद्योगपति, छोटे उद्योगपति, वरिष्ठ वर्ग, मध्यमवर्ग एवढाच विचार करून भागणार नाहीं. आपलें सरासरीं माणशीं वार्षिक उत्पन्न तीनशें रुपायाच्या आसपास आहे. मध्यमवर्ग, वरिष्ठ वर्ग यांचें उत्पन्न याहून अधिक आहे. याचाच अर्थ कनिष्ठवर्गाची सरासरी तीनशेंहून खालीं असली पाहिजे, ही गोष्ट उघड आहे. आपल्या श्रमावर आपली उपजीविका चालविणारा भारतांतील सर्वांत कनिष्ठ वर्ग भूहीन शेतमजुरांचा आहे. शेतीव्यवसायांतील लोकांपैकीं पंधरा टक्के लोक या वर्गांत येतात. या वर्गाचें सरासरी वार्षिक दरडोयीं उत्पन्न केवळ ऐंशी रुपयांचें आहे. याखालीं अपंग, भणंग, भिकारी यांची लोकसंख्याहि भारतांत अनेक दशलक्षांची आहे.

या वर्गापर्यंत, राष्ट्रीय उत्पन्नांतील वाढाव्याचा किती भाग जाऊन पोंचत आहे ? या वर्गांतील आणि वरिष्ठ वर्गांतील अंतर उत्तरोत्तर कमी होत आहे कीं वाढत आहे ? याविषयीं निश्चित निर्णय देण्याएवढी तपशीलवार माहिती आपल्यापाशीं उपलब्ध नाहीं. परंतु त्या पाहणीचा निर्णय कसाहि आला तरी हें अंतर अजून पुष्कळच तुटावयाचें आहे व किमान साधें जीवनमानहि भारतांत अनेक लोकांना अजून उपलब्ध व्हावयाचें आहे, ही गोष्ट स्पष्ट करण्यासाठीं कोणत्याहि पाहणीची गरज नाहीं. केवळ डोळे उघडून नीट पाहिलें तरी पुरेसें आहे. मोठे उद्योगधंदे, शेतीविकासयोजना, विकासप्रकल्प (community development) यासारखे सर्व प्रयत्न आज वरिष्ठ वर्ग, मध्यम वर्ग व फार तर कनिष्ठ मध्यम वर्ग यांच्यापर्यंत परिणामकारकरीत्या जाऊन पोंचूं शकतात हा अनुभव आहे. रवींद्रनाथांनीं एके ठिकाणीं परमेश्वराला उद्देशून म्हटलें आहे, " तुझ्या पावलाला प्रणाम करावा म्हणून मी कितीहि खालीं वाकलों तरी हीनदीन हताश लोकांच्यामध्यें वावरणाऱ्या तुझ्या पावलांपर्यंत तो प्रणाम पोंचूंच शकत नाहीं. " दरिद्रनारायणाची पूजा बांधण्याच्या प्रयत्नांत भारताच्या विकास प्रयत्नांची आज अशीच स्थिति झाली आहे.

किमान व कमाल उत्पन्नांतील भारतांतील आजचें अंतर तुटलें पाहिजे. खूप तुटलें पाहिजे. कर-परीक्षण समितीनें (Taxation Enquiry Commission) भारतांत कर दिला गेल्यानंतर शिल्लक राहणारें कोणाचेंहि उत्पन्न हें भारतीय कुटुंबाच्या सरासरी वार्षिक उत्पन्नाच्या तीस पटीहून अधिक

असूं नये, असें म्हटलें होतें ! आज तें त्याहूनहि अधिक आहे. या समितीनें घातलेली मर्यादाहि अक्षम्य सढळ अशी आहे. सरासरी माणशीं उत्पन्न तीनशें रुपये याप्रमाणें हिशेब केला तर सर्वसाधारण पांच माणसांच्या कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न १५०० रुपये होते. याच्या तीसपट म्हणजे पंचेचाळीस हजार रुपये झाले. इतके करमुक्त उत्पन्न मिळावयाचें तर मूळ उत्पन्न याहून कांहीं पटीनें अधिक असलें पाहिजे ही गोष्ट उघड आहे आणि सरासरी उत्पन्नाची भाषा ही भारताच्या संदर्भात कांहीशी दिशाभूल करणारी आहे. ज्यांचें अर्जन शून्य आहे अशी भिकारी, बेकार लोकांची भारतांतील संख्या फार मोठी आहे. किमान उत्पन्नाची भारतीय पातळी शून्य ही आहे !

यांतून बाहेर पडावयाचें तर आर्थिक विकास झाल्यानंतर सर्वांचीच स्थिति आपोआप सुधारेल, अशी वृत्ति धारण करून चालणार नाहीं. वाढत्या लोकसंख्येमुळें आपला प्रश्न आणखीच बिकट बनला आहे. उत्तरोत्तर बेकारी कमी होण्याऐवजीं वाढत आहे. प्रत्येकाला काम व पुरेसें वेतन देण्याची तरतूद आपला विकासाचा कार्यक्रम अजून करूं शकलेला नाहीं. त्यासाठीं हरप्रयत्न झाला पाहिजे, तरच आपण दलितांच्यासाठीं कांहीं साध्य केलें असें होईल.

नवीन पिढींत सर्वांना सारखी संधि मिळावी यासाठीं शिक्षणाची संधि समान राहिली पाहिजे. या दिशेनें मात्र आपलीं कांहीं आग्रही पावलें पडतांना दिसत आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. परंतु याहि क्षेत्रांत अजून कितीतरी गोष्टी व्हावयास हव्या आहेत. समाजवादी समाजरचनेच्या दृष्टीनें झपाट्यानें वाटचाल करण्याचा आग्रह आज सर्वच क्षेत्रांत निर्माण व्हावयास हवा. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत नियोजनकारांनींहि हें स्पष्ट म्हटलें आहे. "अनेक कारणांसाठीं, समाजवादी समाजरचनेच्या ध्येयाकडे जाण्याच्या आपल्या प्रयत्नांत आज अधिक गतिमानता आणि निकड निर्माण होण्याची गरज आहे." असें त्यांनीं नमूद केलें आहे. नियोजनकारांच्या मनांत असलेल्या 'अनेक कारणांत' चीनचें आक्रमक आव्हान हें कारण बहुधा नसावें. परंतु आज तेवढें एक कारणदेखील आपल्याला कार्यप्रवण करावयास निर्णायक म्हणून पुरेसें आहे. कारण हुकूमशाही साम्यवादाला लोकशाही समाजवादाच्या प्रभावी आचाराखेरीज दुसरें अंतिम उत्तर नाहीं.



१७. लोकशाही जागृति

हुकूमशाही साम्यवादाला लोकशाही समाजवादाखेरीज दुसरें अंतिम उत्तर नाहीं असें आपण म्हटलें. कारण लोकशाही समाजवादच आर्थिक समता साध्य करून साम्यवादामागील त्या प्रेरणेचें आकर्षण कमी करूं शकतो. तें आकर्षण कमी झाल्याखेरीज अप्रगत राष्ट्रांतून साम्यवाद दूर ठेवणें कठीण असतें. आर्थिक समतेचें साम्यवादाचें ध्येय तर लोकशाही समाजवाद साकार करतोंच परंतु साम्यवादांत अनुस्यूत असलेली अनिष्ट हुकूमशाही टाळून, व्यक्ति-स्वातंत्र्याचें वातावरण कायम ठेवून समता साध्य करतो. समता आणि व्यक्ति-स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी ज्या जनतेला एकदम अनुभवावयास मिळतील ती जनता साम्यवादाच्या आहारीं कां जाईल ?

लोकशाही समाजवाद ज्या देशांत दृढमूल झाला असेल तो देश साम्य-वादाला खरोखरीच अजिंक्य आहे. एखाद्या साम्यवादी राष्ट्रानें त्याच्यावर लष्करी आक्रमण करून तो कांहीं काळ जिंकला गेला तरी देखील खऱ्या अर्थानें तो अजिंक्य आहे. कारण आपल्या अधिक चांगल्या जीवनध्येयासाठीं झगडण्याची त्या देशांतील जनतेची वृत्ति जिंकली जाणार नाहीं. तयारीसाठीं एखाद्या वेळीं तिला कांहीं काळ लागूं शकेलहि, परंतु संधि येतांच ही जागृत जनता आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित केल्याखेरीज राहाणार नाहीं.

परंतु यासाठीं केवळ लोकशाही समाजवादी समाजरचनेची घोषणा करून उपयोगी नाहीं, ती प्रत्यक्षांत अस्तित्वांत आणली पाहिजे किंवा निदान आणली जाईल एवढी निश्चिति जनतेला वाटली पाहिजे. यासाठीं समाज-वादी समाजरचनेचीं आर्थिक पावलें टाकणें जितकें अगत्याचें आहे त्याच-प्रमाणें लोकशाही जागृतीचें वातावरण देशांत सतत कायम राखणेंहि अगत्याचें आहे.

समाजवादी समाजरचना आणि लोकशाही आचार यांतील कांहीं भाग तांत्रिक, संघटनात्मक असा आहे. आर्थिक व राजकीय क्षेत्रांत विशिष्ट संस्थात्मक बदल व नवी रचना करणें त्याच्यासाठीं आवश्यक असते. परंतु ती संस्थात्मक घडण म्हणजे त्या गोष्टींचा प्राण नव्हे, ही गोष्ट आपण ओळखली पाहिजे. नाहींतर बाह्यसंस्थात्मक आकार दिला कीं आपण प्राणभूत रचना तयार केलीच आहे

असा आपला गैरसमज होतो ! लोकशाहीपुरतें उदाहरण घ्यावयाचें तर सार्वत्रिक निवडणुकीचें तंत्र वापरलें व संसदीय कारभार केला कीं लोकशाही दृढमूल झाली आहे असें मानण्याकडे कांहीं मंडळींचा कल होतो.

लोकशाही वातावरण ही फार कष्टसाध्य गोष्ट आहे. परंतु माणसानें माणूस म्हणून स्वाभिमानानें, आपलें मस्तक उन्नत ठेवून जगावें अशी आपली समाजरचनेची कल्पना असेल – त्यानें केवळ हुकूमशहाचा हुकूम मानणारा एक गुलाम म्हणून राहूं नये असें वाटत असेल – तर लोकशाहीचा आग्रह हा धरलाच पाहिजे. गुलाम कार्यक्षम नसतात असें नाहीं. त्यांच्या अन्नवस्त्र-निवाऱ्याची तरतूद करण्यांत येत नाहीं असेंहि नाहीं. कदाचित् ते आहार-विहार-मनरंजन याबाबतींत ढोबळ अर्थानें सुखीहि असतील. 'परंतु नरकांत देखील जे सुखी असतात त्यांच्यासारखे पतित तेच !' हें जसें आपण म्हणतों तसेंच हुकूमशाहीच्या वातावरणांत मोकळ्या मनानें बोलणें, लिहिणें, प्रचार करणें, संघटना करणें या गोष्टी अशक्य असतांना, आत्मस्वातंत्र्य गमावून केवळ भौतिक सुखें मिळतात म्हणून स्वतःला सुखी समजणाऱ्या गुलामांच्यासारखे दुर्दैवी तेच असें म्हणावें लागेल. कारण इतर गुलामांना आपल्या गुलामगिरीतून बाहेर पडावयाचें आहे याची जाणीव तरी असते. 'सुखी' गुलामांची ही जाणीवहि मरून गेलेली असते ! मग त्यांच्या उद्धाराची आशा कोठून असणार ?

भारतासारख्या राष्ट्राला आजच्या परिस्थितींत लोकशाही अधिकच कष्ट-साध्य आहे. एकतर आपल्या आर्थिक विकासाच्या प्रारंभींच्या काळांतच सार्वत्रिक मतदानावर आधारित अशा लोकशाहीचा भारतानें स्वीकार केला आहे. आज जीं प्रमुख लोकशाही राष्ट्रें म्हणून ओळखलीं जातात त्यामध्येंहि सार्वत्रिक मतदानाचा हक्क हा गेल्या सुमारें तीनचार दशकांतच देण्यांत आलेला आहे. दुसरें, भारताची सांस्कृतिक परंपरा लोकशाहीची आहे असें म्हणतां येणार नाहीं. आज भारतासभोंवतालच्या राष्ट्रांत जे राजकीय वारे वहात आहेत तेहि लोकशाहीला पोषक आहेत असें म्हणतां येणार नाहीं. कांहीं राष्ट्रांतून लष्कराची हुकूमशाही आहे, कांहीं राष्ट्रांतून साम्यवादी हुकूमशाही आहे आणि कोणत्या राष्ट्रांत कसली क्रांति कोणत्या क्षणीं होईल याची शाश्वति राहिलेली नाहीं. असें सर्व आशिया खंडांतच अस्थिर राजकीय वातावरण

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत सतत राहिलें आहे. या वादळी वातावरणांत आपल्याला आपलें लोकशाहीचें रोपटें वाढवावयाचें आहे.

या अडचणी आहेत त्याप्रमाणें कांहीं अनुकूल गोष्टीहि आहेत याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. भारतीय संस्कृतीची परंपरा लोकशाहीचो नसली तरी भारतीय वृत्ति सहिष्णुतेची आहे आणि सहिष्णुवृत्ति हा तर लोकशाहीचा प्राण आहे. ब्रिटिश राजवटींत आपण लोकशाहीचे कांहीं बाह्य आचार शिकलों आणि या कालांतील शिक्षितवर्ग हा ब्रिटिश लोकशाहीचे संस्कार आपल्या विचारपद्धतीवर होऊन तयार झाला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं स्वातंत्र्यासाठीं जें राष्ट्रीय आंदोलन झालें तेंहि सत्याग्रहाच्या स्वरूपाचें झालें. सत्य आणि अहिंसा यांच्याविषयीं गांधीजींचा आग्रह होता. गांधीजींचा हा वारसा लोकशाही वातावरणाच्या दृष्टीनें उपयुक्त ठरला आहे.

या खेरीज दोन गोष्टी एका दृष्टीनें भारतीय लोकशाहीला पोषक झाल्या आहेत तर दुसऱ्या दृष्टीनें भारतीय लोकशाही दुर्बल ठेवण्यास कारणीभूत झालेल्या आहेत. स्वातंत्र्यसंपादनानंतरच्या काळांत मध्यवर्ति सरकारमध्यें व विविध राज्यांत काँग्रेपक्षाला लाभलेली जवळजवळ अप्रतिहत सत्ता, ही यापैकीं एक गोष्ट होय. पं. नेहरूंचें नेतृत्व ही दुसरी गोष्ट होय.

काँग्रेस पक्ष इतर पक्षांच्या तुलनेंत असा बलवत्तर राहिला नसता व भारतांत अनेक तुल्यबल पक्ष अस्तित्वांत आले असते तर राजकीय सुंदोपसुंदींत भारताला स्थिर राजवट लाभली नसती. मग आज झाला तितकाहि आर्थिक विकास झाला नसता व या बेबंदशाहींतून सुटका म्हणून हुकूमशाहीचा मार्गहि कदाचित् भारतानें यापूर्वीच स्वीकारला असता.

परंतु काँग्रेसला अशी सत्ता लाभत गेल्यामुळें मतसंख्येपलीकडे काँग्रेसची लोकशाहीविषयींची आस्था अधिक प्रगत होऊं शकली नाहीं. लोकशाहीवर श्रद्धा असणाराच दुसरा एखादा तुल्यबल पक्ष अस्तित्वांत असता तर या परिस्थितींत फरक पडूं शकला असता. परंतु असे पक्ष आपल्या कार्यानें वाढावे लागतात, ते कृत्रिमरीत्या, अस्तित्वांत आणावेत म्हणून आणतां येत नाहींत. या मर्यादेमुळें पंचवार्षिक निवडणुकांतील मतदानापलीकडे अधिक कार्यकारी स्वरूपांत लोकशाही वातावरण खालच्या थरापर्यंत पोंचूं शकलें नाहीं.

आणीबाणीच्या परिस्थितींत दिसून आलेली एक उत्साहवर्धक घटना म्हणजे इतर राजकीय पक्षांनीं प्रकट केलेली डोळस व प्रखर राष्ट्रनिष्ठा. एक साम्यवादी पक्षाचा अपवाद सोडला तर इतर सर्व विरोधी पक्षांनीं चिनी आक्रमणाचा कडवा प्रतिकार करण्याबाबत आग्रह धरला आहे. उपाययोजनेच्या तपशिलाबाबत त्यांच्यांत मतभेद असेल, पण आपल्या स्वातंत्र्यरक्षणाबाबत कसलीहि तडजोड पत्करणें योग्य नाहीं अशी खंबीर भूमिका त्यांनीं घेतली आहे. काँग्रेसच्या तुलनेनें या पक्षांचें सामर्थ्य फार तोकडें असेल. सामर्थ्य किंवा शक्ति कमी याचा अर्थ निवडणुकांत त्यांना फारसें यश मिळत नाहीं, पण तें कमी मिळालें व त्यामुळें लोकसभेंत किंवा विधानसभांत विरोधी पक्षांचे नेते संख्येनें कमी असले तरी देशावर आलेल्या या संकटाच्या प्रसंगीं त्यांचें विधि-मंडळाबाहेरचें कार्यदेखील अनेक दृष्टींनीं उपयुक्त ठरलें आहे. एक तर संकटाचें स्वरूप जनतेला समजावून सांगण्यांत त्यांची बुद्धि व वाणी-लेखणी यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला व होतो आहे. वेगवेगळ्या प्रश्नांवर इतर पक्ष जें कांहीं मतप्रदर्शन करतात त्यामुळें लोकांनाहि आपलें मत बन-वायला मदत होते आहे. अशाप्रकारें बनत असलेलें लोकमत चटकन दृश्य प्रभाव पाडूं शकत नसलें तरी त्याचा परिणाम राज्यकर्त्यांच्या धोरणावर होतच नाहीं असें नाही. शिवाय या पक्षांच्या नेतृत्वाखालीं काम करणाऱ्या विविध संघटनांनीं राष्ट्रसंरक्षणांत अडथळा तर आणायचा नाहींच, उलट शक्य तेवढें साह्य करायचें अशी राष्ट्रीय वृत्ति दाखवली यांचेंहि मूल्य मोठें आहे. देशावरील हें गंडांतर परतवून लावण्यासाठीं करावयाच्या उपाययोजनेंत त्यांच्या सल्लामसलतीचा निश्चितपणें उपयोग होईल व देशांत लोकशाही वातावरण टिकविण्यास साह्य होईल याबद्दल शंका नाहीं.

पं. नेहरूंचें व्यक्तिमत्त्व आणि त्यांची लोकशाहीवरील आंतरिक श्रद्धा हाहि भारतीय लोकशाहीचा मोठा आधारस्तंभ ठरला आहे. पं. नेहरूंची लोकशाहीवर अशी श्रद्धा नसती तर भारतांत हुकूमशाही स्थापन होणें अवघड नव्हतें. इतकी लोकप्रियता लाभलेल्या दुसऱ्या एखाद्या नेत्याला एखाद्या वेळीं तरी तसा मोह झालाहि असता. अनेकविध आशानिराशांच्या परिस्थितींत पंडितजींची लोकशाहीवरील श्रद्धा यत्किंचितहि ढळली नाहीं, हें भारताचें भाग्य आहे.

परंतु या व्यक्तिमत्त्वामुळेंच पंडिजींच्यानंतर भारतीय लोकशाहीला अत्यंत कसोटीच्या काळांतून जावें लागणार आहे. 'पंडितजींच्यानंतर कोण?' हा प्रश्न अनेकदां चर्चिला जातो. 'पंडितजींच्या नंतर काय?' हा खरा भारतीय लोकशाहीपुढें बिकट प्रश्न आहे. या व्यक्तिमत्त्वानें भारतीय लोकशाहीला आधार दिला, पण तो जवळजवळ एकखांबी आधाराच्या स्वरूपाचा राहिला. लोकशाहीचा गोवर्धन कोणी एका श्रीकृष्णानें आपल्या करांगुलीनें पेलून चालत नाहीं, असंख्य गोपांच्या बाहूत तें सामर्थ्य यावें लागतें.

या अशा अनेक समस्यांची उकल करीत भारतीय लोकशाहीला पुढें जावयाचें आहे. शीघ्र आर्थिक प्रगतीच्या बाबतींत, लष्करी सामर्थ्याच्या बाबतींत, हुकूमशाहीशीं तुलना करतां, लोकशाही दुबळी ठरते असा प्रवाद आहे. 'प्रवाद' म्हणण्याचें कारण कांहीं वेळां ही गोष्ट खरी असली तरी नेहमीं खरी असतेच असें नाहीं. इंग्लंड लष्करीदृष्ट्या जर्मनीशीं झालेल्या लढाईंत अपुरें पडलें नाहीं. किंबहुना लोकशाही राष्ट्र ज्यावेळीं उत्साहानें कार्यान्वित होते त्यावेळीं त्याची कार्यशक्ति हुकूमशाही राष्ट्रापेक्षांहि अधिक असते. कारण तेथें निर्णय लोकांनींच घेतलेले असतात व ते निर्णय आपल्या उत्साहानें तेच प्राणपणानें कार्यवाहींत आणीत असतात. हुकूमशाहीच्या भीतीनें केलेल्या कामापेक्षां असें काम अधिक प्रभावी झालें तर त्यांत आश्चर्य तें कोणतें?

यासाठीं जागृत लोकशाहीनिष्ठेची आज गरज आहे. विचारवंतांनीं, कार्यकर्त्यांनीं या दृष्टीनें काम केलें पाहिजे. तसें झालें तर संरक्षणासाठीं, आर्थिक विकासासाठीं लोकांना अधिक त्याग कसा करावयास लावावा याचा प्रश्न सुटेल; सांठेबाजी, नफेबाजीसारख्या समाजहितविरोधी गोष्टींना आळा बसेल; अनेकविध सहकारी संघटना वाढीला लागतील; उत्स्फूर्त श्रमदानानें कार्यें उभीं केलीं जातील; किंबहुना आणीबाणीच्या काळांत व्यक्तिस्वातंत्र्यावर कांहीं बंधनें लादलीं गेलीं तरी त्या बंधनांचा वापर योग्य मर्यादेंतच होईल एवढी दक्षता घेण्याचें सामर्थ्य या लोकशाहींत राहील.

आज लोकसभेपासून खालीं पंचायतराज्यापर्यंत लोकशाहीची यंत्रणा भारतांत उभी करण्यांत आली आहे. जनतेचें लोकशाही विचाराच्या व आचाराच्या क्षेत्रांत शिक्षण करून या यंत्रणेंत प्राण ओतण्याची स्फूर्ति या

दा. क. 7302

आणीबाणीच्या प्रसंगानें आपल्याला झाली तर एक अजिंक्य असा लोकशाही समाजवादी भारत आपल्याला अजूनहि उभा करतां येईल. परंतु यासाठीं लोकशाही समाजवादी समाजरचनेवर श्रद्धा असणाऱ्या सर्व लोकांनीं आणीबाणीची वेळ ओळखून एकदिलानें कामाला मात्र लागलें पाहिजे.

◎ ◎ ◎

१८. युद्धप्रयत्नांतील आपलें स्थान

अलीकडचें युद्ध केवळ रणांगणावरच लढलें जातें असें नाहीं. सैनिकांच्या प्रयत्नांइतकेंच देशांतील प्रत्येक नागरिकानें चालवलेल्या युद्धप्रयत्नालाहि महत्त्व असतें. कसाहि प्रसंग आला तरी प्राणपणानें आपल्या कामाच्या जागीं निर्धारानें उभें राहणें व उत्पादनाच्या कार्यांत कोणत्याहि कारणानें खंड पडणार नाहीं याची दक्षता घेणें, हीं प्रत्येक नागरिकाचीं प्रमुख कर्तव्यें आहेत. या वातावरणासाठीं प्रचार करणें तर आवश्यकच आहे, परंतु प्रत्येकानें आपापल्या क्षेत्रांत निर्धारानें चालवलेला आचार हाच याचा अधिक प्रभावी प्रचार आहे. आपल्या क्षेत्रांतील काम पार पाडून इतरहि कांहीं संघटनांतून आपण कार्य करणें सध्या आवश्यक आहे अशा संघटनांची माहिती खालीं दिली आहे. प्रत्यक्ष कार्य करण्याच्या दृष्टीनें त्या त्या जिल्ह्यांत जिल्हा राष्ट्रीय संरक्षण समितीशीं संबंध ठेवतां येईल. त्या संघटना अशा–

१ नॅशनल व्हॉलंटिअर रायफल्स : सेनादलांची साहाय्यक संघटना. १८ ते ३५ वर्षें वयाच्या स्त्रीपुरुषांना प्रवेश. संरक्षणाच्या विविध कार्याचें शिक्षण.

२ (अ) नॅशनल कॅडेट कोअर : कॉलेजमधील विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण.

(ब) ए. सी. सी. ऑक्झिलिअरी कॅडेट कोअर : शाळांतील विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण.

३ (क) मुलकी संरक्षण संघटना (ए. आर. पी) : आणीबाणीच्या वेळीं, विमानहल्ल्यांच्या वेळीं संरक्षण. शहरांच्या लोकसंख्येच्या सुमारे चार टक्के लोक या संघटनेंत असावेत.

४ होमगार्ड : शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या कामीं पोलीसांना मदत करणारी निम-सरकारी संघटना

५ ग्राम स्वयंसेवक दल : खेड्यांतील सर्व धडधाकट स्त्रीपुरुष यांत सामील होऊं शकतील. कार्य : ग्रामसंरक्षण, उत्पादन, आणि सामूहिक शिक्षण.

६ डिफेन्स लेबर बँक : खेडूतांना महिन्यांतलें एक दिवसाचें काम किंवा एक दिवसाची मजुरी देणगी म्हणून देण्याचें आवाहन केलें जाईल.

७ वुमेन्स व्हॉलंटियर कोअर (महिला स्वयंसेविका दल) : मोटार चालवणें, टेलिफोनचें व ऑपरेटर, वायरलेस, प्रथमोपचार, उपहारगृहें चालवणें इत्यादि कामासाठीं शिक्षण.

८ व्हॉलंटिअर सर्व्हिस कोअर : मुलकी लोकांच्या संरक्षण कार्यासाठीं लोकांच्या व्यावसायिक ज्ञानाचा आणि अनुभवाचा उपयोग करून घेण्याचें काम ही संघटना करील. भिन्न व्यवसायांतील लोक या संघटनेमार्फत संरक्षण कार्यासाठीं मदत करूं शकतील.

९ व्हॉलंटिअर ट्रॅन्स्पोर्ट कोअर : ज्यांच्याजवळ मोटरगाड्या, ट्रक वगैरे आहेत आणि असाधारण परिस्थितींत कांहीं कामासाठीं कांहीं वेळ किंवा पूर्ण वेळ द्यायला जे लोक तयार आहेत असे लोक या दलांत राहतील.

राष्ट्राच्या संरक्षणाच्या प्रयत्नांत आपला हातभार म्हणून अशा संघटनांतून कार्य करतां येईल. तुम्ही प्रौढ असला पाहिजेत आणि तुमचें निदान प्राथमिक शिक्षण झालेलें असलें पाहिजे. एवढीच पात्रता या संघटनांत दाखल होण्यासाठीं पुरेशी आहे. राष्ट्रभक्तीनें हें कार्य व्हावयाचें असल्यामुळें तें साधारणपणें विनामूल्य करावें लागेल. अर्थात् कार्य प्रभावी होण्याच्या दृष्टीनें शिस्त ही काटेकोरपणें पाळावी पाळावी लागेल. शिक्षण घेत असतांना किंवा प्रत्यक्ष काम करीत असतांना, कोणालाहि परवानगीवांचून गैरहजर राहता येणार नाहीं. इतर सरकारी नोकरांना गुप्तता पाळण्यासठीं जे नियम पाळावे लागतात, तेच नियम या संघटनांत दाखल होणाऱ्या प्रत्येक सभासदाला पाळावे लागतील. शिक्षण घेत असतांना किंवा प्रत्यक्ष काम करत असतांना एखाद्या व्यक्तीला दुखापत झाली किंवा मालमत्तेचें नुकसान झालें तर त्याची भरपाई करून दिली जाईल.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६१९९ वि: निबंध ५३

याखेरीज इतरहि संघटना कार्यकारी आहेत किंवा होऊं शकतील. उदाहरणार्थ :


महिला संघटना प्रथमोपचाराचे वर्ग चालवूं शकतील.

नॅशनल रायफल ट्रेनिंग ॲसोसिएशन ही एक महत्त्वाची बिगर सरकारी संघटना नागरिकांना निशाणबाजी शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहे.

संरक्षण कार्यांत लोकांनीं करावयाच्या प्रयत्नांत एकसूत्रता आणण्यासाठीं नागरिक मध्यवर्ति समिति स्थापन करण्यांत आली असून तिच्यांत सर्व बिनसरकारी व्यक्ति आहेत. प्रत्येक राज्यांत, जिल्ह्यांत, शहरांत नागरिकांच्या ज्या समित्या स्थापन केल्या जात आहेत त्यांना ही समिति मार्गदर्शन करील.

सर्व पक्षांचे लोक घेऊन या संघटना बनवण्यांत आल्या असून त्यांची कांहीं मुख्य कामें अशीं राहतील–

(१) उत्पादनवाढीला हातभार लावणें.
(२) राष्ट्रीय संरक्षण निधि आणि संरक्षण कर्ज यासाठीं पैसा जमविणें.
(३) लोकांचें मनोधैर्य कायम राखणें व युद्धप्रयत्नाला पोषक प्रचार करणें.
(४) सांठेबाजी व नफेबाजी यांना आळा घालणें.
(५) रक्तदानाचा प्रचार करणें.



अधिक वाचन :

पन्नालाल सुराणा : चीनचें आक्रमण : राजकीय पार्श्वभूमि

त्र्यं. र. देवगिरीकर : भारत-चीन संघर्ष

पब्लिकेशन्स डिव्हिजन : युद्धामधील आणि शांततेमधील चीनचें आक्रमण (not for sale)

" : China's Betrayal of India : Background to the invasion 1962. (not for sale)

Madhu Limaye : The Sino-Indian War. 1962.

A. D. Gorwala : Danger from Communist China. (Popular Book Depot 1959)

Jawaharlal Nehru : India-China Relations. (२७ नोव्हेंबर १९५९ चें लोकसभेंतील भाषण). Pub. Div. (not for sale)

: संरक्षणासाठीं विकास. १८ जानेवारी १९६३ चेराष्ट्रीय विकास मंडळाच्या स्थायीसमितींतील भाषण. Pub. Div. (not for sale)

Publications Division : तुम्ही आणि स्वातंत्र्यरक्षणाची लढाई. डिसेंबर १९६२.

Jawaharlal Nehru : We accept China's challenge. Pub. Div. (not for sale.) (speeches in Lok Sabha-extracts.)

प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र-शासन, मुंबई : ग्राम स्वयंसेवक दल.

: युद्धप्रयत्नांचा हिमालय उभा करा.

लोकमित्र भारत संरक्षण खास अंक. २६ जानेवारी १९६३.

The Economic Weekly : Fourteenth annual Number : Meeting the Chinese Threat. Feb. 1963.

दे. अ. दाभोळकर : लोकशाही समाजवाद.

" : आर्थिक विकासाचा प्रश्न.

" : भारतांतील आर्थिक नियोजन.

भारताची उत्तर सरहद्द

या सरहद्दीचे दोन प्रमुख भाग पडतात. **पहिला भाग**—भारताच्या वायव्येकडील आणि उत्तरेकडील प्रदेश. सध्या पाकिस्तानच्या ताब्यांत असलेल्या काश्मीरच्या प्रदेशांतील गिलगित एजन्सी, हुंझा हा भाग व भारताच्या ताब्यांतील काराकोरम खिंडीपासून ते आक्साई चीन व उत्तर प्रदेशांतील बाराहोती व अन्य खिंडींपर्यंतचा एक भाग. या भागांत १९५७ सालापासून संघर्ष निर्माण झालेला आहे. **दुसरा भाग**—नेफा या नांवानें ओळखला जाणारा भारताच्या इशान्येस असलेला प्रदेश. या दुसऱ्या भागाची सरहद्द सुमारें ८०० मैल लांबीची असून गतवर्षी याच भागांत चीननें मोठ्या प्रमाणांत आक्रमण करून बोमडीलाच्या दक्षिणेस १५ मैलापर्यंत मजल मारलेली होती. याच ठिकाणीं आंतर राष्ट्रीय सरहद्द 'मॅकमहॉन लाइन' या नांवानें प्रख्यात आहे. नेपाळ हें स्वतंत्र राज्य असल्यानें नेपाळ-चीन सरहद्दीचा प्रश्न हा त्या राज्यांच्या अखत्यारींतील प्रश्न आहे. असें असलें तरी त्यांच्या सरहद्द प्रश्नाकडे आपल्याला दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आणखी दोन राज्यांची सरहद्द चीनला भिडलेली आहे. तीं राज्यें सिक्कीम व भूतान हीं होत. हीं राज्यें अंतर्गत बाबतींत स्वतंत्र असलीं तरी संरक्षण व परराष्ट्रसंबंध या बाबी त्यांनीं भारताकडे सोपवलेल्या आहेत. सिक्कीम व भूतान यांमधील भारतीय अधिकारास चीननें मान्यता दिलेली नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. म्हणजे आज या सरहद्दीवर कटकटी जरी होत नसल्या तरी या सरहद्दींकडे दुर्लक्ष करून मुळींच चालणार नाहीं. तात्पर्य भारताच्या उत्तर सरहद्दीचा विचार करतांना काश्मीरचा पाकिस्तानच्या ताब्यांतील प्रदेश, भारताच्या ताब्यांतील प्रदेश, नेपाळ-चीन सरहद्द, सिक्कीम व भूतानची सरहद्द व नेफा या सर्वप्रदेशांचा विचार करावा लागतो.

लडाख

भारत–चीन सरहद्दीवरील हा सर्वच प्रदेश अत्यंत दुर्गम अशा पर्वत-श्रेणींनीं भरलेला आहे. यापैकीं काश्मीरलगतच्या खिंडींतूनच अनेक परकीय

टोळ्या भारतांत आल्या. ब्रिटिशपूर्वकाळांतील आक्रमणें याच वायव्य सरहद्दी-कडील प्रदेशांतून झालीं. रशियन आक्रमणाचें भय ब्रिटिशांना वाटल्यामुळेंच हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीला त्यांनीं संरक्षणाच्या दृष्टीनें फार महत्त्व दिलें. पण त्या प्रमाणांत लक्ष, अक्साई-चीन, नेफा इत्यादि प्रदेशांत देण्याची गरज त्यांना भासली नाहीं. या प्रदेशांत नेफाप्रमाणें किंवा वायव्य सरहद्दीवरील प्रांतांप्रमाणें टोळीवाल्यांची वस्ती नाहीं. चीनचा सिकियांग प्रांत आणि तिबेट व लडाख या टापूत जुने खुष्कीचे मार्ग आहेत. हे मार्ग बारमाही नाहींत यापैकीं ४-५ प्रमुख रस्ते पुढीलप्रमाणें आहेत—(अ) गिलगिट ते यार्कंद व्हाया हुंझा (ब) लेह (लडाखची राजधानी) ते यार्कंद व्हाया लानाकला काशगरदर्या, खोतान. (ड) काशगर-यार्कंद खोतान, (इ) श्रीनगर-झोजिला खिंड, काशगर ते लेह. अक्साईचीनमध्यें चीननें जो रस्ता बांधला म्हणून सांगण्यांत येतो तो म्हणजे जुन्या खुष्कीच्या मार्गाची सुधारलेली आवृत्ति असावी. कारण अस अनेक खिंडींना जोडणारे पायरस्ते त्या प्रदेशांत आहेत. ह्या प्रदेशांत अनेक ग्लेसियर्स आहेत. हिंदुस्थान सरकारनें १९२९ सालीं प्रसिद्ध केलेल्या नकाशांत यापैकीं बराच भाग हा शोध न लागलेला म्हणून दाखविण्यांत आलेला आहे. लडाखी प्रदेशांतील लोक हे तिबेटी-बौद्धधर्मीय आहेत.

१८४२ सालीं शीख राजा गुलाबसिंग आणि चीनचा सम्राट् व तिबेटचा लामा यांच्यांतील झालेला तह कम्युनिस्ट चीन सरकारला मान्य नाहीं. हा तह त्या वेळच्या पेकिंग सरकारनें केलेला नाहीं, सबब त्यांच्या आजच्या वारसांवर म्हणजे कम्युनिस्ट चीनवर-तो बंधनकारक नाहीं, असा त्यांचा दावा आहे. त्या भागांतील सरहद्दी कधींच निश्चित आंखलेल्या नव्हत्या, हा त्यांचा दुसरा मुद्दा आणि आज अक्साईचीनच्या ज्या प्रदेशावर चीन आपली मालकी सांगत आहे तो टापू तिबेटचा नसून चीनच्या सिकियांग प्रांताचा एक भाग आहे, असें चीनचें म्हणणें आहे. चीनचें हें म्हणणें खोटें आहे यांत मुळींच शंका नाहीं, कारण इंग्रजांनीं १८४७ सालीं हा प्रश्न काश्मीरच्या सार्वभौमत्वाच्या संदर्भांत उपस्थित केलेला होता. त्यावेळीं चिनी सरकारनें असें उत्तर दिलें कीं, "सरहद्दी पुरेशा प्रमाणांत ठरविलेल्या आहेत, जुनीच व्यवस्था चालू ठेवावी व त्या व्यवस्थेस चिकटून रहावें." शिवाय

या तहावर सह्या करणारा कलोन सोकोन हा जन्मानें तिबेटी असला तरी चिनी अधिकारी होता. अक्साई चीन हा भाग चीनच्या सिकियांग प्रांताचा भाग नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं आपल्या पुराव्याची कांहींच गरज नाहीं, जुन्या चिनी नकाशांनीं हें सिद्ध केलें आहे. त्या नकाशांत सिकियांगची दक्षिण हद्द कुएनलुनच्या खालीं कधींच आलेली नाहीं, हें आपोआपच सिद्ध होतें.

चिनी सरकार वारंवार म्हणत असतें कीं, चीनच्या ताब्यांतील तिबेटचा भाग व हिंदुस्थान यांच्यामधील सरहद्द निश्चित आंखलेली नाहीं. नकाशावर सरहद्द ठरविणें व नकाशावरील सरहद्दीप्रमाणें प्रत्यक्षांतील सरहद्द, तारांची कुंपणें घालून, खांब उभारून वा अन्य मार्गानें निश्चित करणें या दोन गोष्टी भिन्न आहेत. चिनी सरकार या दोन गोष्टींची हेतुपूर्वक गल्लत करीत आहे. सिक्कीम व गढवाल या दोन विभागांखेरीज बाकीच्या सरहद्दीवर सरहद्ददर्शक कुंपणें वा खांब नाहींत ही गोष्ट खरी आहे. पण याचा अर्थ सरहद्दच ठरलेली नाहीं असा होत नाहीं. यांचें एक कारण असें कीं, परंपरेनें, वर्णनानें ही सरहद्द ओळखतां येत असे व दुसरें कारण असें कीं, हा प्रदेश अतिशय दुर्गम आहे. इकडील सरहद्द ही अनेक बर्फाच्छादित शिखरांवरून गेलेली आहे. या टापूंत बर्फाचीं वादळें होतात. याशिवाय परंपरेनें ठरलेल्या सरहद्दीपलीकडील प्रदेशावर तिबेटच्या सत्ताधाऱ्यांनीं कधीं हक्क सांगितला नाहीं. त्यांना ही सरहद्द मान्य होती. केवळ सरहद्दीवर सरहद्ददर्शक खांब उभारलेले नाहींत या कारणामुळें सरहद्द कांहीं बेकायदेशीर ठरत नाहीं. कारण ही सरहद्द परंपरेनें चांगलीच ज्ञात झालेली, पर्वतश्रेणींमुळें ओळखतां येण्याजोगी व नकाशावर स्पष्टपणें दाखविलेली अशी आहे. जुन्या चीनच्या नकाशांतूनहि लडाख विभागांतील अक्साई चीन इत्यादि भाग हिंदुस्थानच्या प्रदेशांत दाखविलेला आहे. अगदीं अलीकडच्या नकाशांतून मात्र हा प्रदेश व चँग चेन्म हा प्रदेश चीनमध्यें दाखवीत आहेत.

लडाखमधील एकूण १४,००० चौरस मैलांचा टापू चिनी सरकारच्या ताब्यांत आहे. चीननें ८ सप्टेंबर १९६२ ची रेषा जरी मान्य केली तरी १२,००० चौरस मैल प्रदेश त्यांच्या ताब्यांत राहतो.

नेफा

आसाम प्रांताच्या उत्तरेकडे व पूर्वेकडे ब्रह्मदेशाच्या बाजूला असा हा घोड्याच्या नालाकृति विभाग आहे.

ब्रिटिशांच्या अंमलाखालीं ब्रह्मदेश असतांना, ब्रह्मदेश-चीन व हिंदुस्थान-चीन यांच्यामध्यें आंखण्यांत आलेली सलग आंतर राष्ट्रीय रेषा म्हणजे प्रख्यात मॅकमहॉन रेषा ही होय. चीन व ब्रह्मदेश यांच्यांत नुकताच सरहद्दीचा जो करार झाला आहे त्यामध्यें मॅकमहॉन रेषेचा ब्रह्मदेशापुरता असलेला भाग चीननें सरहद्द म्हणून मान्य केलेला आहे.

नेफा हें North East Frontier Agency या शब्दाचें लघुरूप आहे. हा विभाग जंगलमय, पर्वतश्रेणींनीं भरलेला, अत्यंत दुर्गम असा आहे. या विभागाचें क्षेत्रफळ सुमारें ३१,४३८ चौ. मैल असून येथील टोळीवाल्यांची संख्या सुमारें साडेतीन हजार आहे. या विभागांत लहानमोठ्या अशा ४० टोळ्या आहेत. हे टोळीवाले आपल्या रूढींप्रमाणें कारभार करीत असतात. या टोळीवाल्यांच्या ३९ भाषा असून ४२ बोलीभाषा आहेत. ब्रह्मपुत्रे-खेरीज सुबनसरी, कामेंग व लोहित या तीन प्रमुख नद्या या विभागांत आहेत. या टोळीवाल्यांना अद्यापि अन्य भारतीय नागरिकांप्रमाणें राज्य-कारभाराबाबत दर्जा (म्हणजे मतदानाचा हक्क, लोकसभेत त्यांचा प्रतिनिधि इ.) देण्यांत आलेला नाहीं. याचें कारण सामाजिक व राजकीय दृष्टीनें हे टोळीवाले मागासलेले आहेत. १९४७ सालापासून त्यांची प्रगति करण्याचे प्रयत्न होत आहेत. १९४७ सालीं या प्रदेशांत अवघ्या दोन प्राथमिक शाळा होत्या. १९६१ च्या अहवालावरून पाहतां आतां त्या ठिकाणीं १२९ प्राथमिक शाळा, १४ माध्यमिक इंग्रजी शाळा व पांच हायस्कूल्स आणि तीन तांत्रिक शिक्षणाच्या शाळा अशा एकूण १५१ शैक्षणिक संस्था आहेत. ' बुनियादी शिक्षा-भवन ' या नांवानें ओळखलें जाणारें एक ट्रेनिंग कॉलेजहि आहे. एकूण शिक्षकांची संख्या ३२८ असून विद्यार्थ्यांची संख्या ६,३५० आहे. आरोग्य व वैद्यक या दृष्टीनें विचार करतां या विभागांत रुग्णालयें, दवाखाने व फिरतीं पथकें मिळून एकूण ७८ आहेत व डॉक्टरांची

संख्या ९९ आहे. १९५५ मध्यें प्रथम एक सहकारी सोसायटी स्थापन झाली. आज सहकारी सोसायट्यांची संख्या २६ आहे.

प्रशासकीय दृष्टीनें विचार करतां नेफा हा प्रदेश ५ विभागांचा (Divisions) बनलेला आहे: पश्चिमेकडून क्रमशः पूर्वेकडे कामेंग, सुबनसरी, लिआंग, लोहित व तिरप. कामेंग या विभागाचें प्रमुख ठाणें बोम दीला, सुबनसरीचे झीरो, सियांगचे अलांग, लोहितचें तेझ व तिरपचें खोन्सा अशीं आहेत. या प्रमुख ठाण्यांच्या ठिकाणीं एक पोलिटिकल ऑफिसर असतो व तावांग, चँगलँग, दापोरिजो, पासीघाट, रोहिंग या दुय्यम ठाण्यांच्या ठिकाणीं आणखी एक ज्यादा पोलिटिकल अधिकारी असतो. भारतीय घटनेच्या दृष्टीनें विचार केल्यास व भौगोलिक दृष्टीनें विचार करतां हा प्रदेश आसाम राज्यांत मोडतो. आसामच्या राज्यपालानें या प्रदेशाचा कारभार भारताच्या राष्ट्राध्यक्षांच्या वतीनें त्यांचा एजंट म्हणून पाहावयाचा, अशी घटनेंत तरतूद होती. आतां या प्रदेशाचा कारभार परराष्ट्र खात्यामार्फत चालतो. राज्यपालांचें पूर्वीचें स्थान मात्र कायमच ठेवलें आहे. १ एप्रिल १९६० पासून कमिशनर नेमण्याची तरतूद करण्यांत आली आहे. या सर्व माहितीवरून या ठिकाणची परिस्थिति लडाखहून सर्वस्वीं भिन्न आहे, हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

मॅकमहॉन रेषा

तिबेट, चीन व हिंदुस्थान यांच्यामध्यें १९१४ सालीं करार होऊन मॅकमहॉन रेषा आंतर राष्ट्रीय रेषा ठरविण्यांत आली. या करारांत ब्रिटिश हिंदुस्थानचें प्रतिनिधित्व सर हेन्री मॅकमहॉन यांनीं केलें. म्हणून ही आंतर राष्ट्रीय रेषा मॅकमहॉन रेषा या नांवानें ओळखली जाते. उपर्युक्त करार या सुमारास करण्याचें कारण असें कीं, इ. स. १९११ मध्यें चीनच्या प्रख्यात मांचू घराण्याच्या अंमलाचा शेवट होऊन चीनमध्यें प्रजासत्ताक गणराज्याची स्थापना करण्यांत आली. या मांचू घराण्यानें इ. स. १६४४ मध्यें तिबेटवर आपलें वर्चस्व प्रस्थापित करून ल्हासा येथें एक अधिकारी नेमला. मांचू घराणें जसजसें दुर्बल होऊं लागलें, तसतसें तिबेटकडे रशियाचें लक्ष वेधलें. रशिया व इंग्लंड यांच्यामधली सत्तास्पर्धा इथेंहि प्रतिबिंबित झाली.

या शतकाच्या आरंभीं इ. स. १९०४ सालीं, इंग्रजांनीं सर फ्रॉन्सिस यंग हजबंड यांच्या नेतृत्वाखालीं एक तुकडी तिबेटमध्यें पाठविली. यंग हजबंडनें १९०४ मध्यें ल्हासा जिंकलें. यावेळीं जो करार करण्यांत आला त्यानुसार इंग्रजांना व्यापारी सवलती मिळाल्या व उलटपक्षीं इंग्रजांनीं तिबेटवरचें चीनचें प्रभुत्व मान्य केलें. १९११ मध्यें मांचू घराणें अस्त पावल्यावर तिबेटनें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. तिबेटवर आपला ताबा ठेवण्याचा प्रयत्न प्रजासत्ताक चीननें १९१७ मध्यें केला. पण तो अयशस्वी झाला. चीन व तिबेट यांच्यामधील अशी परिस्थिति जवळजवळ १९३३ पर्यंत टिकली.

चीनअंतर्गत अशांतता, मध्यवर्ति सत्तेचा दुर्बलपणा व तिबेटची स्वातंत्र्य-घोषणा यामुळें तिबेट-चीन हिंदुस्थान सरहद्द ठरवून करारान्तर्गत करणें आवश्यक झालें. तें कार्य मॅकमहॉन यांनीं पार पाडलें. सिमला येथें जी परिषद भरविण्यांत आली त्यांत ब्रिटिश हिंदुस्थानतर्फे मॅकमहॉन, चीनतर्फे मि. इव्हानचेन व तिबेटतर्फे लंचेन शत्रा हे हजर होते. तिबेटच्या वकिलाचा या परिषदेला हजर राहण्याचा व बरोबरीचा भागीदार म्हणून करारावर सही करण्याचा हक्क चीननें मान्य केलेला होता. या परिषदेंत दोन नकाशे तयार करण्यांत आले. एका नकाशान्वयें तिबेटची चीनशीं संबंधित व हिंदुस्थानशीं संबंधित अशी सरहद्द तांबड्या रेषेनें आंखण्यांत आली. दुसऱ्या नकाशांत निळ्या रेषेनें दलाई लामाच्या आधिपत्याखालील आऊटर तिबेटचा भाग दर्शविण्यांत आला. ही सरहद्द आपणांस मान्य आहे, अशा संमतिदर्शक सह्या ३ जुलै १९१४ रोजीं या तीनहि वकिलांनीं त्यावर केलेल्या आहेत.

○ ○ ○

परिशिष्ट २

नेपाळ—सिक्कीम—भूतान

हिंदुस्थान व चीन या दोन प्रचंड राष्ट्रांमध्यें सांपडलेल्या चिमुकल्या नेपाळला अतिशय महत्त्वाचें स्थान नैसर्गिक दृष्टीनें आपोआप प्राप्त झालें आहे. त्याच्या उत्तरेला तिबेट (चीन), पश्चिमेला उत्तरप्रदेश, दक्षिणेला बिहार व पूर्वेला पश्चिम बंगाल आहे. आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकवण्याची

दुर्दम्य आकांक्षा नेपाळी जनतेंत आहे. दहा वर्षांपूर्वी हिंदुस्थान व व ब्रिटन या दोघांशींच नेपाळचे राजनैनिक संबंध होते. आज दुनियेंत सर्वत्र नेपाळनें संबंध जोडले आहेत. आपलें स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण आणि तटस्थतेची भूमिका टिकविण्याचीहि त्याची इच्छा आहे.

चौपन्नहजार चौपन्न चौरस मैल क्षेत्रफळ असलेल्या नेपाळची लोकसंख्या १९५२–५४ च्या खानेसुमारीप्रमाणें सुमारें ८५ लाख होती. ९७ टक्के लोक खेड्यांत राहतात.

लोकसंख्येच्या ९० टक्के लोक शेतकरी आहेत. फक्त कांठमांडूच्या खोऱ्यांत ६५ टक्क्यांपर्यंत हें प्रमाण कमी होतें. काठमांडू भागांतल्या कारखान्यांत राबणारांची मोठी संख्या येथें आहे.

२८ हजार ७८० छोटीमोठीं गावें नेपाळांत आहेत. पैकीं पांच हजार किंवा त्यापेक्षां जास्त लोकसंख्या असलेलीं शहरें केवळ दहाच आहेत. काठमांडू खोऱ्यांतील प्रमुख पांच शहरांचा सामाजिक व सांस्कृतिक प्रभाव शहरीं भागांवर पडलेला आहे. ८९ टक्के नेपाळी हिंदुधर्माचे आहेत. ९ टक्के बुद्ध व २ टक्के मुस्लीम धर्माचे. साक्षरतेचें प्रमाण अत्यंत अल्प. पुरुषांच्यांत ८ टक्क्यांइतकें व स्त्रियांत १ टक्का इतकेंच आहे. काठमांडू शहरांतच सुशिक्षितांचा भरणा आहे. तेथें ५० टक्के साक्षर पुरुष व १५ टक्के साक्षर स्त्रिया राहतात.

सिक्कीम

सिक्कीम व भारत यांच्यातील करारानुसार संरक्षण व परराष्ट्रखातें भारताकडे आहे. भारतानें तेथें स्वखर्चानें सुधारणेच्या योजना आंखल्या आहेत. सिक्कीमचें भौगोलिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. सिक्किम हा प्रदेश २८१८ चौ. मैलाचा आहे. जीलेप ला व न थू ला या अत्यंत महत्त्वाच्या खिंडी सिक्कीमध्येंच आहेत. म्हणूनच सिक्कीमला भारताचें ईशान्येकडील प्रवेशद्वार म्हणण्यांत येतें.

सिक्कीमची लोकसंख्या १ लक्ष ४० हजार असून नेपाळी, भोतिया व लेपचा या तीन प्रमुख जमाती आहेत. सिक्कीमची राणी–तिस्ता नदी ! वनस्पती, घनदाट जंगलें, रंगीबेरंगी जंगली जनावरें, सुपीक हिरवींगार दऱ्याखोरीं,

हिमशुभ्र शिखरें, अशा निसर्गसौंदर्यानें सिक्कीम विनटलेला आहे. अज्ञात भूसंपत्ति किती आहे याचा अंदाज करणें कठीण !

भूतान

दोन हजार चौरसमैल भूभाग आणि सातलाखांवर लोकसंख्या असलेला लांबटचौकोनी भूतान देखील भारताच्या सरहद्दीवरचें एक मोक्याचें राष्ट्र आहे. नेपाळांतून येऊन स्थायिक झालेले नेपाळी बोलणारे भूतानी व तिबेटांतून आलेले डुप्का व भोतिया या प्रमुख जमाती होत. हे लोक शिस्तशीर, कुशाग्रबुद्धीचे व चिकाटीचे आहेत. बौद्ध धर्माचें स्थान अजूनहि टिकून आहे. इ. स. १८६५ मध्यें भूतान ब्रिटिशांनीं घेतला. १९१० सालीं पुनखा करारान्वयें चिनी आक्रमणापासून सुरक्षित राहण्यासाठीं म्हणून भूताननें परराष्ट्र संबंधांच्या दृष्टीनें भारताचें मार्गदर्शन पत्करलें. अजूनहि तींच व्यवस्था कायम आहे.

विकास योजनांसाठीं भारत भूतानला सालीना ७ लाख रुपये देतो.

o o o

परिशिष्ट ३

भारत-चीन संबंधांतील महत्त्वपूर्ण घटना : १९४७-१९६२

१९४७

१५ ऑगस्ट—भारत स्वतंत्र झाला.

नव्या भारत सरकारकडे ब्रिटिश राजवटीचा वारसा आला. त्यांत तिबेटांतील कांहीं विशेषाधिकारांचा (extra territorial rights) अंतर्भाव झालेला होता. भारत सरकारचा व्यापारी प्रतिनिधि तिबेटची राजधानी ल्हासा येथें राहील, त्याला आपल्या संरक्षणासाठीं लष्करी संरक्षक दल ठेवण्याचा अधिकार असेल, ब्रिटिश (त्यांत त्यावेळीं भारतीयहि आलेच)

नागरिकांनीं कांहीं गुन्हा केल्यास त्यांच्याबाबत न्यायालयीन कारवाई तो प्रतिनिधि करील. अशा प्रकारचे हे अधिकार होते.

गंगटोक ते याटुंग आणि ग्याग त्से यांच्या दरम्यान तार-टेलिफोन यंत्रणा व याटुंग, फारी आणि यान त्से येथील पोस्ट व तार ऑफिसें भारताच्या व्यापारी प्रतिनिधींच्यामार्फत चालविलीं जात. तिबेटमध्यें भारत सरकारच्या मालकीचीं एकूण अकरा विश्रामगृहें होतीं.

१९४९

१ **ऑक्टोबर**—चीनमध्यें लोकांच्या प्रजासत्ताकाची स्थापना झाली.

३० **डिसेंबर**—भारत सरकारनें चीनच्या नव्या राजवटीला मान्यता दिली.

१९५०

१९ **सप्टेंबर**—नव्या चिनी सरकारला राष्ट्रसंघांत प्रवेश मिळालां पाहिजे, असें भारताच्या प्रतिनिधि मंडळानें राष्ट्रसंघाच्या आमसभेपुढें निवेदन केलें.

७ **ऑक्टोबर**—चिनी सैन्य तिबेटमध्यें घुसलें.

१९५४

२९ **एप्रिल**—भारत-तिबेट संबंधांबाबतचा आठ वर्षांचा करार चीन सरकारबरोबर करण्यांत आला. भारतानें आपले तिबेटांतील सर्व विशेषाधिकार सोडले. व्यापार व यात्रेकरूंबाबत कांहीं तरतुदी करण्यांत आल्या. तिबेटांतील पोस्ट, तार व टेलिफोन यंत्रणा आणि विश्रामगृहें चिनी सरकारच्या हवालीं करण्यांत आलीं.

या कराराच्या प्रस्तावनेंतच पंचशील तत्त्वांचा अंतर्भाव करण्यांत आला होता. तीं तत्त्वें पुढीलप्रमाणें—(१) परस्परांच्या सार्वभौमत्वाविषयीं व प्रादेशिक एकात्मतेविषयीं पूर्ण आदर, (२) एकमेकांवर आक्रमण न करणें, (३) एकमेकांच्या अंतर्गत व्यवहारांत हस्तक्षेप न करणें, (४) एकमेकांशीं समानतेची वागणूक व सहकार्य, (५) शांततापूर्ण सहजीवन.

२८ **जून**—चौ एन् लाय व पं. नेहरू यांचें संयुक्त पत्रक. पंचशील तत्त्वांचा पुनरुच्चार करून या तत्त्वांमुळें भारत व चीन आणि त्याचबरोबर

आशियांतील इतर देशांची उन्नति होणें सुलभ जाईल व विश्वशांति प्रस्थापित होईल असें त्या पत्रकांत म्हटलें होतें.

१७ **जुलै**—उत्तर प्रदेशांतील बडाहोटी (' वूजे ' हें चीननें दिलेलें नांव) या ठिकाणीं भारतीय सैन्य असल्याबद्दल चीननें भारताकडे निषेध नोंदविला. पण बडाहोटीचें निश्चित ठिकाण चीन सांगूं शकलें नाहीं.

१८ **ऑक्टोबर**—पं. नेहरूंची चीनला भेट. चिनी नकाशांत भारताचा पन्नास हजार चौरस मैलांचा प्रदेश हा चीनचाच दाखविला आहे, हें चुकीचें झालें ल्याबद्दल पं. नेहरूंनीं चौ एन् लायला विचारलें; व चौ एन् लायनीं उत्तर दिलें कीं ते नकाशे कोमिंटांग राजवटीनें तयार केलेले असून ते दुरुस्त करण्यास नव्या राजवटीला सवड झालेली नाहीं.

१९५६

२८ **नोव्हेंबर**—चौ एन् लाय यांची भारत भेट. कांहीं आंतर राष्ट्रीय प्रश्नांच्या चर्चेबरोबरच भारत-चीन सरहद्दीचा प्रश्न चर्चिला गेला. सरहद्दी-बद्दलचा वाद नाहीं, फक्त कांहीं किरकोळ तपशीलाचे मुद्दे निश्चित करावयाचे आहेत असें चौ एन् लायनीं सांगितलें. ते असेंहि म्हणाले कीं, चीननें ब्रह्मदेशाबरोबरील सरहद्द ठरवितांना मॅकमहॉन रेषा मान्य केली आहे व भारताबरोबरील सरहद्दीबाबतहि ही रेषा मान्य केली जाईल.

१९५८

२ **जुलै**—चिनी सैन्यानें लडाखमधील खुर्नाक किल्ला ताब्यांत घेतल्या-बद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

१८ **ऑक्टोबर**—लडाखच्या अक्साई चीन भागांतून चीननें मोटारीचा रस्ता बांधल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

१९५९

१७ **जानेवारी**—चीननें ऑक्टोबर १९५७ मध्यें वालॉंग भागांत व सप्टेंबर १९५८ मध्यें लोहित डिव्हिजन भागांत अतिक्रमण केल्याबद्दल भारतानें निषेध नोंदविला.

२३ जानेवारी—चौ एन लायनीं पं. नेहरूंना उत्तर पाठवून कळविलें कीं, (१) भारत–चीन सरहद्द अधिकृतरीत्या कधींच ठरली नव्हती, पण हा प्रश्न १९५४ सालीं उपस्थित न करण्याचें कारण त्या वेळची परिस्थिति त्याला योग्य (ripe) नव्हती, (२) मॅकमहॉन रेषा चीननें अधिकृतपणें केव्हांहि मान्य केली नव्हती. चीनचें नकाशे योग्यच आहेत.

याचा अर्थ असा कीं, परंपरेनें चालत आलेली भारताची सरहद्द चीननें अमान्य केली; १९५४ चा करार मोडला व भारताच्या ५०,००० चौरस मैल प्रदेशावर दावा सांगितला.

३१ मार्च—दलाई लामांनीं भारतांत प्रवेश केला. त्यांना येथें राहण्याची परवानगी (Political asylum) देण्यांत आली, पण त्यांनीं राजकीय कारवाया करूं नयेत असें सांगण्यांत आलें.

१६ मे–चीननें भारताला असा इशारा दिला कीं, त्याला दोन आघाड्या सांभाळाव्या लागतील. पंचशील तत्त्वांचें पालन सोयीनुसार केलें जाईल, असेंहि चीननें कळविलें.

२५ ऑगस्ट–चिनी सैनिकांच्या एका मोठ्या तुकडीनें नेफांतील सुबनसरी डिव्हिजनमध्यें आक्रमण केलें. मोठ्या प्रमाणावर गोळीबार केला व लोंगजू हें ठाणें काबीज केलें.

२० ऑक्टोबर–दक्षिण लडाखमधील चँग चेन्यो खोप्यांत चिनी लष्करानें चाळीस मैल आंत प्रवेश केला. कोंगका खिंडींत भारतीय सैनिकांशीं लढाई झाली. त्यांत नऊ भारतीय सैनिक ठार झाले. दहा जवानांना चिन्यांनीं पकडलें व त्यांच्यावर पाशवी अत्याचार करून सोडून दिलें.

१७ डिसेंबर–चीननें भारताची १६ नोव्हेंबरची सूचना फेटाळून लावली व अक्साई चीन भागांत पश्चिमेकडे आणि दक्षिणेकडे आणखी पुढें सरकून कांहीं रस्तेहि बांधले.

१९६०

१९ एप्रिल–चौ एन् लाय भारतांत आले. त्यांच्या व पं. नेहरूंच्या सहा दिवस वाटाघाटी झाल्या. शेवटीं त्यांनीं जाहीर केलें कीं; दोन देशांमधील सरहद्दीचे प्रश्न सोडविण्यांत त्यांना यश आलें नाहीं. तरी पण

एकमेकांचीं कागदपत्रें पाहण्यासाठीं दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठका व्हाव्यात व दरम्यानच्या काळांत चकमकी होऊं देऊं नयेत, असें ठरलें.

१९६१

१४ फेब्रुवारी—भारतीय व चिनी अधिकाऱ्यांचा अहवाल भारतानें प्रसिद्ध केला. भारताच्या म्हणण्याला भक्कम पुरावा दिसून आला. चीनच्या म्हणण्याला कांहीं पुरावा नव्हता. त्या अहवालावरून दिसून आलें कीं, चीननें भारताच्या ५०,००० चौरस मैल प्रदेशावर हक्क सांगितला असून त्यापैकीं १२,००० चौरस मैलांचा प्रदेश प्रत्यक्ष व्यापला आहे.

चीननें सुरुवातीला या अहवालाची दखलच घेतली नाहीं. शेवटीं मे १९६२ मध्यें त्या अहवालांतील चिनी अधिकाऱ्यांनीं सादर केलेल्या मजकुरांतील सोयीस्कर तेवढा भाग चीननें प्रसिद्ध केला.

१९६२

३० एप्रिल—काराकोरम खिंडीपासून कोंगका खिंडीपर्यंत आपण गस्त घालणार आहोंत, तरी भारतानें त्या भागांतील दोन नाकीं (भारतीय हद्दींतीलच) उठवावींत, नाहींतर कडक उपाय योजावा लागेल असें चीननें जाहीर केलें.

३ मे—काराकोरम खिंडीपासून पलिकडे असलेल्या व पाकिस्ताननें व्यापलेल्या प्रदेशांतील भारत-चीन सरहद्द निश्चित करण्यासाठीं वाटाघाटी करण्याचा पाकिस्तान व चीननें करार केला.

१४ मे—लडाखमधील अतिक्रमणाचा निषेध करून भारतानें चीनला परत विनंति केली कीं, भारताची सेना चीन सांगत असलेल्या हद्दीपर्यंत व चिनी सेना भारताच्या परंपरागत सरहद्दीपर्यंत मागें घेतल्या जाव्यात, म्हणजे वाटाघाटींना अनुकूल असें वातावरण तयार होईल. अक्साई चीन-मधील रस्त्याचा चीननें नागरी कारणांसाठीं वापर करण्याला परवानगी द्यायचीहि भारतानें तयारी केली.

८ सप्टेंबर—लडाख भागांत चढाई करून चीननें आणखी २००० चौरस मैलांचा प्रदेश बळकावला.

२० ऑक्टोबर—नेफा व लडाख भागांत चीननें मोठ्या प्रमाणावर चढाई केली.


नंतर ४-५ दिवसांत नेफामधील तवांग, बोम दीला इत्यादि ठाणीं पडलीं. लडाख भागांतहि चीननें चुशुलपर्यंतचा प्रदेश जिंकला.

१७, १८ **नोव्हेंबर**—नेफा भागांतील वालाँग, से ला इत्यादि ठाणीं चीननें जिंकलीं.

२३ **नोव्हेंबर**—चीननें एकतर्फी शस्त्रसंधि केली व असें म्हटलें कीं, चीन ६ नोव्हेंबर १९५९ रोजीं प्रत्यक्ष ताबा असलेल्या रेषेपर्यंत (actual line of control) मागें जायला तयार आहे व भारतानें २० किलोमीटर मागें जावें. (पण ७ नोव्हेंबर १९५९ रोजीं आपला प्रत्यक्ष ताबा हा ८ सप्टेंबर १९६२ च्या रेषेपेक्षांहि भारतीय हद्दींतील आणखी सुमारें ८००० चौरस मैलांवर होता असें चीनचें म्हणणें आहे. ८ सप्टेंबर १९६२ च्या रेषेपर्यंत चीन मागें सरकला तर चीनच्या ताब्यांत भारताचा १२,००० चौ. मैल प्रदेश राहील आणि सेना ७ नोव्हेंबर १९५९ च्या "प्रत्यक्ष ताबा असलेल्या रेषे" पर्यंत आणली तर चीनच्या ताब्यांत २०,००० चौ. मैल प्रदेश जातो. भारतानें ही सूचना फेटाळली व ८ सप्टेंबर १९६२ रेषेचा आग्रह धरला.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६८९८ दि: २७.८.५
क्रमांक १५२१५ नों दि: २५.९.५





लडाख


१. भारताची परंपरागत सरहद्द.

२. ७ नोव्हेंबर १९५९ रोजीं चीनच्या प्रत्यक्ष ताब्यांत असलेला प्रदेश दाखविणारी रेषा. पण ही वस्तुस्थिति चीननें नाकारली आहे.

३. सप्टेंबर व ऑक्टोबर १९६२ मध्यें चीननें आक्रमण करून व्यापलेल्या प्रदेशाची सीमा दाखवणारी रेषा. परंतु ही रेषा ७ नोव्हेंबर १९५९ ची स्थिति दाखवणारी आहे, असा चीनचा दावा आहे.

४. चीनच्या खोट्या दाव्यामुळें, विवाद्य ठरूं पहाणारा प्रदेश.

५. ८ सप्टेंबर १९६२ रोजीं फौजा जेथें होत्या, ती रेषा.



मॅकमोहन लाईन

मिगिटन व लोंगजू यांच्या पूर्व पश्चिम चौकटींनीं दाखवलेला तिबेटांतील भाग चीनच्या आजच्या म्हणण्याप्रमाणें भारतांत येईल व थागला किंझेमानमधील चौकटींनीं दाखवलेला भारतांतील तिबेटांत जाईल.



नेफा

१. ८ सप्टेंबर १९६२ ला भारतीय फौजा व चिनी फौजा यांना विभागणारी रेषा.

२. नेफा सीमेवरील निर्लष्करीकरण करण्यासंबंधीं चीनच्या तीन कलमी योजनेंत सुचविलेला प्रदेश.


REFBK-0013091

साधना

ट्वेंटिएथ सेंचरि

स्टुडन्ट्स् **डिक्शनरी**

संपादक : प्रिं. रा. प. सबनीस, एम्. ए. (कॅन्टब).
प्रिं. डॉ. ना. य. डोळे, एम्. ए., पीएच्. डी.

पृष्ठें ९४० किंमत रु. ६.००

उपलब्ध असलेल्या इंग्रजी - इंग्रजी - मराठी शब्दकोशांतील उणीवा दूर करून अधिक विस्तृत प्रमाणावर शब्द आणि अर्थ देणारा इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ करणाऱ्या विद्यार्थ्यापासून पदवी परीक्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या सर्व गरजा भागविणारा बृहद्कोश

कोशाचीं कांहीं वैशिष्ट्यें


१) आधुनिक इंग्लिश पद्धतीचे प्रमाणभूत उच्चार देवनागरी लिपींत.
२) साधित शब्दांची रचना कळण्याची मूळ शब्दांबरोबर सोय.
३) शब्दांचें व्याकरण.
४) अत्यंत उपयोगी अशीं परिशिष्टें.



साधना प्रकाशन, शनवार, पुणें २

भारत - चीन सरहद्द

[नकाशासंबंधी स्पष्टीकरण मागील बाजूस]



क्रमांक	ठिकाण	चीननें आक्रमण केल्याची तारीख	भारतानें निषेध नोंदल्याची तारीख
१	बडाहोटी	जून १९५५	२८ जून १९५५
२	दामझेन	१५ सप्टेंबर १९५५	५ नोव्हेंबर १९५५
३	लाग	२८ एप्रिल १९५६	२ मे १९५६
४	शिपकी ला	१ आणि २० सप्टेंबर १९५६	८ आणि २४ सप्टेंबर १९५६
५	वालॉंग	ऑक्टोबर १९५७	१७ जानेवारी १९५९
६	खुर्नाक फोर्ट	जून १९५८	२ जुलै १९५८
७	अकसाई चीन विभाग	सप्टेंबर–ऑक्टोबर १९५८	१८ ऑक्टोबर ८ नोव्हें. १९५८
८	लोहित सरहद्द विभाग	२७–२८ सप्टेंबर १९५८	१७ जानेवारी १९५९
९	संगचामाला	ऑक्टोबर १९५८	१० डिसेंबर १९५८
१०	लापथाल	ऑक्टोबर १९५८	,,
११	पश्चिम पॅन गॉंग लेक	२८ जुलै १९५९	३० जुलै १९५९
१२	खिनझमाने	७ ऑगस्ट १९५९	११ ऑगस्ट १९५९

क्रमांक	ठिकाण	चीननें आक्रमण केल्याची तारीख	भारताने निषेध नोंदल्याची तारीख
१३	लोंगजू	२५ ऑगस्ट १९५९	२८ ऑगस्ट १९५९
१४	कांगका ला	२० ऑक्टोबर १९५९	२३ ऑक्टोबर १९५९
१५	टाकटासँग गोंपा	३ जून १९६०	२९ जुलै १९६०
१६	जेलेप ला	२२ सप्टेंबर १९६०	२७ सप्टेंबर १९६०
१७	हॉट स्प्रिंग	ऑक्टोबर १९६०	३१ ऑक्टोबर १९६१
१८	चुशुल	मे १९६१	,,
१९	चेमोकारपो ला	जुलै १९६१	,,
२०	न्यागझू	ऑगस्ट १९६१	,,
२१	डामबु गुरु	,,	,,
२२	७८° १२′ पूर्व ३५° १९′ उत्तर हें ठिकाण	सप्टेंबर १९६१	३१ ऑक्टोबर १९६१
२३	रोई खेडेगांव	जानेवारी १९६२	१८ एप्रिल १९६२
२४	चिपचॅप	,,	१४ मे १९६२

क्रमांक	ठिकाण	चीननें आक्रमण केल्याची तारीख	भारतानें निषेध नोंदल्याची तारीख
२५	सुमडो	एप्रिल १९६२	१५ एप्रिल १९६२
२६	स्पँनग्गुर	मे १९६२	
२७	७८° ३५′ पूर्व ३४° ३३′ उत्तर (ह्या ठिकाणा पासून)	जून १९६२	१६ जून १९६२
	७९° ८′ पूर्व ३४° ३३′ उत्तर (ठि. प. ह्या रस्ता)		
२८	७८° १५′ पूर्व ३५° १५′ ३०″ उत्तर	जून १९६२	२८ जून १९६२
२९	गालवान खोरें	१० जुलै १९६२	१० जुलै १९६२
३०	चिपचॅप चॅगचेमो व पेनगॉंग विभाग	जून-जुलै १९६२	१२ जुलै १९६२

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २५८८ वि. दिनांक
अंक २५२५ की कि २५-८-६३